# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १७/०७/२०१० (का.प.क्र.०४) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिं.१७/०७/२०१० रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.१० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर **भा.प्र.से.**, नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.शिंदे राजू रामराव
२. स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
३. स.स.श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.मिलींद यशवंतराव दाभाडे
१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१४. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१५. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२१. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२२. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२३. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

२४. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२६. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२७. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२८. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
२९. श्रीमती जरीना म. जावेद
३०. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३१. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३२. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३३. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३४. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३५. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३६. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३७. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३८. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३९. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४०. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
४१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४२. श्रीमती करिमुन्नीसा बेगम जमील खान
४३. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४४. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४५. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
४६. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४७. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४८. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४९. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
५०. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्नीसा खाजा
५१. स.स.शेख अब्दूल असद शेख अब्दूल रशीद
५२. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५३. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५४. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटू कुरेशी
५५. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

५६. स.स.श्री.खान आगा मिया
५७. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५८. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५९. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
६०. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
६१. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६२. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
६३. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६४. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
६५. स.स.श्रीमती काथार रेखा कैलास
६६. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६७. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६८. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६९. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
७०. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
७१. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
७२. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
७३. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
७४. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
७५. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७७. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७८. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७९. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
८०. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
८१. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
८२. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
८३. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
८४. स.स.जोशी संजय रामदास
८५. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
८६. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
८७. स.स.श्री.खान अक्रम करीम खान

८८. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

८९. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

९०. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

९१. स.स.श्री.शे.खाजा शरफोद्दिन

९२. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

९३. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

श्री.गिरजाराम हाळनोर :सभागृहाचे स.सदस्य व भारतीय जनता पक्षाचे गट नेते श्री. संजयजी केनेकर यांचा आज वाढदिवस आहे त्यांना मी शुभेच्छा देतो व सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

मा.महापौर :स.सदस्य श्री. संजय केनेकर यांना सभागृहाच्या वतीने वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा.

श्री.संजय केनेकर :वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याबध्दल सभागृहाचे आभार मानतो.

श्री.मधुकर सावंत :स्थायी समितीच्या ५ सदस्यांनी स्थायी समिती सदस्याचे एक रिक्त असलेले पद भरण्यासाठी सर्वसाधारण आयोजित म्हणून एक महिण्यापूर्वी आपणाकडे पत्र दिले मुंबई प्रांतिक महानगरपालिका ॲक्टच्या नुसार महापालिकेचे कामकाज चालते आपण महापौर आहात अदयाप सभा का आयोजित केलेली नाही.

मा.महापौर :कायदेशीर सल्ला मागविलेला आहे जोपर्यंत माझे समाधान होत नाही तोपर्यंत हे होणार नाही.वेळ प्रसंगी राज्य शासनाचा पण सल्ला मागविणार आहे.

श्री.मधुकर सावंत :आपल्या समाधान नुसार महापालिकेचे कामकाज चालत नाही.तुम्हाला काय वाटते याला महत्व नाही ॲक्टमध्ये काय आहे त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :महापालिका ही खाजगी मालमत्ता नाही. नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.समाधान होत नाही तोपर्यंत कार्यवाही होणार नाही असे बोलणे चुकीचे आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :ॲक्टनुसार तौलिक संख्याबळ नुसार ही कार्यवाही करायची आहे.असा प्रसंग पहिल्यांदाच आलेला आहे संपूर्ण माहिती घेवून जे नियमात असेल त्यानुसारच कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :तौलिक संख्याबळानुसार नाही जो अहवाल आपण मागविला होता तो प्राप्त झालेला आहे २५ तारखेपासून माहिती घेत आहेत म्हणून नगरसचिव यांनी कळविलेले आहे माहिती कोठून व काय आलेली आहे नियमाप्रमाणे कॉग्रेस आय पक्षाचे एक सदस्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतलेली आहे त्यानुसार त्या जागेवर कॉग्रेस आय पक्षाचे सदस्याची निवड करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :येथे दोन गटाची स्थापना झालेली आहे पक्षाचे रजिस्टेशन नाही.दोन गटाचे रजि. झालेले आहे. तौलिक संख्या बळानुसार कोणत्या गटाचे धरायचे की संपूर्ण सभागृहाचे यांचा उलगडा होत नाही.

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :इतर महानगरपालिकेकडून जो अहवाल मागविला त्यावर चर्चा करावी . |
| श्री.संजय केनेकर | :ठाणे महानगरपालिकेत १९९७ ला अशीच परीस्थिती उदभवली होती त्यावेळी त्या महापालिकेने कशा प्रकारे निर्णय घेतला त्याचा अभ्यास करून निर्णय घ्यावा. |
| मा.महापौर | :या संदर्भात सरकारी वकील सर्व तपासणी करूनच अहवाल माझेकडे पाठविणार आहे त्यानंतर सदस्याची नेमणूक करण्यात येईल. |
| सौ.रेखा जैस्वाल | :आताच मा.महापौरांनी म्हटले की माझ समाधान झाले नाही काय समाधान व्हायला पाहिजे याचा खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :समाधान होत नाही यांचा अर्थ टेक्नीकली व लिगल बाबीची तपासणी झाल्यानंतरच निर्णय घेण्यात येईल असे महापौरांना म्हणायचे आहे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :हे पद भरण्यासाठी स्थायी समितीच्या ५ सदस्यांनी आपणाकडे २० तारखेला पत्र दिले. टेक्नीकली दृष्टीकोनातून जोपर्यत समाधान होत नाही तोपर्यत वेळ दयावा असे म्हटले परंतु जो पर्यत हे पद भरले जात नाही तोपर्यत माझे मते सन २०१०-११ चा अर्थसंकल्प अदयाप पर्यंत सादर झालेला नाही.विषय महत्वाचा व सर्वसामान्य नागरिकाच्या जिव्हाळयाचा आहे कोणते काम सुचविले तर बजेट मंजूर नाही असे अधिकारी सांगतात.हे पद भरण्यासाठी कायदेशीर सल्ला घेणार तो किती दिवसात घ्यायचा याचाही विचार करावा कायदेशीर सल्ला घेणेसाठी महापालिकेकडे स्वतत्र विधी विभाग आहे.या विभागाकडे आपण सल्ला मागविला असेल तर आतापर्यत का कायदेशीर सल्ला या विभागाकडून मिळाला नाही.एक महिणा बजेट सादर करण्यास उशीर केला तर विकास कामावर परीणाम होणार आहे.अनेक तांत्रिक अडचणी येत आहे.कायदेशीर सल्ला जरूर मागवा आपल्याला अधिकार आहे परंतु त्यासाठी वेळेचे बंधन पाळावे यात राजकारण न होता नियमाने सभागृह चालववे. |
| श्री.प्रमोद राठोड | :विधी विभागाकडून कायदेशीर सल्ला आपण मागविला होता असे समजते असे असतांना इतर महापालिकेकडून सल्ला मागविला तर या महापालिकेचा विधी विभाग निष्क्रीय आहे काय ?कोणत्या महापालिकेकडून खुलासा मागविला याची माहिती दयावी. |
| श्री.संजय केनेकर | :ही परीस्थिती येथे पहिल्यांदाच उदभवली या महापालिकेला जो ॲक्ट लागू आहे त्यात इतर अनेक महापालिका आहे तेथे जे काही नियम अमलात आणले जातात त्याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे नियमानुसार निर्णय घ्यावा. |
| मा.महापौर | :पहिल्यांदाच अशी येथे परीस्थिती निर्माण झाली नियमानुसार सल्ला घेवून कार्यवाही केली जाईल. |
| श्री.प्रमोद राठोड | :शहरात रोगराई पसरली नागरीकाचे हाल होत आहे विकास कामे होत नाही. |
| श्री.समीर राजूरकर | :ज्या सदस्यांनी बैठकीचे आयोजन करावे व हे पद भरावे म्हणून पत्र दिले त्यांना बैठक का आयोजित केली नाही म्हणून पत्र सुध्दा पाठविले नाही हा या संस्थेच्या सदस्यांचा अपमान आहे. |

याच वेळी अनेक सदस्य एकत्रित बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :एका वेळेस एका सदस्यांनी बोलावे. या संदर्भात कायदेशीर सल्ला मागविलेला आहे लवकरच येईल व त्यानुसार सभा आयोजीत केली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :कायदेशीर सल्ला काय मागविला आहे माहिती दयावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :सर्व सदस्यांना विनंती की ,शहरात पावसामूळे झालेली मोठी हाणी यापेक्षा स्थायी समितीच्या सदस्यांची निवडूक ही महत्वाची नाही. जे नियमात आहे त्यानुसार कार्यवाही होणारच आहे स्थायी समितीत एक सदस्य कमी आहे म्हणून कोणतेही कामकाज तसेच अर्थसंकल्प मंजूर करण्याचे थांबवू शकत नाही.

श्री.प्रल्हाद निमगावकर :स्थायी समितीचे सदस्य निवड करावे त्यानंतर विकासाचे कामे होतील.

श्री.प्रमोद राठोड :कायदेशीर सल्ला काय मागविला आहे माहिती दयावी.

याच वेळी अनेक सदस्य एकत्रित बोलत असतात.

मा.महापौर :या संदर्भात खुलासा दिलेला आहे. सरकारी वकीलांचा कायदेशीर सल्ला मागविलेला असून माहिती आल्यानंतर विशेष सभा आयोजित लवकरच सदस्य निवड केली जाईल.

श्री.विकास जैन : काल शहरात मोठया प्रमाणात पाऊस झाला प्रत्येक सदस्य त्यांच्या वार्डात पाहणीसाठी होते

: कालच्या पावसाने अनेक लोकांच्या घरामध्ये पाणी गेले मोठी हाणी झाली त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

श्री.प्रमोद राठोड :लिगली काय सल्ला मागविला समाधानकारक उत्तर दयावे.

अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात.

श्री.विकास जैन :नाल्याची साफसफाई झाली नाही ती व्हावी .लोकाच्या घरामध्ये पाणी गेले.काही वार्डात नागरीकाच्या घरामध्ये पाणी जात नसेल परंतु अनेक वार्डात नागरीकांच्या घरात मोठया पावसामूळे पाणी जाते काही सदस्यांना पावसापासून झालेले नुकसानीचे घेणेदेणे नाही.म्हणून ते इतर विषयावर बोलतात.

मा.महापौर :जी अतिवृष्टी झाली त्यामूळे शहरात काय हाणी झाली त्यावर काय उपाययोजना केली संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.संजय केनेकर :ज्या वार्डात नागरीकांच्या घरामध्ये पाणी गेले त्यांचे मोठे नुकसान होवून जनजीवन विस्कळीत झाले त्यावर चर्चा करावी.

श्री.विकास जैन :विरोधी पक्ष नेते यांचे वार्डात पाणी जात नाही परंतु इतर सदस्यांच्या वार्डात नाल्याचे पाणी लोकांच्या घरात गेले त्यामूळे त्यांना त्याचे महत्व वाटणार नाही.

याच वेळी अनेक सदस्य एकत्रित बोलत होते.

मा.महापौर :ज्या दिवशी अतिवृष्टी झाली त्यावेळी मी संपूर्ण भागात महिला महापौर असूनही सतत नाल्याच्या पाण्याची पाहणी करीत होते.प्रशासन या बाबतीत सतर्क आहे.

श्री.प्रमोद राठोड :अतिवृष्टी झाली त्या दिवशी आपतकालीन विभागात गेलो असता तेथे कर्मचारी नव्हते.

श्री.त्र्यंबक तुपे :अतिवृष्टीच्या काळात मा.महापौर यांनी शहरात फिरून ठिकठिकाणी पाहणी केली त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करतो.नागरीकाचा पाणीप्रश्न आहे तसेच आरोग्य धोक्यात आले या महत्वाच्या विषयावर सर्वांनी मिळून चर्चा करणे आवश्यक आहे सदस्य निवडीचा विषय सुध्दा महत्वाचा आहे परंतु कालच्या पावसामूळे उदभवलेली परीस्थितीवर चर्चा करावी अनेक नागरीक त्रस्त झालेले आहे.

श्री.मुंडे बाळासाहेब :माझा वार्ड गुंठेवारीत येतो अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचले लोकाच्या घरामध्ये पाणी गेले ओलाव्याच्या ठिकाणी घरात राहून अनेक लोक आजारी पडले एन-३,४ या भागातून पाणी येते.अनेकांचे संसार उध्दस्त झाले या महत्वाच्या विषयावर चर्चा करून उपाययोजना करावी.

श्री.विकास जैन :सभागृहात महिला नगर सेविका आहेत.त्यांच्या वार्डात काय परिस्थिती त्यांचे मत जाणून घ्यावे.

श्री.मीर हिदायत अली :सदस्य निवडी बाबत कायदेशीर सल्ला काय मागविला खुलासा करावा त्यानंतर इतर विषयावर चर्चा करता येईल.

श्री.गिरजाराम हाळनोर :शहरात आपतकालीन परीस्थिती निर्माण झाली लोकांच्या घरात पाणी गेले असतांना त्यावर चर्चा होत नाही सदस्य निवडी बाबतचा विषय यापेक्षा महत्वाचा नाही.

श्री.प्रमोद राठोड :विधी विभागाचा काय सल्ला मागविला आहे.

मा.महापौर :ही सभा विकास कामा संदर्भात आहे. त्यावर बोलावे. सदस्य निवडी बाबत अहवाल आल्यानंतर कार्यवाही होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :कालच्या पावसामूळे मोठे नुकसान झाले लोकांच्या घरात पाणी केले त्यावर चर्चा करावी. जवळ जवळ १०० घरात पाणी शिरले सरंक्षण भिंतीवरुन घरात पाणी शिरले कार्यवाही झाली नाही मोठे नुकसान झाले प्रशासनाला या संदर्भात आदेशीत करावे.

श्री.प्रमोद राठोड :अगोदर पहिला विषयावर खुलासा करावा त्यानंतर आपतकालीन परीस्थिती बाबत चर्चा करावी ज्या जेव्हा अतिवृष्टीची परीस्थिती उदभवली त्यावेळी आपतकालीन विभाग बंद होता.

श्रीमती कला ओझा : वार्ड क्र. ७० मध्ये मल्हार चौक प्रेरणानगर हा भाग पावसामूळे पाण्यात होता. सरक्षण भिंतीवरुन घरात पाणी घुसले मुले शाळेत जावू शकली नाही तसेच कामगारांनाही कामावर जाता आले नाही अशी परीस्थिती निर्माण झाली.सदर ठिकाणी मा.आयुक्त मा.महापौर यांनी पाहणी करून योग्य तो निर्णय घ्यावा.१० वर्षापासून ही परीस्थिती निर्माण होते या भागातील पाणी जाण्यासाठी मार्ग नाही.गुंठेवारी भाग इतर भागात पावसाच्या पाण्याचा सामान्य नागरीकांना त्रास होतो. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.प्रमोद राठोड :अगोदरच्या प्रश्नाचा खुलासा करावा.

मा.महापौर :विधी सल्लागार लवकरच अहवाल प्राप्त करतील त्यानंतर लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल.

श्री.त्र्यबंक तुपे :मागिल बैठकीत सुध्दा नाले साफसफाई बाबत प्रश्न उपस्थित केले असता नाले सफाई झालेली आहे व काही नाले साफ होत आहे असे

उत्तर मिळाले होते. परतु आपण स्वत: नाल्याची पाहणी केली असता कुठलाही नाला साफ झालेला दिसत नाही पावसाच्या पाण्यामूळे अनेक लोकाच्या घरात पाणी गेले.नाले साफ सफाई झाले की नाही खुलासा घ्यावा.

मा.महापौर :स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणूक का होत नाही विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार :स्थायी समिती सदस्य निवडी बाबत मुख्य सरकारी वकील यांचे सल्ला मागविलेला आहे. त्यांचे मत प्राप्त झाले नाही

मा.महापौर :मी सभा लवकर बोलावणार आहे याच वेळी अनेक सदस्य एकाचवेळी बोलत असतात.

श्री.त्र्यंबक तुपे :संबधीत अधिकारी यांनी स्थायी समिती सदस्य निवडी संदर्भात खुलासा केलेला आहे पूढील विषय घ्यावा.

श्री.संजय जोशी :१५ दिवसापूर्वी अतिवृष्टी झाली कालही मोठया प्रमाणात पाऊस झाला आपतकालीन परीस्थिती निर्माण झाली प्रशासनाशी संपर्क केला सदर ठिकाणी शहर अभियंता यांनी पाहणी केली नाले सफाई केली नाल्यामधील अनधिकृत पणे झालेली बांधकामे काढली नाही नाले अरूद झाले म्हणून शिवराज कॉलनी, राजनगर,उल्कानगरीचा काही भागात घरात पाणी शिरले अशी झालली बांधकामे का काढली नाही शहर अभियंता यांनी भेट दिल्यानंतर पूढे काय कार्यवाही केली त्या लोकांच्या घरात २-३फुट पाणी होते.जेथे लेआऊ मंजूर असलेल्या ठिकाणी ही परीस्थिती असेल तर झोपडपटटीच्या असलेल्या भागात काय परीस्थिती असेल विचार करण्यासारखे आहे.किती अतिक्रमण झाले केवळ प्रशासनाच्या सहकार्यानेच ते बांधकामे झाली असावीत असे माझे मत आहे.

श्री.प्रमोद राठोड :सरकारी वकीलाचा अभिप्राय मागविला महापालिकेचा विघी विभाग निष्क्रीय आहे काय ? याच वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात.

मा.महापौर :एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे.

श्री.नारायण कुचे :अतिवृष्टीमूळे अनेक लोकाच्या घरात पाणी गेले घरे वाहून गेली या संदर्भात संबधीत कार्य. अभियंता यांना वारवांर संपर्क करूनही प्रशासनाचे कुणी अधिकारी तेथे पाहणी करण्यासाठी आले नाही. अंबिकानगर भागातील नाला अदयापपर्यत साफसफाई का करण्यात आला नाही खुलासा घ्यावा.

श्री.नासेरखॉन : १५ दिवसापूर्वीच्या पावसाने अजबनगर विजय कॉलनी माजी खासदार अंकुशराव टोपे यांचे बंगल्या समोर मोठया प्रमाणात पाणी वाहत होते आजही कालच्या पावसामूळे तेथे पाणी आहे.या बाबतीत प्रशासनाशी संपर्क साधला असता दुरध्वनी उचलला नाही.याच प्रमाणे शिवाजी महाराज यांचा पुतळा क्रांतीचौकापासून येणारे सर्व पाणी सिल्लेखाना गौतमनगर भागातून वाहत जाते.तेथील नाल्याची रूंदी व खोली किती आहे या संदर्भात मा. आयुक्त व शहर अभियंता यांना कल्पना दिली कार्यवाही झाली नाही. ८ फुट नाल्याची खोली असताना त्यात ६ फुट गाळ साचलेला दिसून येतो.नाल्याची रूंदी व

खोली कमी झाल्याने कालच्या पावसाचे अनेक लोकाच्या घरात पाणी गेले आताही ती परीस्थिती बघू शकतो.नाले साफ होत नाही परंतु सर्वजण त्यामूळे बदनाम होत आहे.कुठेही साफसफाई झाली नाही विजयकॉलनीत पाणी वाहते अधिका-यांना कल्पना दिली कुणीही आले नाही.आपण या शहराचे महापौर आहात सर्व नागरीकांचे व सभागृहातील सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे सिल्लेखाना ,महाजन कॉलनी व अजबनगर येथील नाल्याची परीस्थिती सध्या कशी आहे खुलासा घेण्यात यावा.

श्री.संजय केनेकर :दोन दिवसापूर्वी मा.कॅबीनेट मंत्री यांची गाडी पावसाच्या तुंबलेल्या पाण्यात उभी होती तरी प्रशासनाचे अधिकारी तेथे आले नाही

श्री.बाळासाहेब मुंडे :आज पुन्हा पाऊस येण्याची शक्यता आहे जयभवानीनगर भागात नाल्याचे पाणी येवून लोकांच्या घरात पुन्हा जावू शकतो त्यासाठी काय उपाययोजना केली आहे.

श्री.प्रमोद राठोड :१० फुट रूंदीचे गल्ली २ फुट झाले त्यामूळे ही परीस्थिती निर्माण होते. नाले अरूंद होण्यास व त्यात बांधकामामूळे झालेला गाठ होवू देण्यास जे अधिकारी दोषी असतील त्याची चौकशी करून त्यांचेवर कार्यवाही करावी.

सौ.साधणा सुरडकर :एक एक विषयावर खुलासा घ्यावा.

श्री.खाजा शरफोद्दिन :नाल्यावर बांधकामे का झाली खुलासा दयावा आता लोक वाहून गेले त्या लोकांना न्याय दयावा.

श्री.संजय जोशी :शिवराज कॉलनी, राजनगर, मयुरबंध उल्लानगरी भागातील नाल्यावर असलेल्या बांधकाम बाबत शहर अभियंता यांना सर्वे करून कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :झांबड इस्टेटमध्ये १०० घरात पाणी गेले अधिका-यांना बोलविले कुणीही आले नाही त्यामूळे प्रशासनाचा मी निषेध करतो.

श्री.प्रमोद राठोड :वार्ड ९८ मध्ये अतिवृष्टीमूळे लोक ांच्या घरात पाणी जावून मोठे नुकसान झाले.२४ तासात कुणीही अधिकारी तेथे आले नाही.

श्री.विजय वाघचौरे :कोकणवाडीत सार्वजनिक बांधकाम विभागाची नाल्यात भिंत पंडली मटेरियल काढलेले नाही त्यांना नोटीस दिली का ?तो गाळ कोण काढणार खुलासा करावा.

श्री.मीर हिदायत अली जुन्या शहरात पावसाळयात मोठी घाण होते परंतु टाउन हॉल ते आझ ाद चौक पर्यत नाला साफ केलेला आहे.त्या बद्दल प्रशासनाचे अभिनंदन करतो.साफसफाई केलीच नाही असा अरोप करणे योग्य नाही जेथे साफसफाई झाली नाही त्या बाबतीतच चर्चा करावी

सौ.खान नुझत तरन्नुम :माझ्या वार्डात नुरकॉलनी टाऊन हॉलच्या नाल्याची संरक्षित भिंत बांधण्याच्या कामास ६ महिण्यापूर्वी मान्यता झाली अदयाप काम झालेले नाही.

मा.महापौर :शहर अभियंता नाले साफसफाई व इतर विचारलेल्या सर्व प्रश्नाचा खुलासा करावा.

शहर अभियंता :शहरात मध्यवस्तीतून एकूण १३ नाले वाहतात सुमारे ६४ कि.मी. या नाल्याची लांबी असून असे मोठे नाले साफसफाई करण्याचे काम

महापालिकेने २-३ महिण्यापूर्वी हाती घेतले आहे. टप्प्याटप्याने काम सुरू होते.पावसाळा सुरू होण्याच्या अगोदर बरेच नाले जेसीबी, मनुष्यबळाचा वापर करून साफ केलेले होते. आजही सफाईचे काम चालू आहे.७०-८० टक्के नाले ज्यामूळे मध्यवस्तीला पावसामूळे मोठा धोका पोहचू शकतो असे नाले साफ केले त्याचे छायाचित्र काढलेले आहे.

श्री.नासेरखॉन :अधिकारी चुकीचा खुलासा करीत आहे. सिल्लेखाना येथील नाला साफ झालेला नाही.

शहर अभियंता :सिल्लेखाना येथे नाला नसून नाली आहे.ती सहा फुट रूंद आहे.

श्री.नासेरखॉन :सिल्लेखाना येथे नाला आहे नाली नाही चुकीची माहिती देवू नये.चौकशी करून तुर्त तेथील पाहणी व्हावी.

मा.महापौर :नाल्यावर अतिक्रमण असेल तर त्वरीत काढण्याचे आदेश केले जातील

शहर अभियंता रात्रीच्या पावसामूळे सखोल भागात पाणी शिरले ही सत्य परीस्थिती असून स.श्री. संजय जोशी यांचे वार्डात पाहणी साठी गेलो तेथे १०-१२ घरामध्ये २-३ फुट पाणी होते तेथून वाहत असलेल्या नाल्याची रूंदी अनधिक्रृत बांधकामामूळे कमी होवून २-३ फुट झालेली आहे त्यामूळे पाणी मावत नाही

श्री.त्र्यंबक तुपे :शहरात किती ठिकाणच्या नाल्याची पदाधिकारी व प्रशासनाने पाहणी केली.अतिक्रमण झाल्याचा प्रकार सर्व नाल्यावर दिसतो माहिती घेवून कार्यवाही व्हावी.

श्री.संजय जोशी :नाल्यावरील अतिक्रमण काढावे एका भागातील काढून परीस्थिती सुधारली तर इतर भागातही तीच कार्यवाही करावी.आज रोजी नाल्यावर अतिक्रमण चालू आहे इमारत बांधकाम झाल्यानंतर संबधी व्यक्ती न्यायालयात दाद मागेल.आहे ते तसेच राहिल.

मा.महापौर :नाल्यावरील अतिक्रमणाची त्वरीत पाहणी करून त्या बाबतीत त्वरीत अमलबजावणी करावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :नाल्यावर झालेले अतिक्रमणे त्वरीत काढण्याचे आदेश दयावे.

श्री.विकास जैन :माझे वार्डात नाल्यावर अतिक्रमण नाही परंतु नाला साफसफाई न झाल्यामूळे जेष्ठ नागरीक श्री. पदमाकर मुळे यांचे घरात कालच्या पावसाचे पाणी गेले सदर नाला साफ करण्यासाठी २ लक्ष खर्च लागणार असून काम सुरू केले परंतु २ तासानंतर पुन्हा बंद केले त्या संचिकेवर मंजूरी नसल्याचे सांगण्यात आले २ लक्षच्या कामासाठी संचिका प्रलंबीत ठेवली जात असेल तर योग्य नाही सदर नाला सफाईचे काम होईल की नाही खुलासा घ्यावा.

श्री.संजय जोशी :४ वर्षापूर्वी नाल्यावरील अतिक्रमणा बाबतचा अहवाल तयार केला होता.त्यानुसार कार्यवाही केली तर हा प्रश्न उदभवणार नाही.

श्री.सुरेद्र कुलकर्णी :शांतीनिकेतन,जवाहर कॉलनी तसेच त्रिमुर्ती चौकाजवळ कसबेकर तेल भांडारच्या बाजूला असलेल्या नाल्यात टाकलेले पाईप चोकअप झाले रस्त्यावर पाणी येवून लोकाच्या घरात गेले.मोठे नुकसान झाले

ते चोकअप आजपर्यंत का काढले नाही ही परीस्थिती सर्व भागात झालेली आहे

श्री.त्र्यंबक तुपे :नाले सफाई होत नाही काही नाले तातडीने साफसफाई करणे आवश्यक आहे. बऱ्याच संचिका तयार आहे परंतु त्यावर मा.आयुक्तांची मंजूरी होत नाही प्रशासनाने खुलासा करावा. फंड नसतील तर उपलब्ध करावे. तरतुद करावी.

श्रीमती भाले प्राजक्ता :आझाद चौकात ९ घरामध्ये पाणी शिरले ३ घरामध्ये मोठया प्रमाणात पाणी होते त्या लोकांना मी व वार्डातील काही नागरीकांनी सुरक्षित ठिकाणी हलविले.तसेच मातामंदीर हे पूर्ण पाण्यात होते.या भागात घरापेक्षा रस्त्याची उंची वाढलेलीआहे त्यामूळे असा प्रकार होतो.या बाबत उपाययोजना करण्याचे प्रशासनाला सुचविले होते कार्यवाही झाली नाही.

श्री.प्रमोद राठोड :नाल्यावरील अतिक्रमण काढणे व नाले साफसफाई होणे हीच सर्वांची मागणी आहे. मा.पालकमंत्री यांनी सुध्दा नाल्याची पाहणी केली अदयाप कार्यवाही केली नाही.

श्री.नासेर खॉन :माझे वार्डात नाल्यावर अतिक्रमण नाही तेथील नाले साफ करावे.

श्री.त्र्यंबक तूपे :मा. पालकमंत्री यांनी नाल्याची पाहणी केल्यानंतरही अदयाप साफसफाई झालेली नाही.

सौ. सुनिता सोनवणे :अमरप्रीत हॉटेलच्या मागिल नाल्याचे काम अदयाप केले नाही आजही ड्रेनेजचे पाणी लोकाच्या घरात जाते तसेच श्री. टोपे, अजबनगर, खोकडपुरा यांचे घरासमोर मोठया प्रमाणात पाणी साचते.येथील काम अर्धवट आहे.खुलासा घेण्यात यावा.

श्री.सुशिल खेडकर :वार्ड इ व फ किंवा शहरात ज्या ठिकाणी पावसामूळे अशी परीस्थिती उदभवली तेथील नाल्याची मा.महापौर, मा.आयुक्त व सर्व पदाधिकारी विरोधीपक्ष नेता व त्या त्या वार्डातील स.सदस्यांना सोबत घेवून पाहणी करावी व तेथील परीस्थिती बघून तातडीने काम करण्याचे आदेशीत करावे.विरोधी पक्ष नेता यांनी अशा कामासाठी शासनाकडून निधी आणण्यासाठी प्रयत्न करावे.आता विषयपत्रिकेला सुरूवात करावी.

डॉ.खॉन नुझत तरन्नुम :नुरकालनी भागात नाल्याचे संरक्षित भिंतीचे व स्लॅब टाकण्याचे काम आहे अदयाप होत काम मंजूर होवून ६ महिणे झाले या संदर्भात मा.विभागीय आयुक्त ,मा.आयुक्त तसेच शहर अभियंता यांना पत्रही दिले सदरचे काम त्वरीत करण्याचे आदेशीत करावे.

श्री.आनंद घोडेले :नारेगाव भागात पावसाच्या पाण्यामूळे लोकांच्या घरात पाणी गेले महापालिकेच्या वतीने या लोकांना शाळेमध्ये त्वरीत सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केली त्याबध्दल प्रशासनाने अभिनंदन करतो.

श्री.महेश माळवतकर : नाले सफाई केली तेथे पाहणी झाली का एन-९ पासून एसपी कार्यालयाकडे नाला जातो तो फक्त सत्संगभुवन पर्यंत बांधला मागिल भाग पडघाईस आलेला असून नाला सफाई कचरा काढला जातो परंतु नाल्यातील दगड माती व त्यात अडकलेला कचरा काढला जाते की नाही हे नाले सफाई करतांना पाहणी केली पाहिजे.किर्ती मंगल

| | |
|---|---|
| | कार्यालयापासून सोसायटीपर्यंत जेसीबीने नाला साफ केला परंतु त्या अगोदर एम-२ भागात त्याच नाल्यात दोन्ही बाजूने मातीचे ढिगार पडलेले आहे जेथे कचरा काढला जातो तेथे ती माती येवून बसते. जो खर्च होतो तो वाया जातो.नाले सफाई केवळ पावसाच्या सुरवातीलाच न करता पावसाळयात ४ ही महिने सफाईचे काम चालू असावे.चोकअप झालेले नाल्यातील पाईपची व्यवस्था केली जात नाही.वर्षानुवर्ष नाल्यावर खर्च केल्याचे दाखविले जाते इतर गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज आहे.ज्या नाल्यातून पावसाचे पाणी जाते त्या नाल्याची सतत साफसफाई होणे आवश्यक आहे एम-२ भागात नाल्याची सफाई झालेली नाही पुलाखाली पाईपची सफाई झाली पाहिजे तसेच नाल्यातील गाळ व इतर मटेरियलही उचलले पाहिजे. सुरवातीपासून नाला साफ झाला तर ही योजना सफल होवू शकते हे काम करणार की नाही खुलासा करावा. |
| श्रीमती ज्योती वाघमारे | :वानखेडे भागातील नाल्यास पावसाचे मोठया प्रमाणात पाणी आले त्यात ड्रेनेजचे सुध्दा पाणी होते. लोकांच्या घरात पाणी गेले ६ लोक पाण्यात अडकून पडले महिलानां मोठा त्रास झाला पाण्यामूळे मुले शाळेत गेली नाही.नाल्यास संरक्षित भिंत व पूल सिव्हरेज लाईनचे काम होणे आवश्यक आहे. |
| श्रीमती प्रिती तोतला | :औषधी भवन जवळील नाला साफ केला नाल्यातील मटेरियल गाळ हा नाल्याच्या बाजूला टाकला त्यात मोठे अळया झाल्या. १५-१६ लोकांना गॅस्ट्रोची लागण झाली मोठया प्रमाणात रोगराई परसरी गोरगरीब जे जे तुटपुंज्या पगारावर अवलंबून आहे व त्यांना असे आजार झाल्यास खर्च करून शकणार नाही अशा वेळी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | स.रेणुकादास वैद्य यांनी म्हटलेल्या नाला व दशमेश नगर, प्रतापनगरचा नालेवर अतिक्रमण नसतांना साफ झालेले नाही.त्यामूळे लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे.आताच स.सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे इतर लहान मोठी कामे असतील ती सुध्दा झाली नाही. १-२ लाखांची कामे देखील थांबलेली आहे. मा.पालकमंत्र्यांनी कृती आराखडा तयार करण्यास अश्वासन दिलेले आहे. |
| मा.महापौर | :सदस्यांच्या भावना समजल्या आता अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :अर्थसंकल्प मंजूर नसल्याने संचिकेवर सहया होवू शकतात. त्यासाठी अधिका-यांना एक ठराव धेवून अधिकार दयावे. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | :आपतकालीन निधी ठेवलेला असतो बजेट मंजूर पाहिजेच असे काही नाही आपतकालीन कामे प्रशासन करू शकते. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :६७ कोटीची बिले लेखा विभाग पडून आहे. ८५ कोटीचे स्पील ओव्हरची कामे करणे आहे.जोपर्यंत बजेटवर सर्वसाधारण सभा निर्णय घेणार नाही तोपर्यंत विकास कामे होणे अपेक्षीत नाही. |
| श्री.संजय चौधरी | : १० दिवसापूर्वी चिकलठाणा परीसरात अतिवृष्टी होवून मस्जीदमध्ये पाणी शिरले तेथे विदयार्थी वस्तीगृह असून तेथील अन्न धान्य पुर्णपणे |

खराब झाले तसेच चौधरी कॉलनीतही लोकांच्या घरात या पावसामूळे पाणी गेले संबधीत अधिकारी यांनी पाहणी केली परंतु संचिका मंजूरीसाठी आहे असे उत्तर दिले जाते.

श्री.विजय वाघचौरे :सार्वजनिक बांधकाम विभागाची संरक्षित भिंत पडण्याच्या स्थितीत होती याची कल्पना मागिल सभेत मी दिली कालच्या पावसामूळे लोकांच्या घरात पाणी शिरले लोकांना त्याच घरामध्ये नाविलाजाने परत जावे लागले पाठी मागे नाल्यात पुर्ण २०० मीटरची भिंत पडली.पुन्हा तेथील लोकांना धोका होवू शकतो.तेथील पाहणी केली का ?

शहर अभियंता :नाल्याची साफसफाई ही एक महिण्यापूर्वी सुरू केली आताही सफाईचे काम चालू आहे.पावसाळयातही काम चालू राहिल लहान नाल्यात गाळ साचला पाणी प्रवाह होत नाही अशी कामे तातडीचे करण्याचे प्रशासन हाती घेत आहे.अतिवृष्टीमूळे जे जे नुकसन झाले त्याचे सर्वेक्षण केले शासनाकडे निधी साठी पाठपुरावा केला जाईल.

श्री.खाजा शरफोद्दिन :लोकांच्या घरात पाणी गेले ते बेघर झाले त्यांना शाळेत सुरक्षित ठिकाणी व्यवस्था केली अशा अशा लोकांना किती मदत केली.

श्री.विकास जैन :सर्वाचे मत आपण जाणून घेतले.सर्वच ठिकाणी मा.आयुक्त जावून पाहणी करू शकत नाही.त्यामूळे प्रभाग समितीचे उपअीयंता व कार्य. अभियंता यांचेकडे वार्डाची जबाबदारी दिलेली आहे अशा अधिका-या त्या त्या समितीच्या अंतर्गत येणा-या भागात पाहणी करण्याचे आदेशीत करावे कुठे नुकसान व हाणी झाली अहवाल घ्यावा व सदर ठिकाणी कामे करणेसाठी तातडीचे काम म्हणून संबधीत अधिकारी यांना अधिकार देण्यात यावे प्रभाग समितीला २ लाख दिले यामूळे वार्डातील तातडीची कामे होतील. दोन गोष्टी एकत्र एक नाले सफाई,ड्रेनेज ना दुरुस्त.

श्री.संजय केनेकर : नाल्यातील ड्रेनेज लाईनचे पाणी पावसाच्या पाण्यात मिसळून लोकांच्या घरात गेले विष्णुनगरचा नाला साफ केला पण नाल्यात चोकअप ड्रेनेज लाईन दुरूस्त केली नाही इतरत्र हीच परीस्थिती आहे नाला सफाई करणे व त्यातील ड्रेनेज चोकअप काढले या दोन्ही कामाचा समन्वय नाही. ड्रेनेज लाईन ३-३ दिवस दुरूस्त होत नाही.नाले साफ करतांना ड्रेनेज लाईन चोकअप असेल तर ते ही काम व्हावे. दोन्ही गोष्टी वेगळया करावे. नालासफाई ड्रेनेजसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य: :वार्ड अधिकारी , उपअभियंता यांना आवश्यक तातडीच्या कामासाठी खर्च करण्याचे अधिकार दयावे पावसाच्या पाण्याने ज्या ठिकाणी नुकसान झाले तेथील पाहणीसाठी संबधीत त्या त्या वार्डचे अधिकारी यांना नियुक्त करावे नगर सेवकांना बरोबर घ्या यादी करा त्यांचा अहवाल घेवून आवश्यक ती कामे त्या ठिकाणची करण्यात यावी. कलम ६७ (३) (क) अंतर्गत कामे करण्याचा मा.आयुक्तांना अधिकार आहे. कामे करण्यासाठी मा.आयुक्तांना सूचना करण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :माझे वार्डात नाल्यावर अतिक्रमण नसतांना काम होत नाही सिडको हडकोत मुख्य नाल्यास जोडून अनेक नाले असून कॉलनीतील पावसाचे पाणी प्रवाह होण्यासाठी अनेक ठिकाणी पाईप टाकले ते वेळीच साफ होत नसल्याने मोठया प्रमाणात पाऊस झाल्यानंतर पावसाचे पाणी लोकांच्या घरात जाते.सलीम अली सरोवरात वार्ड १४,१५ मधील सर्व पावसाचे पाणी वाहून जाते पाईप चोकअपमूळे बाजूच्या घरात पाणी गेले अशा ठिकाणी मोठे साईजचे पाईप टाकण्याची गरज आहे वार्ड अधिकारी व संबधीत अभियंता यांना अशा कामासाठी खर्चाचे अधिकार देण्यात यावे हर्सुल फुलेनगर भागात नाल्यावर अतिक्रमण नसतांना नाल्याची साफसफाई झाली नाही अनेकांच्या घरात पाणी गेले नागरीकांना त्रास झाला.प्रशासन याकडे का लक्ष देत नाही.

मा.महापौर :१२ महिने नाल्याची साफसफाई सतत होईल.अतिक्रमण असेल तर त्वरीत काढले जातील.

श्री.संजय जोशी :सध्या १२ ही महिने नाले वाहत होते. आता नाईट सॉइल वाहते शहा कन्स्ल्टन्सीने केलेल्या सर्वेनुसार लाईन टाकल्या गेल्या असत्या तर ही परीस्थिती निर्माण झाली नसती नागरी वस्तीचा व्याप अपार्टमेंट, लोकसंख्या लक्षात घेवून ड्रेनेज लाईन टाकली जात नाही.नाल्यातील आज रोजी सर्व ड्रेनेज लाईन फुटलेल्या असून फक्त कॉलनीतील लाईन अस्तित्वात आहे.बोअरचे पाणी सुध्दा खराब आहे आंघोळीच्या कामाचे नाही. यावर चर्चा झाली निर्णय झाले कार्यवाही काहीच नाही. शहरातील सर्व नाल्याचा सर्वे करून कुठे ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे सर्व प्राजेक्ट केला तर भविष्यासाठी काम करण्यास मोठा निधी उपलब्ध करून घेता येईल नाल्यात जे पाणी वाहते ते १५ दिवसात बंद होईल.

श्री.प्रमोद राठोड :या परीस्थितीला जे जबाबदार अधिकारी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी यासाठी काय उपाययोजना करणार खुलासा घ्यावा.

मा.महापौर :सर्व प्रभाग समित्यांना २ लक्ष पर्यत तातडीच्या कामासाठी अधिकार दिलेले आहे.आवश्यक तेथे त्यांनी काम करावे आवश्यक भासल्यास आणखी तरतूद उपलब्ध करून दिली जाईल.औषधीभवनच्या बाबतीत पीपल्स बँक व श्रीमान श्रीमती या दुकानच्या मालकांना अनेकदा इमारतीचा खालचा कचरा काढण्यासाठी नोटीसा दिलेल्या आहे पुन्हा नोटीसा देण्यात याव्यात इमारतीखालील कचरा काढला नाही तर दंडात्मक कार्यवाही केली जाईल

मा.महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(वेळ दु.१.३५ वा.पुन्हा सभा दु. २.२० वाजता)

श्री.मीर हिदायत अली :सिटीचौकात ४X४ साईचे होर्डिंग लावलेले होते त्या संदर्भात ज्यांचे होर्डिंग होते अशा ३-४ लोकांवर महापालिकेने संबधीतानी पैसे न दिल्यामूळे नोटीस न देता डायरेक्ट पोलीसात गुन्हा दाखल केला इतर ठिकाणी अशा होर्ल्डींग आहेत त्या काढल्या जात नाही नोटीस न देता डायरेक्ट कार्यवाही करता येते का खुलासा करावा.

| | |
|---|---|
| श्री.गिरजाराम हाळनोर | :विषयपत्रिकेला सुरूवात करावी होर्डीग संदर्भात विषय आहे त्यावेळी चर्चा करावी. |
| श्री.मीर हिदायत अली | :होर्डीग बाबत खुलासा करावा शहरात अनेक ठिकाणी असे जाहिरात फलक लावलेले आहे.त्या बाबतीत का कार्यवाही होत नाही. |
| श्री.समीर राजूकर | :लेमनट्री हॉटेलमध्ये समातंर जलवाहिनी संदर्भात ४ दिवस बैठक झाली त्या बैठकीत काय निर्णय झाले शहर अभियंता यांनी खुलासा करावा. |
| उप आयुक्त (सिडको) | :होर्डीग संदर्भात मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे श्री.पंढरीनाथ जाधव यांनी जनहित याचिका क्रमांक. ५४६/२००६नुसार दाखल केली होती.सदर याचिकेचा निकाल मागिल महिण्यात लागलेला असून मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केल्यानुसार अनधिकृत होर्डीग काढून संबधीतावर गुंन्हे दाखल करण्याची कार्यवाही करीत आहोत. |
| श्री.मीर हिदायत अली | :शहरात १०० पेक्षा जास्त अनधिकृत होर्डीग असतील त्यांचेवर का कार्यवाही होत नाही अधिकारी कार्यवाही करीत नसेल तर मी स्वत: मा.उच्च न्यायालयात कन्टेम ऑफ कोर्टची याचिका दाखल करून अधिका-यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार आहे. |
| श्री.प्रमोद राठोड | : ठराविक भागातच कार्यवाही होते संपूर्ण शहरात पाहणी करावी फक्त २४ होर्डीग नसून अनेक ठिकाणी अनधिक्रृत होर्डीग आहेत. पैसे देत नाही त्यामूळे गुन्हे दाखल केले जात असेल तर योग्य नाही.. |
| श्रीमती रेखा जैस्वाल | :सर्वासाठी समान नियम असावेत. |
| मा.महापौर | :या संबधी चौकशी करून कार्यवाही केली जाईल. |
| श्री.मीर हिदायत अली | :उदया पर्यत इतर होर्डीग न काढल्यास प्रशासनाविरूध्द मी कन्टेम ऑफ कोर्टची याचिका दाखल करेल संबधीत लोकांनी पैसे न दिल्यामूळे त्यांचेवर गुन्हें दाखल केले ज्यांनी ही कार्यवाही केली त्यांचेवर काय कार्यवाही करणार शहरात फक्त ३ होर्डीग आहेत का खुलासा घेण्यात यावा. |
| मा.महापौर | :या बाबतीत पुर्ण चौकशी करून घेतली जाईल नियमाने कार्यवाही केली जाईल. |
| श्री.समीर राजूरकर | :समांतर जलवाहिनी बाबत खुलासा मागविला तो करण्यात यावा. |
| मा.महापौर | :कार्य.अभियंता या बाबतीत खूलासा करतील. |
| श्री.समीर राजूरकर | :शहर अभियंता यांचेकडून खुलासा अपेक्षीत आहे महापालिकेची सिस्टीम बदलावे कनिष्ठ पेक्षा वरीष्ठ अधिका-यांना याची माहिती पाहिजे |
| श्री. प्रमोद राठोड | :प्रोटोकॉल सिस्टम प्रमाणे संबधीताकडून खुलासा घेण्यात यावा. |
| श्री.कृष्णा बनकर | :शहर अभियंता यांनी खुलासा करावा शहर अभियंता यांना समांतर जलवाहिनी बाबत माहिती आहे किंवा नाही. शहर अभियंता आहेत किंवा नाही ? |
| शहर अभियंता | :या बैठकीला मी उपस्थित नव्हतो. |
| श्री.संजय जोशी | :बैठकीला उपस्थित नव्हते तर प्रशासनाने त्यांचेवर काय कार्यवाही केली. |

| | |
|---|---|
| श्री.कृष्णा बनकर | :बैठकील हजर नव्हते की राहू दिले नाही खुलासा करावा. |
| शहर अभियंता | :हा प्रकल्प कार्य. अभियंता यांचेकडे असल्यामूळे त्यांचेकडून खुलासा घेणे योग्य होईल. |
| श्री.संजय जोशी | :कार्य. अभियंता यांनी नेमणूक कुणी केली यापूर्वीही समांतर जलवाहिनी संदर्भात चर्चा झाली टेंडर व जे काही कागदपत्र तयार करणार ते सर्व सभागृहाच्या निदर्शणास आणून देवून टेंडर काढावे असे ठरले असे असतांना समांतर जलवाहिनी संदर्भात काही टेंडर काढले.यापूर्वी १६७ कोटीचे पाण्यासाठी प्रशासनाने परस्पर टेंडर काढले त्यात पाण्याच्या लाईन टाकणार होते परंतु पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या त्या टाक्यामध्ये आजही पाणी भरले जात नाही.शिवाजीनगरची टाकी बांधून ८ वर्ष झाले आजही पाणी त्यात पडत नाही त्यावेळी कोणते काम करावे हे प्रशासनाच्या लक्षात आले नाही.त्यासाठी समांतर जलवाहिनी संदर्भात जी ही कामे करणार टेंडर काढणार ते सर्व सभागृहासमोर आणावे त्यानंतर टेंडर काढावे शिवाजीनगर येथील पाण्याच्या टाकीत आजही पाणी का जात नाही |
| श्री.प्रमोद राठोड | :शासकीय अभियांत्रिकी कॉलेजमधील टाकीत पाणी जात नाही, तांत्रिक अडचण आहे. माहिती घ्यावी. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :१६७ कोटीच्या निवीदा झाली ते काम एमजीपीकडे होते. |
| श्री.संजय जोशी | :.एमजीपीने काम केले असले तरी खर्च महापालिकेने केला प्लॅनींग कोणी दिले. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :प्लॅनींग एमजीपीचे होते. |
| श्री.संजय जोशी | :प्लॅनींग एमजीपीचे खर्च महापालिकेची हे योग्य नाही. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :तेंव्हा ती स्कीम आपल्याकडे नव्हती. |
| श्री.संजय जोशी | : सभागृहाला विश्वासात न घेता एजन्सीने तेंव्हा काम केले तसाच प्रकार क्रिशील या एजन्सीच्या बाबतीत होईल प्लॅनीग,अहवाल एजन्सीनेच तयार केला हे ऐकायला मिळेल.पुर्वीसारखे होवू नये त्यासाठी काय कामे करावी लागणार ते सभागृहा समोर आणावे. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :एमजीपीचे फोर्स डेव्हलप न करता पहिल्यांदा टाक्या बाधंल्या यास महापालिकेचे कुणीही दोषी नाही |
| श्री.संजय जोशी | :टाकी बांधतांना कमीशन जास्त मिळाते लाईन टाकतांना तेवढे पैसे कॅश भरावे लागतात.शिवाजीनगरची टाकी बांधली तेवढया खर्चात डिस्टीब्युशन लाईन शहरात टाकल्या असत्या तर जो प्रकार लाईन फुटण्याचा आज होतो तो झाला नसता.विश्वभारती कॉलनीत पाण्याच्या टाकीत रात्री १२ वाजता पाणी पडायला सुरूवात होते सकाळी ६ वाजपर्यंत टाकी भरली जात नाही टाकीत पाणी भरले जाणार नव्हते तर खर्च कशासाठी केला.हाच प्रकार क्रिशील एजन्सी या योजनेमध्ये करणार त्यासाठी जे काही काम करणार आहे सभागृहा समोर आणावे त्यानंतर कार्यवाही करावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :महानगरपालिका प्रशासनाची जवाबदारी नव्हती. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :दोन्ही योजना वेगवेगळया आहे टाकीत पाणी का पडत नाही खूलासा केला. |

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :पाणी टाकीत पडणार नव्हते बांधल्या कशासाठी आता त्या खर्चास जबाबदार कोण ?माझे मते प्रशासनाचे अधिकारी सुध्दा जबाबदार आहे. |
| श्री.संजय जोशी | :आजही राजनगरमध्ये शिवराज कॉलनीत रेल्वे पटरीच्या जवळ एमजीपीकडून पाईप लाईन टाकली जात आहे ४-५ वर्ष पॅरलल लाईन होत नाही तोपर्यत टाकीत पाणी पडणार नाही. आजचहा खर्च करण्याची गरज काय ?तोच निधी शहरातील डिस्ट्रीब्युशन लाईनवर खर्च केले तर शहरातील पाणी पुरवठा सुधारेल.क्रिशील एजन्सीने काय प्लॅनींग केले खुलासा घ्यावा. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :जी निविदा काढली त्यास सभागृहाने मान्यता दिली पब्लीक प्राव्हेट पार्टनरशीपमध्ये काम करणार आहोत.यासाठी शासनाकडून ४४० कोटी निधी मिळणार असून उर्वरीत २००-२५० कोटी लागणार असून तो निधी महापालिकेकडे नसल्याने प्राव्हेट एजन्सी नेमून ही योजना पुर्ण करणार आहोत.अशा आकृतीबंधला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली.त्यात पहिली स्टेप संपली आहे.त्यात पात्रतेनुसार कशा प्रकारे पार्टनरशीप पाहिजे एकूण ९ एजन्सीना बोलवले २ एजन्सीना डिसकॉलीफाईड केले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :भुसपांदनाची कार्यवाही केली नाही १०८ कोटीची निविदा कशासाठी काढली. |
| श्री.संजय जोशी | :१४ तारखेला काढले २० तारीख टेंडर भरण्याची शेवटची आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :भुसंपादानाची कार्यवाही झाली नसतांना टेंडर का काढले. |
| श्री.संजय जोशी | :प्रत्येक शेतक-याची ५ मीटर रूंद जमीन लागणार आहे. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :एकुण ३ निवीदाची ६३८ कोटीची निविदा ऑलरेडी पब्लीश झालेली आहे.आता आरएफपी स्टेज चालू आहे एजन्ीचे महापालिकेला जवळपास ३८८ लहान मोठे प्रश्न केले एजन्सीला २००-२५० कोटी टाकावे लागणार त्यासाठी एजन्सी सर्व बाबी पडताळून घेईलच शंका नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :महापालिकेत बैठक घेतली नाही येथे शांतता नाही का ? |
| श्री.संजय जोशी | :भुसंपादनाची कार्यवाही झाली का टेंडर काढतांना सभागृहाच्या निदर्शनास आणून दयावे असा निर्णय झाला असतांना टेंडर का काढले. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | : ॲग्रीमेंन्ट जेव्हा करणार त्यासाठी ज्या अटी शर्ती असणार ते सभागृहच ठरविणार आहे. |
| श्री.संजय जोशी | :अटी शर्ती हा प्रशासनाचा व टेंडरमध्ये काय पाहिजे हा सभागृहाचा विषय येतो त्यासाठी सभागृहासमोर येणे आवश्यक आहे परस्पर टेंडर काढले गेले.हे धोरण योग्य नाही. |
| कार्य.अभि.(श्री.पानझडे) | :६३८ काटीत हेडवर्क ,ट्रीटमेंन्ट प्लॅन्ट, एमबीआरसाठी जागा उपलब्ध आहे. पाईपलाईनसाठी जागा घेण्याचे काम नगर रचना विभागाकडून होत आहे.याच बरोबर डिस्ट्रीब्युशनचे काम करावयचे असून जागा संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात प्रस्ताव गेलेला |

असून त्या संबधीची फिस भरणा केली ६-७ महिण्यात भुसंपादनाची देखिल कार्यवाही होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :गंभीर बाब आहे महत्वाचा विषय यात इंटरेस्ट जपण्यास का घाई होते.

श्री.संजय जोशी :कार्यवाही चालू नाही चुकीची माहिती देवू नये.वाटर ट्रिटमेंन्ट प्लॅन्ट,डिस्टीब्युशन लाईन एकाच वेळी होवू शकते. डिस्ट्रीब्युशन लाईनचा नकाशा अदयाप तयार नाही.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :डिस्ट्रीब्युशनचा नकाशा तयार आहे.

श्री.संजय जोशी :लाईनची साईज पाहिजे नुसता नकाशा नको.

श्री.काशिनाथ कोकाटे :समांतर जलवाहिनीद्वारे पाणी मिळावे सर्वांचीच इच्छा असून ५ वर्षापासून कार्यवाही चालू आहे.सुरूवातीस बीओटीवर हे काम करायचे ठरले वेळेवर झाले नाही त्यामूळे २००-२५० कोटी टाकावे लागणार असे चित्र निर्माण झाले शेवटी बीओटीचा प्रकार आहे. सभागृहाने सहा महिण्यापूर्वी मान्यता दिली की तात्काळ निविदा काढाव्या यासाठी शासनाकडे मा.खासदार श्री.खैरे, महापालिमका आयुक्त, मा.ना शरद -चंद्रजी पवार यांचे माध्यमातून मा.श्री.जयपाल रेडडी यांचेकडे एक प्रत गेली मंजूरीसाठी सर्वांनी पुढाकार घेवून शासनाने यासाठी ४४० कोटी देण्याचे मान्य केले.जनतेच्या हिताच्या दृष्टीने योजना महत्वाची आहे ही योजना त्वरीत व्हावी.भुसंपादनाची कार्यवाही प्रशासनाने करावी

श्री.रेणूकादास वैद्य :या योजनेसाठी मा.खासदार तसेच जिल्हयातील सर्व पदाधिकारी नगरसेवक व प्रशासन प्रयत्नशील आहे.जनतेचे हित जपणे आपले काम आहे.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली परंतु या योजनेच्या संदर्भाने जे काही करावे लागणार ते या सभागृहासमोर आणावे साधक बांधक चर्चा होवून निर्णय घेता येईल असे ठरले .परंतु सभागृहासमोर काहीही न आणता डायरेक्ट निविदा काढल्या हे चुकीचे आहे.यात निश्चितपणे नुकसान होईल त्यासाठी जे काही या योजनेच्या बाबतीत कार्यवाही करायची ते सर्व सभागृहासमोर आणावे त्यास मंजूरी मिळाल्यानंतर कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी :यापूर्वी अनेक एजन्सीने चांगले काम केले नाही तो प्रकार होवू नये म्हणून सभागृहासमोर आणावे सर्व जबाबदार राहतील.

याच वेळी अनेक स.सदस्य एकाचवेळी बोलत असतात.

श्री.संजय जोशी :योजनेला कुणाचा विरोध नाही परंतु परस्पर प्रशासनाने कार्यवाही करू नये भुसंपादनापासून इतर सर्व कार्यवाही केंव्हा होणार हे विचारण्याचा अधिकार या सभागृहाला आहे.भुसंपादना बाबत माहिती घेतली असता संबधीत अधिकारी सांगतात की शासनाचे अधिकारी या कामासाठी नेमलेले आहे याचा अर्थ कार्यवाही सुरू नाही कार्य.अभियंता हे चूकीचा खुलासा देत आहे.

श्री.मीरहिदायत अली :समांतर जलवाहिनीच्या योजने संदर्भात सभागृहात माहिती आली नाही या संदर्भात कमेटी नियुक्त करावी.

| | |
|---|---|
| श्री.गिरजाराम हळनोर | :यावर एक कमेटी करावी आम्ही लवकर कार्यवाही व्हावी म्हणून अग्रेसीव्ह आहेत कायदेशीर बाबी पाहण्यात योजना तात्काळ होण्यासाठी सर्व प्रयत्नशील आहेत.योजनेला अडथळा निर्माण होवू नये म्हणून ज्या काही बाबी करावयाच्या आहेत त्या टेंडरच्या अगोदर व्हाव्यात.या योजने संदर्भात जी काही चर्चा निर्णय होती ते सभागृहापुढे आणावे. |
| श्री.कृष्णा बनकर | :या योजनेचे मोठे काम असून शहर अभियंता यांना माहिती का नाही.की त्यांना यापासून डावलले खुलासा घ्यावा. |
| मा.महापौर | :प्रशासनाच्या पातळीवर या संबधी बैठक झाली त्यात महापौर नव्हते प्रशासन खुलासा करेल. |
| मा.आयुक्त | :४ दिवस समांतर जलवाहिनीच्या संदर्भात लॅमनट्री मध्ये प्री-बीड बैठक झाली या बैठकीत वेगवेगळे ९ बिल्डर्स होते त्यांचे बरोबर त्यांचे विधी, टेक्नीकल फायनन्सस ॲडव्हटाईजर असे २५-३० लोकांचे पथक एका ठिकाणी आले व या एजन्सीने जवळपास २५० प्रश्न उपस्थित केले .या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा होणे आवश्यक होते.या काळात नाल्याची साफसफाई, डागडुजी,पॅचवर्कची कामे सुरू होती.बैठकीत मी जास्त वेळ नव्हतो. बैठकीत प्रश्न विचारले जात होते सर्वच यंत्रणा तेथे लावणे शक्य नव्हते.म्हणून जे पुर्वीपासून या योजनेत काम पाहणारे श्री. पानझडे, विधी विभाग, टेक्नीकल तसेच लेखा विभागाचे ई. अधिकारी होते. युंनीटी या सर्वांच्या माध्यमातून तेथे चर्चा करण्यात आली.कुणाला डावलण्याचा किंवा स्पेसीपिक कुणाकडून काम करून घेण्याचा प्रश्न येत नाही. एकाच वेळी अनेक प्रश्न समोर असल्याने श्री.सोनवणे यांचेकडे नाले सफाई रस्त्याची कामे नाल्यावरील अतिक्रमणाची नोंद करणेची कामे दिली होती.कामाचे वाटप केलेले होते यापेक्षा वेगळे काहीही नाही. |
| श्री. नासेर खान | :शहरात किती टाक्यामध्ये पाणी भरले जात नाही क्रांतीचौक १ पडेगाव येथे ४ टाक्या तसेच भावसिंगपूरा भागातील १ टाकीमध्ये पाणी जात नाही खुलासा घेण्यात यावा. |
| श्री. प्रमोद राठोड | :शहरात टाक्या किती व किती टाक्यामध्ये पाणी भरले जाते. |
| कार्य.अभि.श्री.पानझडे | :वार्ड कार्यालय ब व क मध्ये सर्व टाक्यामध्ये पाणी पडते. |
| श्री.नासेर खान | :दोन दिवसापूर्वी पडेगाव येथील पाण्याच्या टाकीस मा.आयुक्तानी पाहणी केली पाणी पडत नव्हते त्यामूळे पाण्याचे टँकर मागवून घेतले. |
| शहर अभियंता | :क्रांतीचौक येथील ३ ही टाकीमध्ये पाणी पडते.जायकवाडीचे पाणी कमी असल्याने पडेगाव येथील टाकी अंशतः भरली जाते.राणा पेट्रोल पंप जवळील टाकी भरली जात नाही.विहीरी वरुन भरुन पुरवठा केला जातो.जायकवाडीचे पाणी कमी पडत असल्याने कत्तलखाना जवळील टाकी भरली जात नाही.तेथे टँकरने पाणी दिले जाते. |
| श्री.नासेर खॉन | :टाक्या असूनही भरल्या जात नसल्याने भावसिंगपूरा,पडेगाव पेठेनगर भागात ४-५ महिण्यापासून पाणीच नाही. |

| | |
|---|---|
| मा.महपौर | : समांतर जलवाहिनी संदर्भात सर्व पदाधिकारी यांना विश्वासात घ्यावे.बैठकीतील सर्व माहिती लेखी स्वरूपात सर्व पदाधिकारी यांना देण्यात यावी. |
| श्री.प्रमोद राठोड | :शासकीय अभि.कॉलेज जवळील टाकी भरली जात नाही. |
| शहर अभियंता | :ही टाकी २०-२२ वर्षापूर्वी एमजीपीने बांधलेली होती. पाणी भरण्यासाठी पाईप लाईन टाकली नाही त्यामूळे आजपर्यत भरली गेली नाही. |
| श्री.नासेर खान | :प्रशासनाने खुलासा केला यात चुक कुणाची माहिती धेवून आपण कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. |
| श्री.प्रमोद राठोड | :जनतेचा पैसा खर्च करून टाक्या बांधल्या त्यात पाणी नाही तर बांधून उपयोग  नाही. |
| श्री.संजय जोशी | :स्वच्छतेच्या बाबतीत रॅमकी बरोबर मा.महापौर मा.सभापती यांनी बैठका घेतल्या निर्णय झाले त्यानंतर काय सुधारणा करून घेतल्या आजही करारा नुसार एजन्सीने घंटा गाडया दिलेल्या महापालिकेच्या गाडया आहे अनेक कचरा रस्त्याने गाडयातून पडतो.रेग्यूलर कुंडयाची सफाई होत नाही.दोन वेळेस कचरा उचलणार,पुर्णपणे अमलबजावणी झाल्यावर बील देणार  सर्व ठरले. बील दिले का व इतर सर्व बाबतीत खुलासा करावा. |
| शहर अभियंता | :रॅमकी सोबत मा.महापौर यांनी दोन वेळेस बैठक घेतली महापालिकेचे  संबधीत अधिकारी/कर्मचारी उपस्थिती होते एजन्सीला जेव्हा निविदा मंजुर झाली त्यात जी यंत्रसामुग्री   महापालिकेला या एजन्सीने पुरवायचे होते त्यात ३२ रिक्षा वगळता उर्वरीत सर्व सामुग्री पुरविले टेंडर अंतिम होणेसाठी २००६ ते २००९ पर्यत वेळ गेला.यात आणखी लोकवस्ती  वाढली .एजन्सीला १० वर्षासाठी काम दिलेले आहे. |
| श्री.संजय जोशी | :लोकवस्ती वाढली असे उत्तर देणे बरोबर नाही १० वर्षाचा विचार करूनच टेंडर काढलेले असेल.टेंडर १०वर्षासाठी  देणार साफसफाई २००४-०५ ची होणार हे बरोबर नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :१० वर्षासाठी टेंडर दिले १ वर्षानंतर योजना फेल होते १० वर्षाचे पापुलेशन याचा  विचार करून डिजाईन तयार केले नव्हते का ?तसे केले नसेल प्रशासनाची यात चूक आहे  ज्यांनी  डिजाईन तयार केले त्यांचेवर काय  कार्यवाही करणार आहे. |
| शहर अभियंता | :जी यंत्रसामुग्री कमी पडत आहे तो अतिरिक्त खर्च  महापालिकेलाच करायचा आहे.एजन्सीने घंटागाडया पुरविलेल्या आहे. |
| श्री.संजय जोशी | :टेंडरमध्ये असे दिलेले नाही  चुकीची माहिती देवू नये. |
| श्री.महेश माळवतकर | : रॅमकीच्या पूर्वी सिडको हडकोत पूर्णपणे   स्वच्छता होत होती. २-४ कुंडयातील कचरा घेवून जातांना रस्त्यावर पडतो.स्कीप लोडर अजूनही दिले नाही कचरा  उचलल्यानंतर  पावडर टाकली जात नाही आज २५ तक्रारी कचरा रस्त्यावर पडल्याच्या सदस्यांना येतात.रॅमकीचा करार रद्य करणार अशा बातम्या येतात एजन्सीकडे जबाबदारी दिली तर त्यांत सुधारणा का होत नाही. |

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :जबाबदार असलेल्यावर कठोर कार्यवाही व त्यांचेवर गुन्हे दाखल करावे शहराच्या नागरीकांची त्यांनी फसवणूक केली आहे. १ वर्षानंतरच या एजन्सीचे काम फेल होत असेल तर याचे कॅल्क्युलेशन कुणी व कसे केले कुणाला जबाबदार धरणार |
| श्री.महेश माळवतकर | :या एजन्सीकडे एकच जेसीबी मशीन आहे कचरा व्यवस्थीत उचलला जातो किंवा नाही प्रशासन खुलासा करू शकत नाही करोडो रूपये जनतेचे एजन्सीला देणार जेसीबी साठी वारंवार सुचना करण्याची वेळ येते हे योग्य नाही. |
| श्री.संजय जोशी | :काम देणे अगोदर रॅमकीचे काम कसे हैद्राबादला , परदेशात कसे काम केले सर्व स्क्रीन बोर्डवर दाखविले गेले ते बघूनच सभागृहाने मंजूरी दिली परंतु म्हणावी तशी स्वच्छता एजन्सीकडून होत नाही काम समाधानकारक नाही तरी बील दिले कार्यवाही होत नाही.घंटागाडया एजन्सी आणणार की महापालिकेने दयायच्या करारामध्ये काय नमूद आहे माहिती दयावी. |
| श्रीमती रेखा जैस्वाल | :हैद्राबादमध्ये या एजन्सीने चांगले काम होते अत्याधुनिक मशीनरी देणार चांगली स्वच्छता होणार या अधारे कोटयावधीचे काम दिले ते फेल का जात आहे. एजन्सी व महापालिका एक दुस-याचे सहकार्य मिळत नाही असे उत्तरे देतात.अशीच परीस्थिती ही शहराच्या आरोग्यासाठी चांगली राहणार नाही. |
| श्री.जगदीश सिध्द | रिक्षा सोडून इतर सर्व सर्व यंत्रसामुग्री दिली असे आताच म्हटले ॲग्रीमेन्टमध्ये एजन्सीने जीपीआरए सिस्टीम बसविणार होते, मा.आयुक्त दालनात बसून कोणती गाडी कुठे आहे व कुठे जाते हे सर्व बघणार व प्रत्यक्षात परीस्थिती दिसणार होती ही सिस्टीम एजन्सीने का केली नाही ॲटो रिक्षा व सायकल रिक्षा हॅड्रोलिक दिल्या नाही कचरा कुडयांखाली कॉक्रेटींग केलेले नाही.खाजगीमध्ये अधिकारी सांगतात आपलेच अंग आहे महापालिकेलाच काम करावे लागणार. एजन्सीने अनेक बाबीची पुर्तता केली नाही टेंडर काढले त्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.सर्व गाडया हॅड्रोलीकच्या देणार होते त्या आहेत का तसेच ३५० टन कचरा एजन्सी उचलणार होती सध्या २५० टन कचराच उचलला जात आहे.सभागृहाची दिशाभूल करू नये सत्य परीस्थिती विशद करावी. |
| श्री.नारायण कुचे | :रॅमकी दिलेले काम रद्य करावे सभागृहाची भावना आहे सिडको व शहर असे दोन भाग करून पुनश्चः वेगवेगळया निविदा काढाव्यात.स्वच्छतेचे काम तातडीने हाती घ्यावे. |
| श्री.जगदीश सिध्द | :रॅमकीच्या कामावर प्रशासन समाधानी आहेत का ? |
| श्री.विकास जैन | :रॅमकी चांगले आहे हे प्रशासनाने सांगावे. |
| श्री.नासेर खॉन | :अटी शर्तीनुसार एजन्सीने पुर्तता केलेली नाही. एका कुंडीतील कचरा एका रिक्षात बसतो एकही रिक्षा हॅड्रोलिक नाही. कुठला कचरा उचलायचा हे एजन्सीला माहित नाही.लहान गल्ल्यामध्ये घंटा गाडी फिरतांना दिसत नाही १५ वर्षापासून सदस्य आहे एकही घंटागाडी वार्डात दिसून येत नाही.कुठला कचरा व किती उचलला जातो याचा |

ताळमेळ नाही. अनेक ठिकाणी कच-यांचे ढिग दिसून येतात. ही परीस्थिती एकाच वार्डाची नसून ९९ वार्डातील आहे.प्रशासन चुकीचे उत्तर देवून सभागृहाची दिशाभूल करीत आहे.स्वच्छता,लाईट व पाणी या तिनही गोष्टीकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे. लाईट लावण्या संदर्भात अनेक वेळा प्रशासनाकडे पत्र दिले कार्यवाही होत नाही. कोणत्या भागात किती लाईट चालू आहे माझे वार्डात १५० लाईट पैकी ७५ लाईट चालू आहे. कुत्र्याचा मृत्यू होतो. सफाई कामगारांना दिसत नाही ते उचलण्यासाठी नगरसेवक एजन्सीकडे फोन करतात एजन्सीचे लोक येत नाही याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असणे योग्य नाही. याचा सर्व त्रास नागरीकांना भोगावा लागतो.

श्री.प्रमोद राठोड :रॅमकीकडे महापालिकेचे कर्मचारी असून त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आरोग्य सुविधा पुरविल्या जातात का ?

श्री.नासेर खॉन :शहरात अनेक ठिकाणी तसेच माझेही वार्डातील लाईट बंद आहे विदयुत प्रवाहामूळे शॉक लागून दोन लोक ॲडमिट आहे. श्री.बनसोडे, उपअभियंता यांना वारंवार कळवूनही लाईटची व्यवस्था केली नाही अधिकारी सदस्यांचे ऐकत नाही त्यांचेर कार्यवाही झाली पाहिजे.लाईट या विषयावर चर्चा करून ठोस निर्णय घ्यावा.

श्री.कैलास गायकवाड :प्रत्येक भागात वेगवेगळया एजन्सीला लाईटचे काम दिले ज्या एजन्सीने लाईट बंद ठेवले त्यांचेवर कार्यवाही करावी जेवढे लाईट बंद तेवढे बील त्या प्रमाणात कपात करावे.अधिका-यांचे एजन्सीवर नुसते कन्ट्रोल करण्याचे काम आहे.

श्री.नासेर खॉन :एजन्सीच्या निदर्शनास आणून दिले तर परवानगी नसल्याचे सांगण्यात येते.महापालिकेचे अधिकारी टाळाटाळ करतात.

श्री.मोहन मेघावाले :स्वच्छतेच्या बाबतीत सदस्य पोटतिडकीने बोलतात परंतु एजन्सी व्यवस्थीत काम करीत नाही.

मा.महापौर :रॅमकी एजन्सीशी केलेल्या करारा बाबत कायदेशीर बाबी तपासणी करण्याचे काम चालू आहे.

श्री.मीर हिदायत अली :खामनदीत एका मुलाचा मृत्यू झाला गेट समोर तेथील नागरीक न्याय हक्कासाठी आले त्यांची भेट घ्यावी सभा १० मिनिटासाठी तहकूब करावी.

श्री.मोहन मेघावाले :रॅमकीच्या कामा बाबत प्रशासनाचे अधिकारी दखल घेत नाही. कचरा उचलल्या नंतर पावडर टाकले जात नाही.नागरीकाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

मा.महापौर :रॅमकी एजन्सीशी झालेला करारनामा बाबत कायदेशीर बाबी तपासणीचे काम चालू आहे लवकरच अहवाल येईल. एजन्सीला एक महिण्याची मुदत दिली आहे.

श्री.नासेर खॉन :करारनाम्यात अटी शर्ती काय आहे त्यानुसार काम होते किंवा नाही. कुठला कचरा उचलला जातो.सर्व माहिती दयावी.

श्री.जगदीश सिध्द :रॅमकीच्या कामाबाबत प्रशासन समाधानी आहेत का? रिक्षा करारनाम्यानुसार सर्व साहित्य पुरविणे, नारेगाव येथे कचरा डेपोची व्यवस्था करणे ,कुंडयाखाली कॉक्रेटींग करणे,ओला सुका कचरा

| | |
|---|---|
| | वेगवेगळा करणे ,घरोघरी जावून कचरा जमा करणे ,घंटा गाडया देणे या सर्व सुविधा दिलेल्या आहेत का ? |
| श्री.त्र्यंबक तुपे | :अटी शर्ती नुसार एजन्सीने सर्व यंत्रसामुग्री व सुविधा पुरविल्या जातात का ?डी.पी.आर सिस्टीम का राबविली नाही.जर काम समाधानकारक नसेल तर बील का दिले कचरा उचलल्यानंतर बील्वींग पावडर टाकले जात नाही वार्ड अधिकारी लक्ष देत नाही सर्व खुलासा घ्यावा. |
| श्री.अब्दूल रऊफ खान | :रॅमकी एजन्सीच्या संदर्भात मी आपल्याकडे पत्र दिले कार्यवाही केली नाही .एजन्सी काम करण्यास अपयशी ठरली असताना  बील दिले जाते. |
| मा.महापौर | :या संदर्भात एजन्सीशी झालेला करारनामा बाबत कायदेशीर बाबी तपासतो आहे काम समाधानकारक नसेल तर परत पाठविण्याची व्यवस्था केली जाईल तसेच शहर स्वच्छता कार्यबल समिती नेमलेली आहे |
| श्री.रेणुकादास वैद्य | :रॅमकीच्या कामावर सभागृहाची हरकत असतांना समाधानकारक काम नाही तरी ही  पेमेट का दिले जाते. |
| श्री.संजय चौधरी | :शहरात स्लम भाग जास्त असून पावसाळयाचे दिवस असल्याने ओला कचरा जास्त होतो.एजन्सीचे कर्मचारी ओला कचरा उचण्यास टाळाटाळ करतात. |
| शहर अभियंता | :९ महिण्यापासून एजन्सी काम करते. निविदा मंजूर व  झालेल्या करारानूसार किती यंत्रसामुग्री महापालिकेला एजन्सीने दयायची ठरले त्यानुसार स्कीप लोडर जे ११००, २४० ली. असे दोन प्रकारचे बीन्स ॲटो टिप्पर्स,व इतर जे साहित्य होते ते सर्व पुरविलेले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रशासनाने रॅमकीला दत्तक घेतल्या सारखे वागवू नये.९५ टक्के सुविधा पुरविल्या नाही.करारानुसार सर्व बाबीची अमबजावणी होत नाही ? |
| श्री.प्रमोद राठोड | :करारनाम्यात ज्या यंत्रसामुग्रीचा उल्लेख केला ती दिसून येत नाही. |
| शहर अभियंता | :शहरात प्रत्येक वार्डमध्ये ही मशीनरी चालू आहे. १३ व्या वित्त आयोगाचा जो निधी येईल त्यातून कुंडया व इतर सामुग्री घेण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :रॅमकीशी केलेला करारनामा प्रति सर्व सदस्यांना दयाव्यात.जी माहिती देत आहे त्याप्रमाणे करारनामा चुकीचा केला अशी शंका येते. |
| श्री.गणतप त्र्यंबक तुपे | : करारनामा प्रमाणे काम होत नाही. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :एकाही गाडीला घंटी नाही.रिक्षावर घोषवाक्य लावावे जनतेला गाडी आल्याचे कळेल. कचरा जास्तीत जास्त जमा होईल. |
| श्री.हुशारसिंग चव्हाण | :दोन वार्डासाठी एक रिक्षा आहे पूर्ण कचरा उचलला जात नाही. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :९५०० लोकांची वस्ती एकच दिवशा दिवसा आड होते किंवा नाही. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :करारानाम्याच्या प्रति सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.करारामान्या प्रमाणे एजन्सी काम करीत नसेल तर कायदेशीर बाबी तपासून दिलेले काम रद्द करावे.पेमेन्ट देण्यात येवू नये.१३ व्या वित्त आयोगाचा निधी आल्यास महापालिकेनेच पूर्वी प्रमाणे हे काम करावे. |

श्री.मीर हिदायत अली :खामनदीत २२ वर्षाचा व्यक्तीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला नदीवर पुल करण्याचे कामास यापूर्वी मंजूरी मिळाली काम केले नाही पुलाचे काम न झाल्यामूळे ही घटना घडली काम का झाले नाही खुलासा घ्यावा.

श्री.विकास जैन :रॅमकी एजन्सी स्वच्छता करीत नाही या संदर्भात चर्चा करण्यासाठी स्पेशल सभा आयोजित करावी.

मा.महापौर :एजन्सी बरोबर ३-४ बैठका घेतल्या रॅमकीच्या कामावर समाधानी नाही. करारानाम्याच्या प्रति सर्व सदस्यांना दिल्या जातील.या एजन्सीला परत कसे पाठविता येईल यासाठी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही होईल.

मा.महापौर :लाईट बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :स.स श्री. नासेर खॉन यांचे वार्डातील लाईट बाबत लक्ष घालून २-३ दिवसात कार्यवाही केली जाईल.

श्री.नासेर खॉन :शहरात सर्वच ठिकाणी लाईटची समस्या आहे कोणत्या भागात कोणत्या एजन्सीला काम दिले कर्मचारी कोणते २-३ दिवसात लाईटची व्यवस्था होणार आहे का ?सर्व खुलासा करावा.

श्री.विजय वाघचौरे :एका भागातील दोन्ही कामे एकाच एजन्सीला दयावे. बीओटीचे अंतर्गत असलेले स्ट्रीट लाईट कुणी लावावे असा प्रश्न येतो नेहमी बंद असतात.

श्री.प्रमोद राठोड :सर्वच कामे बीओटीवर देणार असेल तर महापालिकेकडे कोणती कामे असणार आहे.

श्री.नासेर खॉन :कोणत्या एजन्सीने कुठले काम घेतले.त्या भागात किती लाईट चालू असते.किती आवश्यक आहे संबधीत लोक अधिका-यांना मिळालेले आहे.लाईटच्या कामाबाबत एजन्सीचे लोक मनमानी करीत आहे.एक लाईट बंद असल्यास १००रू दंडात्मक आकारणी करणार होते आजपर्यत किती दंडात्मक कार्यवाही केली.

श्री.प्रमोद राठोड :अधिका-याच्या महापालिकेतून इतर ठिकाणी बदल्या कराव्या असा ठराव मंजूर करून राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा.

श्री.सुशिल खेडकर :लाईटचे काम बीओटीवर दिले असतांना १० लक्षचे लाईटचे देखभाल दुरूस्तीचे कामास ५-२-२ नुसार का मंजूर केले.

श्री.नासेर खॉन :रस्त्यावर मोठमोठे खडडे पडले रात्रीच्या वेळी लाईट बंद असते अपघात होतात. नागरीकाना त्रास सहन करावा लागतो एजन्सीवर आजपर्यत किती दंडात्मक कार्यवाही केली.

मा.महापौर :लाईट या विषयावर स्वतंत्र बैठक आयोजित केली जाईल जे काही प्रश्न असतील ते सोडविण्यात येतील.

## इतिवृत्त कायम करणे.

**<u>विषय क्र. २६</u>** :

दिनांक १९-६-२०१० (का.प. क्र.०३)संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

| | |
|---|---|
| श्री.नारायण कुचे | :इतिवृत्तातील विषय क्र २२ मध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे यात लाभार्थीचा स्वत:चा हिस्सा म्हणून १० टक्के दिले. जर लाभार्थी ही रक्कम भरण्यास तयार नसेल तर महापालिकेने भरणा करावे व व मालमत्ता करामध्ये ही रक्कम समावेश करून त्यानुसार वसूल करावे अशी दुरूस्ती करण्यात यावी |
| मा.महापौर | :आताच सुचना केल्या प्रमाणे दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते. |

**ठराव** :

इतिवृत्त दिनांक १९.०६.२०१० मधील विषय क्रमांक २२ मध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे यात लाभार्थीचा स्वत:चा हिस्सा म्हणून १० टक्के दिले आहे. जर लाभार्थी ही रक्कम भरण्यास तयार नसेल तर महापालिकेने भरणा करावी व त्यांच्या मालमत्ता करामध्ये ही रक्कम समावेश करून वसूल करावी या दुरूस्तीसह दिनांक १९.०६.२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत येते.

## नेमणूका / नियुक्त्या

**विषय क्र. २७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./२०१०/पुरवठा/अघाविअ/कावी/दिनांक २१.०६.२०१० अन्वये आणि महाराष्ट्र शासन, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,शासन निर्णय क्रमांक दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु.२१ मंत्रालय मुंबई दिनांक २३.०१.२००८ चे पान क्र. ४ वरिल v प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्था दक्षता समितीसाठी, पालीका सदस्यांमधून विरोधी पक्षाचे दोन (ज्यात १ महिला सदस्य असेल) व इतर ०५ (पाच) पालीका सदस्य (ज्यात १ महिला सदस्या असेल) अशा एकुण सात पालिका सदस्यांची नांवे अन्नधान्य वितरण अधिकारी औरंगाबाद यांना दक्षता समिती गठीत करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या पालिका सदस्यांमधून शिफारस करावयाची आहे.

करीता औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्था दक्षता समितीसाठी वर प्रस्तावित केल्याप्रमाणे एकूण सात पालिका सदस्यांची नांवे (महिला पालिका सदस्यांसह) निश्चित करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| श्री.गिरजाराम हळनोर | :आम्ही आमच्या तर्फे ५ सदस्यांची नावे आपल्याकडे दिलेली आहे. |
| श्री.प्रमोद राठोड | :आम्ही आमच्या दोन सदस्यांची नावे आपल्याकडे दिलेली आहे. |
| मा.महापौर | :या संदर्भात शिवसेना-भाजपा पक्षाचे ५ व विरोधी पक्षाचे २ असे सात सदस्य निवडीत आहोत.नगरसचिव यांनी त्या सदस्यांची नावे वाचून दाखवावी. |
| नगरसचिव | :विषय क्र. २७ अंतर्गत शिवसेना भाजपा पक्षाचे ५ सदस्य त्यात १) श्रीमती प्रिती तोतला ,२) श्री.गजानन रामकिसन बारवाल ३)श्री. नारायण तिलोकचंद कुचे, ४)श्री.अनिल मकरिये, ५)श्री.सुरेश इंगळे व विरोधी पक्षाचे दोन १)श्री.शेख अ.असद शेख अब्दुल रशीद २)सौ. संगिता राजू अहिरे अशी एकूण ९ नावे आहेत. |

श्री.काशिनाथ कोकाटे :यात राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने एका सदस्याचे आम्ही नाव दिले आहे.
मा.महापौर :विरोधी पक्ष नेता व रा.का.गट नेता यांचेशी विचार विनिमय चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./२०१०/पुरवठा/अघाविअ/कावी/दिनांक २१.०६.२०१० अन्वये आणि महाराष्ट्र शासन, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,शासन निर्णय क्रमांक दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु.२१ मंत्रालय मुंबई दिनांक २३.०१.२००८ चे पान क्र. ४ वरिल v प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्था दक्षता समितीसाठी वर प्रस्तावित केल्याप्रमाणे एकूण सात पालिका सदस्यांची नांवे (महिला पालिका सदस्यांसह) निश्चित करणेस तसेच आणखी एक नांव प्रस्तावीत केल्याने त्यावर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## मा.महापालिका आयुक्तांकडून आलेले प्रस्ताव

**विषय क्र २८:** **मालमत्ता विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत येणाऱ्या हद्दीतील फेरीवाला व्यवसायाचे विनियमन (हॉकर्स झोन) संदर्भाने आदर्श उपविधी सन २००९ चा प्रारुप मसुदा तयार करुन असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन ३० दिवसाची मुदत देऊन महानगरपालिका हद्दीतील नागरीकांच्या हरकती/सुचना असल्यास विहीत मुदतीत उपआयुक्त (सिडको) महानगरपालिका औरंगाबाद यांचे कार्यालयात दाखल करणेबाबत स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या असता एकमेव अर्ज श्री.राजू सुर्यभान हिवराळे रा.जयभिमनगर(गुलाबवाडी) टाऊन हॉल औरंगाबाद यांनी सदरील उपविधी संदर्भाने काही हरकत/सुचना नोंदविले असता त्यांना दिनांक २१.०४.२०१० रोजी प्रत्यक्ष बोलावून प्राप्त हरकती/सुचना संदर्भाने सुनावणी घेऊन मुद्याबात अंशत: दुरुस्ती/शिफारस करण्यात आलेली आहे.

तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९,चे कलम ४६० अन्वये उक्त उपविधीचा प्रारुप मसूदा मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद** :

श्री.गिरजाराम हळनोर :हॉकर्स झोनचा प्रस्ताव आहे. ज्या ठिकाणी आठवडी बाजार भरतो तो दिवस सोडून इतर जे ७ दिवस असतांत त्या दिवशी बाजाराच्या ठिकाणी सुध्दा हॉकर्स झोनच्या गाडया असतील त्यांना तात्पुरते स्टाल ७ दिवसासाठी उभे करणेसाठी दयावे याचा समावेश यामध्ये करण्यात यावा.कारण इतर दिवशी त्या जागेचे उत्पन्न महापालिकेस काहीच मिळत नाही.पीरबाजार शहानुरमिया दर्गा येथे शिफ्ट केलेला आहे.त्या जागेवर आठवडी बाजार डेव्हलप करणेसाठी दिलेले आहे त्या ठिकाणीही इतर ७ दिवशी ते रिकामे राहणार आहे अशाही जागांचा विचार करण्यात यावा.
मा.महापौर : महापालिकेच्या हद्दित भरण्यात येणारे आठवडी बाजार हॉकर्स झोन

म्हणून बाजाराचा दिवस सोडून इतर दिवशी सुरु करावे.विषय मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९,चे कलम ४६० अन्वये उक्त उपविधीचा प्रारुप मसूदयास महापालिकेच्या हद्दित भरण्यात येणारे आठवडी बाजार हॉकर्स झोन म्हणून बाजाराचा दिवस सोडून इतर दिवशी हॉकर्स झोन सुरु करणेच्या दुरुस्तीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.संजय जोशी :बाजाराच्या एका ठिकाणी लोकांना फिरण्यासाठी जागा असावी असा ठराव झाला फिरण्यासाठी लोक जातात तो लेआऊट आहे एवढी मोठी जागा कुठेही नाही म्हणून तेथील जागा मोकळी ठेवावी.

श्री.रेणुकादास वैद्य :पीरबाजारची जागा बदलावी म्हणून काही नागरीकांनी मा.न्यायालयात दाद मागितली त्यावर सदर बाजार शहानुरवाडी येथे भरविण्यात यावा म्हणून मा.न्यायालयाने निर्णय दिला.त्या निर्णयाची महापालिकेने अमलबजावणी सुध्दा केली त्यानंतर २-३ वर्षानी जेथे जुन्या जागेवर बाजार भरत होता तेथेच बाजूला रस्त्यावर शिवमंदीराच्या परीसरात आजही बाजार भरतो महापालिकेला वेळोवेळी कल्पना देवून सुध्दा कार्यवाही झाली नाही.हा मा. न्यायालयाचा अवमान आहे तो बाजार त्वरीत बंद करावा लोकांना त्रास होणार नाही.याची दखल घ्यावी.

श्री.सुशील खेडकर :आठवडी बाजार सुतगिरणी चौकात रस्त्यावर भरतो.बाजाराच्या दुस-या दिवशी साफसफाई महापालिकेच्याच कर्मचा-यांना करावी लागते आरोग्याचा प्रश्न उदभवतो.शहानुरमिया दर्गा येथे बांधकाम पुर्ण झालेले आहे.येत्या सोमवार पासून तेथे बाजार भरविण्याच्या सुचना प्रशासनाला दयाव्यात.

श्री. वाघचौरे विजय :जे आठवडी बाजार चालतात त्याचे टेंडरनुसार मुदत संपवून किती दिवस झाले संपली असेल तर त्यांना वाढीव मुदत दिलेली आहे का ?

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कर निर्धा.व संकलक :चालू वर्षासाठी जे आडवडी बाजार भरवणार आहे त्या संदर्भात टेंडर काढण्याचे प्रस्तावित आहे.

श्री.गादगे विरभद्र :टेंडर संपल्यानंतर पुढील मुदत देणेसाठी मान्यता घेतली का?

कर निर्धा व संकलक :महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक असल्यामूळे व आचारसंहिते मुळे टेंडर काढता आला नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :मुदत संपण्यापूर्वी दोन महिणे अगोदरच कार्यवाही का सुरू होत नाही. जो ठेका घेतो तो व्यवस्थीत पैसे भरतो का ?

कर निर्धा.वर संकलक :संबधीताकडून रक्कम भरून घेतली जाते.

श्री.त्र्यंबक तुपे :मुदत संपण्यापूर्वी निविदेची प्रक्रिया का सुरू केली जात नाही.उशीर झाल्यास ठेकेदार पैसे भरणा करीत नाही. मनमानी करतो. अनेक ठैकेदारांनी महापालिकेला रक्कम दिली नाही मोठे नुकसान झाले.तोच प्रकार उशीरा कार्यवाही केल्यास यानंतरही होवू शकतो.

| | |
|---|---|
| कर निर्धा. व संकलक | :जाफरगेट येथे रविवारचा बाजार तसेच चिकलठणा येथे शुक्रवारी बाजार भरतो. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :शहरात एकूण किती बाजार आहे किती बाजाराचे टेंडर झाले रेग्युलर पैसे भरणा कुठल्या बाजाराचे येतात.माझ्या माहिती प्रमाणे ठैकेदाराकडेच महापालिकेची रक्कम असते रेग्युलर पैसे ठेकेदार भरणा करीत नाही.एकीकडे उत्पन्न वाढविण्याचा विचार करतो व त्याकडे प्रशासन लक्ष देत नाही.अनेक ठेकेदार पैसे न भरता निघून गेले आहे.बाजार भरण्यासाठी मुख्य रस्त्यावर परवानगी दिली जाते का ? |
| कर निर्धा. व सकंलक | :दिवसेदिवस दुकानाची संख्या वाढल्यास रस्त्यावर काही दुकान येत असतील. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहरात एकूण किती आठवडी बाजार भरतात टेंडर नुसार किती बाजाराची मुदत संपली.संपली असेल तर मुदत दिली ती कुणाच्या अधिकारात दिली.व सदर ठेकेदार नियमीत पैसे भरतात का खुलासा व्हावा. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :संबधीत अधिकारी यांना या संदर्भात काहीही माहित नाही असा माझा आरोप आहे. |
| श्री.नासेर खॉन | :आता पर्यंत किती लोकांनी ठेका घेतला आहे. २४,०००/- रु. येत होते. अनेक ठेकेदाराकडून रक्कम घेतली नाही बोगस धनादेश घेतले ते आजही वटवले गेले नाही.यात महापालिकेचे नुकसान झालेले आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :अनेक धनादेश ठैकेदाराने दिले व वटवले गेले नाही. |
| श्री.नासेरखान | :अधिका-यांची ठेकेदारा बरोबर मिलीभगत होते एक वर्ष पैसे वसूल केले महापालिकेला काहीच रक्कम भरणा केली नाही आजही ते बाऊन्स झालेले धनादेश महापालिकेकडे आहे.त्या ठैकेदाराची यादी प्रशासनाकडे आहे यात महापालिकेचे नुकसान झाले ते ठेका सोडून गेले पैसे भरलेले नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :महापालिकेच्या उत्पन्नाचा विषय आहे या संदर्भात खुलासा व्हावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :किती ठेकेदाराने महापालिकेला रक्कम भरणा केली नाही ज्यांनी केली नाही त्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली.खुलासा करावा. |
| कर निर्धा व संकलक | :जे प्रश्न उपस्थित केले त्याची माहिती घेणेसाठी वेळ दयावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :संबधीताकडून रक्कम वसूल करण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा. |
| श्री.सुशील खेडकर | :या जिल्हयातील महानंदा दुध महासंघातर्फे बेरोजगार युवकासाठी व्यवसाय मिळाला म्हणून त्यांनी योजना आखली होती दुध डेअरीना दुध विकण्यासाठी स्टॉलची लिस्ट महापालिकेकडे पाठविली होती.मा. उच्च न्यायालयाचे आदेश होते की ९ मी ते ४५ मीटरच्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे दुध विक्री करण्यास परवानगी नाही.सुतगिरणी चौकात राजरोसपणे बाजार भरतो यास जबाबदार कोण ? |
| मा.महापौर | :माहिती घेणेसाठी वेळ दिलेला आहे पुढील विषयावर बोलावे. |
| श्री. नासेरखॉन | :या प्रकरणात काही कर्मचारी निलंबीत केले होते. सविस्तर खुलासा घ्यावा. |

| | |
|---|---|
| श्री.सुशील खेडकर | :महानंदा दुधाचे स्टॉल लावण्यासाठी पोलीस विभागाची एनओसी असतांना महापालिका परवानगी का देत नाही. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :महानंदा दुधाचे स्टॉल शहरामध्ये काही लोकांना दिले गेले.पोलीस विभागाने ,महानंदा दुध संघाने परवानगी दिली महापालिका परवानगी का देत नाही. |
| उप आयुक्त (सिडको) | :रस्त्याच्या कडेला स्टॉल लावण्या संदर्भात दरवर्षी असे प्रस्ताव येतात परंतु मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे एका प्रकरणात ९ ते ४५ मीटर रस्त्याच्या कडेला कुठल्याही प्रकारचे अडथळे किंवा अतिक्रमण असू नये त्यामूळे अशा प्रस्तावास परवानगी दिली जात नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :ज्यांना पूर्वी परवानगी दिली परंतु अनधिकृत पणे रस्त्यावर आहे.असे किती स्टॉल आहे. |
| उप आयुक्त (सिडको) | :अनधिकृत स्टॉल असेल तर कार्यवाही केली जाते परंतु मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अगोदर स्टॉल दिलेले असेल तर त्याची माहिती माझेकडे सध्या नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :जागेची पाहणी करून देता येत असेल तर परवानगी दयावी नसता जे अनधिकृत आहे त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| श्री.सुशीर खेडकर | :९ मी ते ४५ मी. रस्त्यावर खाजगी मालमत्ता असेल त्यांनी एनओसी घेतली असेल तर देण्यास हरकत नसावी.पोलीस विभागाचे परवानगी मिळते महापालिका का देत नाही. |
| उप आयुक्त (सिडको) | :प्रत्येक प्रकरणाची पोजीशन वेगळी असेल त्यामूळे सर्व प्रकरणात एकच निर्णय घेता येणार नाही. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :खाजगी मालमत्ता असेल एनओसी दिली असेल तर त्यांना स्टॉल टाकण्यासाठी परवानगी देण्यास हरकत नसावी. |
| उप आयुक्त (सिडको) | :जनरल निर्णय घेणे योग्य राहणार नाही प्रत्येक प्रकरणाची पोजीशन बघून कार्यवाही करता येईल.खाजगी जागेत सुध्दा साईड मार्जीन आहेत का ?नगररचना विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे इतरही बाबी तपासून कार्यवाही करता येईल. |
| श्री.सुशील खेउकर | :यापूर्वी अशा प्रकारची प्ररवानगी दिलेली आहे का ? |
| उप आयुक्त (सिडको) | :मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अगोदर दिलेली असेल तर त्याची माहिती सध्या उपलब्ध नाही. |
| मा.महापौर | :विकास योजना प्रस्तावाची पडताळणी करून या बाबतीत कार्यवाही करावी. |

**विषय क्र २९:** **कार्यकारी अभियंता (ब व क) विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे १०० दलली व ५६ दलली प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र आहेत. जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी पी.ए.सी. पावडरचा वापर केला जातो. दोन्हीही जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता लक्षात घेता फारोळा येथे दररोज १५० दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. सर्वसाधारण

परिस्थितीमध्ये २.५ पी.पी.एम. इतक्या प्रमाणावर क्लोरीनचा वापर केल्यास दररोज ३७५ किलो इतक्या क्लोरीनची आवश्यकता आहे. या वापरानुसार जलशुध्दीकरण केंद्राची वार्षीक मागणी १३७ मे टन इतकी आहे. पावसाळयाच्या दिवसात धरणाच्या पाणी साठयात वाढ झाल्यानंतर व उन्हाळयाच्या शेवटी धरणातील पाणीसाठी कमी झाल्यानंतरही पाण्याची क्लोरीन मागणी वाढते. नक्षत्रवाडी साठवण टाकी येथे पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरुपात क्लोरीनची मात्रा द्यावी लागते. दैनंदिन १ पीपीएम इतक्या प्रमाणावर क्लोरीनचा वापर केल्यास नक्षत्रवाडी साठवण टाकी येथील वार्षीक मागणी ५५ मे टन इतकी आहे. हर्सूल जलशुध्दीकरण केंद्र येथे क्लोरीनचा वापर केला जातो. हर्सूल जलशुध्दीकरण केंद्राची वार्षीक मागणी ४.५ मे.टन इतकी आहे. फारोळा व हर्सूल जलशुध्दीकरण केंद्र तसेच नक्षत्रवाडी साठवण टाकी येथील एकूण वार्षीक मागणी ही १९६ मे. टन इतकी आहे. सिध्दार्थ जलतरण तलाव येथे १०० किलो ग्रॅम क्षमतेचे सिलेंडर वापरले जातात. जलतरण तलावाची वार्षीक मागणी २.४ मे.टन इतकी आहे.

या पुरवठयाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २००८-२००९ च्या दरसुचिनुसार अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम २५,८२,०००/- इतकी आहे. सन २०१०-२०११ च्या अर्थ संकल्पीय मागणी रसायन पुरवठया करीता ८० लक्ष रुपये इतकी तरतुद प्रस्तावीत करण्यात आलेली असून या पुरवठयाचा खर्च उपरोक्त तरतुदी मधुन करण्यात येईल.

करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता क्लोरीन पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक रुपये २५,८२,०००/- चे मा. सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

श्री.प्रमोद राठोड :फारोळा येथे जलशुध्दीकरणाची सध्याच्या परीस्थितीचा अभ्यास केला का ? जे खरेदी करणार आहोत त्याचा तेथे किती वापर होतो किती पाणी शुध्दीकरण होते.याचा उपयोग कुठे केला जातो सर्व खुलासा करावा.

श्री.गिरजाराम हळनोर : यापूर्वी कोणते ॲलम वापरले जात होत `आता कोणते वापरले जाते.यामूळे पाण्याच्या कॉलीटीमध्ये फरक पडलेला आहे का ?एक दिवसा आड पाणी येते.दोन दिवस पाणी आले नाही तर साठवलेल्या पाण्यात अळया होतात. क्लोरीफिकेशन प्लॅन नादुरूस्त आहे की इतर कारणामूळे असे दुषित पाणी येते.

श्री.प्रमोद राठोड :ॲलम मिक्स होते ती व क्लोरीची यंत्रणा ब-याच दिवसापासून बंद आहे. खरेदी करता तर ते किती प्रमाणात वापरले जाते.मागिल किती क्लोरीन वापरले गेले व खरेदी कशा प्रकारे केली जाते सर्व खुलासा करावा.

कार्य.अभिं.श्री.पानझडे :शहरात ३ ठिकाणी क्लोरीन वापर होतो. ९०० व १०० kg असते फारोळा येथे २.५ पीपीएमचा डोस दिला जातो.१५० एमएलडी पाणी शुंध्द होण्याचे गृहीत धरले आहे. १३६.८७५ मॅ.टन क्लोरीन लागते.नक्षत्रवाडी येथे १ पीपीएम डोस तेथे ५४.७५ मॅ.टन तसेच हर्सुल येथून ६ एमएलडी पाणी घेतो २ पीपीएम डोस ४.३८ मॅ.टन असे वर्षाला १९६ मॅ.टन लागते. प्रत्येक ठिकाणी नोंद रजिस्टर आहे किती तारखेला पुरवठा झाला किती तारखेला संपले क्लोरीन व इतर मिक्स केल्यानंतर पाणी शुध्दीकरणाची प्रक्रिया होते तेंव्हा तपासणी करून शहरासाठी पाणी सोडले जाते.

श्री.प्रमोद राठोड :ॲलम मिक्स यंत्रणा या दोन्ही ठिकाणचे चालू आहे का ?

| | |
|---|---|
| कार्य.अभि.श्री.पानझडे | :ॲलम मिक्स करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| श्री.प्रमोद राठोड | ही प्रक्रिया बंद आहे मी स्वत: दोन दिवसापूर्वी तेथे पाहणी केली मा. महापौर आपण स्वत: तेथे जावून पाहणी करावी. |
| कार्य.अभि.श्री.पानझडे | :पहिल्यांदा रॉमटेरीयल येते. त्यात ॲलम मिक्स केल्याशिवाय त्या पाण्याचे शुध्दीकरण होतच नाही.जर वापर केला नाही तर जशाच्या तसा गाळ पाण्यात येईल. |
| श्री.प्रमोद राठोड | :एक ॲलम मिक्स यंत्रणा बंद आहे.पावसाळयामध्ये तेथे गाळ जातो. याची लगेच पाहणी करून कार्यवाही करावी.या मूळे शहरात रोगराई पसरते आहे. ॲलम व क्लोरीनचे .प्रमाण किती असावे याची यंत्रणा तेथे नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :पूर्वी व आता वापरण्यात येत असलेला ॲलम कोणता , वर्षाला किती लागते पुर्वीचा व आता वापरण्यात येत असलेल्या ॲलमचे किंमतीत किती फरक येतो माहिती दयावी. |
| श्री.प्रमोद राठोड | :प्रकरणाची चौकशी करुन अहवाल द्यावा. |
| श्री.सुरेद्र कुलकर्णी | : वार्ड क्र.६९ मध्ये दुषित पाणी कशामूळे येते पाणी शुध्दीकरण होते किंवा नाही विचारणा केली असता पाईप मध्ये पाणी साचले असेल किंवा पाईप लिकिजे असेल असे उत्तर मिळते असे गढूळ व दुषित पाणी इतर किती वार्डात येते सवीस्तर खुलासा करावा. |
| श्रीमती रेखा काथार | :वार्ड ६७ मध्ये पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे दुषित घाण पाणी येते दुरूस्तीचे काम केले परंतु ३-४ दिवसानंतर पुन्हा सध्या दोन दिवसापासूण घाण पाणी येत आहे. या बाबतीत कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. |
| श्रीमती प्रिती तोतला | :वार्ड क्र. ३३ मध्ये दिवाणदेवडी,फकीरवाडी,माळीवाडा भागात नळाला सुरूवातीला ड्रेनेजचे पाणी येते बॉटलमध्ये पाणी घेवून नागरीक माझ्ोकडे आले होते त्यात पाण्याचा घाण वास येतो.यामूळे फकीरवाडी भागात १७-१८ लोक आजारी आहे महापालिकेचे कर्मचारी पाणी तपासणीसाठी आले असता पाण्यात क्लोरीनचे प्रमाण कमी असल्याचे म्हटले याबाबत खुलासा करावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :शेवटच्या टप्प्यात क्लोरीनची मात्रा ०.२ पीपीएम इतकी असावी लागते परंतु तेवढे क्लोरीन मिक्स केलेच जात नाही मागिल वर्षी किती खरेदी केले कुठे, किती वापरले किती ठिकाणी पीपीएमची तपासणी केली शेवटच्या टप्प्यात किती वापरले जाते.प्रत्येक आठ दिवसाला तपासणी झाली पाहिजे बीपीएमची मात्रा तपासणीसाठी कोणती यंत्रणा महापालिकेकडे आहे माहिती दयावी. |
| शहर अभियंता | :शहरात पाण्याची वितरण व्यवस्था ही १५-२० वर्षापूर्वीची आहे.त्या कामात एसी पाईप जास्त प्रमाणात वापरलेले आहे.त्यामूळे नळाच्या पाण्यात सदरचे पाणी मिक्स होवून पिण्यासाठी येते. अशा वेळी ही कामे तातडीने हाती घेवून केली जातात.. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :पाईप लाईन खराब झाल्यात बदलण्याची कार्यवाही का होत नाही. गुंठेवारीचा भाग येतो तेथे काम करता येत नाही असे सांगितले जाते. |

| | |
|---|---|
| शहर अभियंता | :आताच कार्य.अभियंता यांनी खुलासा केला सर्व पाईपलाईन बदलण्याची कार्यवाही होणार आहे.जेथे अगोदर काम केले असेल व दुरूस्तीचे काम असेल तर ते करता येते.तसे पत्र प्रशासनाकडे दयावे कार्यवाही करता येईल. |
| श्री.प्रमोद राठोड | :जलशुध्दीकरणा संदर्भात माझा खुलासा झालेला नाही जुलै २००९ मध्ये वेगवेगळया शहरातून वेगवेगळया ठिकाणी सॅम्पल कलेक्ट करून ते प्रादेशिक आरोग्य प्रयोग शाळेकडे तपासणीसाठी पाठविले होते.येथील नागरीकाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने वेगवेगळया ठिकाणचे पाणी नमुने घेवून ते तपासले का किंवा प्रयोग शाळेकडे पाठविले का? एक दिवसाची टेस्ट करण्यासाठी महापालिकेकडे कोणती यंत्रणा आहे.कशा पध्दतीने तपासणी होते सर्व माहिती दयावी. |
| मा.महापौर | :मागिल क्लोरीनचा साठा वापरण्यात आला का असेल तर कुठे व किती व शिल्लक किती सविस्तर माहिती दयावी |
| शहर अभियंता | :क्लोरीन ॲलमचा वापर पाणी पुरवठा योजना सुरू झाल्यापासून वापरला जातो.वर्षातून दोन वेळेस संपण्या अगोदरच मागणी करून घेतली जाते.वाटर ट्रीटमेंन्ट प्लॅन्ट नेहमी उपलब्ध ठेवावा लागतो. या शहरातील पाणीपुरवठा योजना जुनी आहे ६०-७० सॅम्पल कलेक्ट केले जातात.ते प्रयोग शाळेकडे तपासणीसाठी पाठविले जाते.रोजच्या रोज सॅम्पल कलेक्ट करून दरवर्षी पाठविले जाते. |
| श्री.नासेर खॅान | :मा.आयुक्तांनी परीपत्रक काढले ५०० रू खर्चाचे सुध्दा काम करू नये तर विकास होणार की नाही जो पुरवठा होतो तो वाळूज येथे वर्ग -३ कर्मचारी याची कंपनी आहे तेथून होतो.चौकशी करावी आपण प्रत्यक्ष माझेसोबत यावे सर्व माहिती होईल.दुसरीकडून पुरवठा करून घेतला जात नाही |
| मा.महापौर | :या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | :प्रस्ताव मंजूर करावा स.स आताच म्हटल्या प्रमाणे सखोल चौकशी करून त्यांचेवर कार्यवाही करावी. यांनी म्हटल्या प्रमाणे |
| मा.महापौर | :संबधीत अधिका-यांची सखोल चौकशी होईल परंतु या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. |
| <u>**ठराव:**</u> | :प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा व हर्सूल जलशुध्दीकरण केंद्र तसेच नक्षत्रवाडी साठवण टाकी सिध्दार्थ जलतरण तलाव ई.साठी क्लोरीन पुरवठा करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. २५,८२,०००/- साठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. |

## <u>स.पालिका सदस्यांचे प्रस्ताव</u>

<u>**विषय क्र ३०**</u>:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.०७ भिमनगर,भावसिंगपुरा या वॅार्डात गेल्या १०-१५ वर्षापासून पोलीस चौकी व्हावी अशी मागणी स्थानिक नागरीकांची आहे. भिमनगर भागामध्ये मोठया प्रमाणात चोरटया दारुचा व्यवसाय चालतो व बेकायदेशीर जुगार चालतो. त्यामुळे या भागात पोलीस चौकीची अत्यंत आवश्यकता आहे. सदरील ठिकाणी मनपाच्या शाळेमागे असलेले सुलभ शौच्छालय बऱ्याच दिवसापासून विनावापर असून तेथे अतिक्रमण होत आहे. करीता

सदरील विनावापर व तुटलेल्या अवस्थेत असलेले सुलभ शौच्छालय तोडून त्या ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

तसेच भिमनगर,भावसिंगपुरा येथे असलेल्या मनपाच्या शाळेजवळील पुलावरील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. पासवाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी सदरील ठिकाणी भराव टाकून, कॉक्रीटींग करणेकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.बनकर कृष्णा सांडुजी अनुमोदक :श्री.शिंदे राजू रामराव

<u>संवाद</u>

श्री.गिरजाराम हळनोर : पोलीस चौकीची संपूर्ण ९९ वार्डात मागणी आहे. मा. पोलीस आयुक्त,यांनी सर्व सदस्यांना त्या प्रकारचे विनंती पत्र दिले ज्या इमारती देणे शक्य असेल त्या या साठी देण्यात याव्यात इमारत नसेल तर त्या भागात जागा उपलब्ध करून दयावी.पोलीस चौकी संबधी जेवढे प्रस्ताव असतील ते सर्व मंजूर करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :पोलीस विभागाने हा चांगला उपक्रम हाती घेतला आहे त्यास मा.आयुक्त महापालिका यांनी सहकार्य करावे अशी विनंती करतो.महापालिकेच्या अनेक ठिकाणी इमारती, ओपनस्पेस आहे त्या देता येतात का या बाबत टेक्नीकल बाबी तपासून प्रत्येक वार्डात एक पोलीस चौकीसाठी नियम अटीची जास्त अट न ठेवता जागा उपलब्ध करून दयावी यामूळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिल.

श्री.प्रमोद राठोड :प्रस्ताव मंजूर करावा परंतू पोलीस चौकी बांधल्यानंतर त्याचे मेन्टनंस कुणी करावे यात स्पष्ट करावे.अनेक ठिकाणच्या पोलीस चौकीची देखभाल दुरूस्ती होत नसल्याने पोलीस कर्मचारी हवालदिल झाले त्याकडे लक्ष दिले जात नाही.

मा.महापौर :पोलीस विभागच यांचे देखभाल करेल.

श्री.प्रमोद राठोड :मेन्टनंस करण्याचे काम पोलीस विभागाकडे राहिल तसे त्यांना कळविण्यात यावे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र.०७ भिमनगर, भावसिंगपुरा या वॉर्डात मनपाच्या शाळेमागे असलेले विनावापर व तुटलेल्या अवस्थेत असलेले सुलभ शौच्छालय तोडून त्या ठिकाणी पोलीस चौकी उभारणे आणि भविष्यात याची देखभाल पोलीस विभागाने करणेसह आणि ९९ वार्डामध्ये जेथे पोलीस चौकीला इमारती/जागा देणे शक्य असेल त्या ठिकाणी इमारती/जागा उपलब्ध करून देण्याच्या दुरूस्तीसह प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र ३१:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या काही गुंठेवारी/स्लम भागात प्रति वर्ष ४५०/- रु. प्रमाणे पाण्याचा एक ड्रम टॅकर द्वारे मनपाच्या वतीने पाणी पुरवठा करण्यात येत होता. परंतु त्यांच्याकडून या आर्थिक वर्षात प्रति वर्ष १९००/- रुपये भरुन घेण्यात येत आहे. उक्त भागात मध्यम वर्गीय व काही भागात दारिद्रय रेषेखालील गरीब नागरीक रहात असून त्यांना ही दरवाढ भरणे शक्य होत नाही.

करीता महानगरपालिकेच्या गुंठेवारी/स्लम भागात मागील दराप्रमाणेच प्रति वर्ष ४५०/- रु प्रमाणे पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे अनुमोदक :श्री.भुईगळ अमित सुधाकर

| | |
|---|---|
| श्री.कृष्णा बनकर | :यावर चर्चा न होता कमी रक्कम करून मंजूरी देण्यात यावी. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :९०० रू होते १९०० रू केलेले आहे जे वाढीव ठेवले ते न करता ९००रू करण्यात यावे. |
| श्री.प्रमोद राठोड | :नागरीकाच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. कमी करण्या बाबत विचार करावा. |
| मा.महापौर | :प्रशासनाने १९००रू. प्रमाणे प्रस्ताव ठेवला होता त्यावेळी ९०० घेण्याचे मान्यता दिली. |
| श्री.अमीत भुईगळ | रू. ४५० प्रमाणे ठेवावे. वाढ करण्यात येवू नये. |
| मा.महापौर | :रू. ९०० प्रमाणे घेण्यास मान्यता दिली आहे महापालिकेची आर्थीक स्थिती बरोबर नाही यापेक्षा कमी करणे शक्य नाही |
| श्री.संजय चौधरी | :वर्षाचे ९००रू होतात तेवढेच मंजूर करावे. |
| शहर अभियंता | :यापूर्वी सर्वसाधारण सभेने ९०० रू प्रमाणे मान्यता दिलेली आहे. |
| श्री.प्रमोद राठोड | :रू.४५० प्रमाणे घेण्यात यावे. |
| मा.महापौर | :प्रशासनाने १९००रू प्रमाणे ठेवले होते जनतेच्या हितासाठी ९००रू करण्यात येते. |
| श्री.अमीत भुईगळ | :९००रू पुर्वीचेच आहे ४५०रू करण्यात यावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :पूर्वी प्रस्ताव मंजूर केला त्याप्रमाणे आकारणी करून मंजूरी दयावी. |

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या गुंठेवारी/स्लम भागात प्रति वर्ष ९००/- रु. प्रमाणे आकारणी करुन पाण्याचा एक ड्रम टॅकर द्वारे मनपाच्या वतीने पाणी पुरवठा करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र ३२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.६१ समर्थनगर मधील स्व.तुकारामपंत देव हे ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक होते. तसेच त्यांनी समर्थनगर हा प्लॅन ले-आऊट सन १९७२ मध्ये चंदीगड हया शहराच्या धर्तीवर तयार करुन औरंगाबाद शहराच्या इतिहासात एक नविन पाया रचला आहे. करीता त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्या हेतू त्यांचे वॉर्ड क्र.६१ समर्थनगर मधील निराला बाजार येथील वाहतूक बेटावर स्व.तुकारामपंत देव यांचे स्मृतीस्तंभ उभारणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर. हया कामासाठी लागणाऱ्या संभावीत खर्चास मंजुरी देण्यात यावी.

सुचक :श्री.समीर सुभाष राजुरकर

अनुमोदक:श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण, श्री.कावडे रवि साहेबराव, श्रीमती अहिरे संगिता राजु, श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६१ समर्थनगर मधील निराला बाजार येथील वाहतूक बेटावर स्व.तुकारामपंत देव यांचे स्मृतीस्तंभ उभारणे हया कामासाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र ३३:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी पदावर प्रतिनियुक्ती वर आलेल्या श्रीमती नर्गीस शेख यांना मुळ ठिकाणी पाठविण्यासाठी या पुर्वी ही प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुर झालेला आहे. मंजुर विषयावर त्वरीत प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड अनुमोदक :श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान ,श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

मा.महापौर :स.स.श्री.प्रमोद राठोड आणि श्री.कैलास गायकवाड यांचे म्हणने एकच आहे. त्यानुसार विषय क्रमांक ३३ मंजुर करण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार उपआयुक्त यांचेकडे देण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :शिक्षण अधिकारी यांचा कार्यभार उपआयुक्त यांचेकडे देण्यात यावा तसेच उपशिक्षणाधिकारी हे पद निर्माण करण्यात येवुन मनपाच्या ज्या मुख्याध्यापकांना पुरस्कार मिळालेला आहे त्यांच्यातुन हे पद भरण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेच्या शाळेमध्ये यंदा 8 वी, 9 वी, 10 वी चे वर्ग सुरू करण्यात येत आहे. त्यासंदर्भाने आपल्याला बी.एस्सी.बी.एड किंवा डिग्री होल्डर बी.एड झालेले शिक्षकांची गरज आहे. महापालिकेमध्ये अतिशय कमी संख्या आहे.

मा.महापौर :बी.एस्सी.बी.एडच्या जागा लवकरच भरण्यात येतील तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :या प्रक्रियेला मंजूरी घेणे आणि यासाठी लागलेला शिक्षक वर्ग नियुक्ती करण्यासाठी राज्य शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल करावा.

श्री.संजय जोशी :मागच्या वेळेस ठरावातच लिहिले आहे की, मंजूर झाला होता त्याचे Implimentation झाले नव्हते आताही प्रशासन तसे करणार आहे काय?

मा.महापौर :ताबडतोब अंमलबजावणी केली जाईल. उपशिक्षणाधिकारी पदाची जागा भरण्यात येईल.

श्री.मिलींद दाभाडे :काही शाळेत विदयार्थी संख्या कमी आहे अशा शाळा स्थलातंरीत करण्यात याव्यात.

मा.महापौर :शिक्षण विभाग उपआयुक्त(प्र)कडे देत आहोत यानंतर काम सुरळीत चालेल.

श्री.मीर हिदायत अली :महापालिकेने ८ ते १० वी वर्ग सुरू केले त्या विदयार्थ्यांना सोयी-सुविधा सवलती देण्यासाठी खर्चास मंजूरी दयावी

श्रीमती साधना सुरडकर:महापालिकेच्या शाळेत प्रयोग शाळा वर्ग घेतले जात नाही अगोदर शिक्षकाची भरती करावी जेथे प्रयोगशाळा वर्ग सुरू करणे शक्य आहे तेथे सुरू करावे.

मा.महापौर :आवश्यक आहे तेथे प्रयोगशाळा वर्ग सुरू करण्याची कार्यवाही करावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी पदावर प्रतिनियुक्ती वर आलेल्या श्रीमती नर्गीस शेख यांना त्यांच्या मुळ विभागात पाठविण्यास व त्यांचा पदभार उपआयुक्तांकडे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.खलील खान :सर्व शिक्षा अभियानात सक्षम अधिकारी आहेत.

**विषय क्र ३४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझे पडेगांव व मिटमिटा वार्ड क्र. ०८ (आठ) मध्ये दोन्ही गावात मोठे नाले आहेत.या नाल्याच्या बाजुस लोकवस्ती आहे. या नाल्यास डोंगराकडून भावसिंगपुरा नंदनवन कॉलनी परिसराकडून पाणी वाहते पावसाळयात पाण्याचा पुर या नाल्यास येतो. पडेगांव येथील बाबाखुटी मंदिरास जाण्यासाठी एक अरुंद पुल आहे. या मंदिर परिसरातही नागरीक राहतात पुराचे पाणी नाल्यास आल्याने ड्रेनेज लाईन चे घाण पाणी नागरीकांचे घरामध्ये घुसते त्यामुळे रोगराई वाढते करीता या भागामध्ये दोन्ही बाजुस सरंक्षण भिंत असल्याने नागरीकांना त्रास होणार नाही. तसेच पुराचे पाणी जास्त पडल्याने या पुरात गाई,म्हशी,बकऱ्या सारखे जणावरे वाहून जातात करीता पडेगांव व मिटमिटा परिसरामध्ये नाल्याचे बाजुस सरंक्षण भिंत उभारण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.सावित्रीबाई हिरालाल वाणी. अनुमोदक :सौ. सुरे सविता संतोष

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे पडेगांव व मिटमिटा वार्ड क्र. ०८ (आठ) मध्ये पडेगांव व मिटमिटा परिसरामध्ये नाल्याचे बाजुस सरंक्षण भिंत उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ३५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२१ व्ही.आय.पी.रोडवरील आंबेडकर चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी या वर्षाच्या सन २०१०-२०११ अर्थसंकल्पात रक्कम रु.३० लक्ष पर्यंतची तरतुद ठेवून या चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.इंगळे सुरेश सांडुजी अनुमोदक : श्री.बोराडे रामदास काशीनाथ,
श्री.घोडिले आनंद राधाकिसन

श्री.गिरजाराम हळनोर :प्रस्तावास मान्यता देवून ताबडतोब शासनाकडे पाठविण्यात यावे.शासनाची मंजूरी आवश्यक आहे. त्यानंतर आर्थीक तरतूद करता येईल.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येतो प्रशासनाने ताबडतोब शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी :स्थानिक नागरीक व संबधीत नगरसेवक यांना विश्वासात घेवून कार्यवाही करावी.दिनांक २०-६-१९९६ च्या जीआर नुसार नियमाने बसत नाही.त्यासाठी स्थानीक नागरीकांची एनओसी घेवून ही कार्यवाही करता येते

श्री.रेणुकादास वैद्य :शासनाची मंजूरी आणण्यास प्रशासनाकडून दिरंगाई होते याचा पाठपुरावा लवकर करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे.

मा.महापौर :सर्व अटीसह हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२१ व्ही.आय.रोडवरील आंबेडकर चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी या वर्षाच्या सन २०१०-२०११ अर्थसंकल्पात रक्कम रु.३० लक्ष पर्यंतची तरतुद ठेवून या चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>चर्चा</u>

श्री.त्र्यंबक तुपे जाहिरात फलक बाबत प्रश्न दिले होते शहरात एकूण ३१० असल्याचे उत्तर दिले यावर माझे सभागृहाचे समाधान झालेले नाही.क्रांतीचौकातच ५० फलक दिसून येतात.इतर महापालिकेत यापासून मिळणा-या उत्पनाला महत्व आहे.येथे नाही.शहरात अधिकृत अनधिकृत फलक किती यावर ११X३ साईजचे फलक अनधिकृत उर्वरीत अधिकृत असल्याचे उत्तर दिले न्यायालयात मेसर्स ॲण्ड यांचे एक प्रकरण असल्याचे म्हटले खाजगी संस्थेला जाहिरात फलकाचे दिले नसल्याचे म्हटले तसेच महापालिकेच्या व खाजगी भिंतीवर जाहिरात करण्यासाठी महापालिकेची परवानगी घ्यावी लागते का न घेतल्यास गुन्हा दाखल करता येतो का असा प्रश्न दिलेला होता त्यावर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ अन्वये परवानगी घ्यावी लागते न घेतल्यास संबधीतास रितसर नोटीस देवून कराचा भरणा करण्यासाठी कळविण्यात येते यानंतरही भरणा न केल्यास पोलीस गुन्हा दाखल करण्यात येतो असे उत्तर दिले.शहरात माझे माहिती प्रमाणे दिलेल्या संख्ये पेक्षा दोन पट होर्डीग आणखी असतील.यामूळे मोठे उत्पन्न महापालिकेला मिळणार आहे परवानगी देतांना अटी शर्ती नॉर्मस काय याची माहिती दिली नाही.ही योजना महापालिकेकडे घेवून महापालिकेच्या वतीने एकाच ठेकेदारास हे काम दिले तर मोठे उत्पन्न मिळेल शहरातील सर्व होर्डीग किती याचा दोन दिवसात सर्वे करून सत्य माहिती समोर आणावी तसे प्रशासनाला आदेशीत करावे.

श्री.प्रमोद राठोड :आतापर्यत किती होर्डी्ग धारकावर गुन्हे दाखल केले पुढील कार्यवाही काय केली शहरात अनधिकृत होर्डीग किती आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :होर्डीग उत्पन्नाचे स्त्रोत आहे. मोठे उत्पन्न मिळेल या दृष्टीने बघीतले पाहिजे इतर महापालिकेत यापासून मोठे उत्पन्न मिळते परंतु या महापालिकेत दुर्दैवाने होडींग संदर्भात रेकॉर्ड नाही.एखादयाने परवानगीसाठी अर्ज केला तर २ होर्डीगला मोघम परवानगी दिली जाते.सदर मालक २५ होर्डीग लावतात व कोणत्याही होर्डीगबाबत ऑब्जेक्शन घेतल्यास परवानगी घेतल्याचे दाखवितात अशी चुकीच्या पध्दतीने परवानगी दिली जाते या शहरात जवळपास १०००-१२०० होर्डीग असतील ज्या इमारतीवर होर्डीग आहे त्यांना व्यावसायीक कर आकारणी करणे आवश्यक आहे संबधीत इमारत मालकाने सामान्य कर भरणा केला नाही यांची माहिती घेण्याची तसदी प्रशासनाने घेतलेली दिसून येत नाही.हैद्राबाद मध्ये एका रस्त्यावरील असलेल्या होर्डीगचे

जवळपास १.०० कोटीचे वर्षाला महापालिकेला उत्पन्न मिळते.ते या शहरात का होवू शकत नाही.वार्षिक करार केलेले होर्डींग वगळता इतर अनधिक्रृत होर्डींग सर्वच काढण्यात यावे शहराचे विद्रुपीकरण होत आहे ते थांबविण्यात यावे.या शहरात महापालिकेने ठरवून दिलेल्या जागेवरच सेफ साईजचे होर्डींग लावण्यात यावे एकाच ठेकेदाराकडे हे काम देण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

श्री.विकास जैन :सन २००२-०३ मध्ये टन्डन असोसिएशन मुंबई यांनी या महापालिकेच्या हद्यीत होर्डीग कुठे ,कशा पध्दतीने व त्याची साईज कशी असावी अशा प्रकारचा सर्वे केलेला होता सर्वेचा मोबदला एजन्सीला दिला गेला त्या सर्वेनुसार महापालिकेने उपयोग केला नाही.शहरातील आजस्थितीत असलेल्या सर्व होर्डींगला स्थगिती देवून रद्य करण्यात यावे या नियमावलीनुसार एक महिण्याच्या आत सर्वे करून एकाच एजन्सीला नेमून होर्डीग कुठे व किती साईजची , दर किती असेल याची सर्व माहिती घ्यावी होर्डींगवर नंबर असावे कोणती होर्डीग अनधिकृत , अधिकृत आहे हे सिध्द होते.टन्डन असोशिएशनने केलेला सर्वे बघावा त्यांनी संपूर्ण शहराचा लेआऊट करून दिलेला आहे पूढे पेमेन्ट करता येते का याचा विचार प्रशासनाने केला पाहिजे.

श्री.विजय वाघचौरे :अनधिकृत होर्डीग काढण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे व सर्व होर्डींगच्या संदर्भात पुढील बैठकीत तसा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे :भिंतीवर अनेक ठिकाणी जाहिरात केलेल्या असतात यास परवानगी दिली जाते का दिली असेल तर त्यांचे कडून किती रक्कम भरणा करून घेण्यात येते.

श्री.नासेरखॉन :एक होर्डीगची परवानगी ,१० होर्डींग लावलेल्या दिसतात . होर्डींगधारक करोडो रूपये कमवितात महापालिकेच्या तिजोरीत एक पैसा ते भरणा करीत नाही ८-१५ दिवसासाठी परवानगी असते अनेक महिणे त्या जाहिरात चालतात.त्यावर लाईटची वीज आकारणी १३रू युनिट प्रमाणे असते म्हणून महापालिकेच्या स्ट्रिटलाईटवरून कनेक्शन घेवून लाईट लावण्याचे धाडस एजन्सीधारक करीत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते महापालिकेच्या ऐवजी दुस-याच लोकांना याचा फायदा मिळतो. बाबा पेट्रोल पंप ते मुंकूदवाडी चिकलठाणा पर्यत अनेक होर्डीग आहे त्यात कितींनी परवानगी घेतली खाजगी इमारतीवरील होर्डींगधारक दुस-याच इमारतीची टॅक्स भरणा पावती दाखवितात रेग्यूलर करून घेतात.जेथे होर्डीग आहेत त्या इमारत मालकांने टॅक्स भरणा केलेला नाही.सर्व माहिती घेण्यात यावी.ज्या अनधिकृत होर्डीग आहेत त्या त्वरीत काढण्यात यावे.

श्री.गिरजाराम हळनोर :सभागृहाच्या भावना लक्षात घेता पूर्वी टंन्डन एजन्सीने जो सर्वे केला होता तो अहवाला बाबत विचार करावा संपूर्ण शहरातील या बाबत सर्वे करून एकच एजन्सील निश्चित करण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :सन २००२ मध्ये एक सेल ॲड कंपनीला ५ वर्षाच्या करारावर हे काम दिले कराराची मुदत संपल्यानंतर त्यांचेकडे असलेली थंकबाकी वसुल करून त्या एजन्सीने लावलेले बोर्ड काढून घेण्याची गरज होती ती

| | |
|---|---|
| | कार्यवाही न होता त्यानंतर दोन वर्ष झाले पुन्हा त्या एजन्सीकडे २१ लक्ष आणखी थंकबाकी झाली एजन्सी आजही चालू आहे महापालिकेला उत्पन्न येत नाही वेळीच कार्यवाही का केली नाही माहिती घ्यावी. |
| उप आयुक्त (सिडको) | :सेल ॲड संदर्भात कार्यवाही प्रस्तावित केलेलीआहे. मा.आयुक्त यांनी संचिकेवर या कार्यवाहीस उशीर का झाला म्हणून चौकशी करण्यासाठी मुख्यलेखा परीक्षक यांचेकडे ती संचिका आहे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :५ वर्षाचा करार संपला पुढील कार्यवाही करण्याची गरज होती लेखा परीक्षक यांचेकडे संचिका पाठविण्याची गरज नव्हती.मा.आयुक्ताचे नाव दाखवून सभागृहाची दिशाभूल खालच्या अधिका-यांनी करू नये. संचिका मागवून घेण्याचे अधिकार सभागृहाला आहे.सत्य परीस्थिती समोर आली पाहिजे.७१लक्षचा प्रश्न आहे. प्रशासनाच्या चुकीमूळे नागरीकांना का शिक्षा दयायची.इतर खाजगीकरणाच्या निविदा ताबडतोब निघतात या संबधीची निविदा का वेळीच काढली नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | : जे नुकसान झाले त्यास जे संबधीत अधिकारी जबाबदार असतील त्यांचेकडून ते वसूल करण्यात यावे. |
| श्री.सुंशिल खेडकर | :५ वर्षाची मुदत संपल्यानंतर त्यापूढेही जुन्याच एजन्सीकडून काम करून घेतले असेल तर त्यांनी महापालिकेकडे किती रक्कम भरणा केली |
| श्री.त्र्यंबक तुपे | :३१० होर्डींग पूर्ण शहरात असल्याचे म्हटलेले आहे.यापेक्षा जास्त असू शकतात. |
| मा.महापौर | :होर्डीग संदर्भात सखोल चौकशी करून जे कुणी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :स्वत:ची जबाबदारी झटकून दुस-यावर टाकण्याची सवय अधिका-यांना झालेली आहे ही प्रथा बंद करावी. सिंगल टेंबलवर कार्यवाही का होत नाही. संबधीत एजन्सीचा करार संपला थकीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करावी नवीन टेंडर काढण्यात येवून कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. |
| श्री.विकास जैन | :संबधीत एजन्सी होर्डींग काढत नसेल तर महापालिकेने त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी. |
| श्री.विजय वाघचौरे | :शहरात मोठमोठया होर्डींग लावलेल्या असून त्या हानीकारक ठरवू शकतात. परवानगी नसेल तर काढण्याची कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :होर्डीगच्या माध्यमातून महापालिकेत कोटयावधी रूपये मिळणार आहे या संदर्भात एक महिण्याच्या आत सर्वे करून निविदा ताबडतोब काढण्यात यावी. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :सर्व होर्डीग काढून टाकाव्यात नवीन निविदा काढण्यात यावी खाजगी व महापालिकेच्या मालकीच्या इमारतीवरील जाहिरातीपासून महापालिकेला मोठे उत्पन्न मिळेल त्याकडे प्रशासनाने लक्ष दयावे. |
| श्री.नासेर खॉन | :शहरात टावर्स किती प्रशासनाला माहित नाही.अनधिकृत टावर्स संदर्भात ५ वर्षापासून चर्चा होते कार्यवाही होत नाही. |

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :मोबाईल टॉवर्सच्या लोकांना येथे बोलवून खो देण्याच्या प्रयत्नात महापालिकेचे अधिकारी करीत आहे. आतापर्यत अनधिकृत टावर्स का काढण्यात आले नाही. |
| मा.महापौर | :या संदर्भात चौकशी समितीही नेमण्यात येईल.एक महिण्याच्या आत सर्वेक्षण करून त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.प्रमोद राठोड | :आतापर्यत अनधिकृत टॉवर्स का काढले जात नाही. शहरात ३४८ पैकी ३४ टॉवर्स अधिकृत असल्याचे म्हटले आहे.जनतेचा पैसा खर्च करून महापालिकेचे अधिकारी एजन्सीला सवलत देवून त्यांचा सत्कार करतात हे बरोबर नाही. |
| श्री.नासेर खॉन | :टावर्स, होर्डीगच्या माध्यमातून मोठी वसूली होवू शकते यामूळे गुंठेवारी व इतर भागात विकास कामे होण्यास मदत होईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :होर्डीग् असेल टावर्स किंवा तार फेन्सीग असेल हे सर्व विषय मालमत्ता विभागाच्या संबधीत आहे.मालमत्ता विभागाचे स्वतंत्रपणे मुख्यलेखाधिकारी किंवा सक्षम अधिका-याच्या मार्फत मालमत्ताचे ऑडीट करून घ्यावे ज्या कामाची मुदत संपली सर्व कामाचा नव्याने सर्वे करून करार करण्यात यावा. जेणे करून महापालिकेचे उत्पन्नात भर पडेल. |
| श्री.विकास जैन | :या संदर्भात ऑडीट करण्यात यावे. |
| श्री.प्रमोद राठोड | :मालमत्ता विभागाचे ऑडीट करावे बाहेरच्या कंपनीच्या लोकांचा महापालिकेचे अधिकारी फुल देवून सत्कार करतात कुणाच्या पैशातून व सत्कार करण्याची गरज काय माहिती दयावी. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :गुंठेवारी भागात काम करता येत नाही असे उत्तर प्रशासन देते मोबाईल टावर्स का उभारले जातात. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :शहरात ३४८ टावर्स त्यापैकी ३४ टावर्स नाहरकत प्रमाणपत्र म्हणजे अधिकृत आहे उर्वरीत ३१४ अनधिक्रत असतांना त्यांचेवर आजपर्यत काय कार्यवाही केली. |
| श्री.प्रमोद राठोड | :अनधिकृत टावर्स लगेच बंद करावे.वसुली होईल. |
| श्री.संजय जोशी | :एका कंपनीच्या नावाने टावर्सला परवानगी त्यावर ३-४ कंपन्या कनेक्ट केले जातात.पैसे एकाच कंपनीच्या नावाने भरणा होते.असे शहरात १००-१२५ टावर्स असतील.याची चौकशी करून ठोस निर्णय घ्यावा. |
| श्री.विकास जैन | :टपरी व एखादे बांधकाम अनधिकृत असेल ते काढू नये सहानुभूती दाखवली तरी काढले जाते मोठया प्रमाणात अनधिकृत टावर्स असतांना अधिकारी कार्यवाही का करीत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य: | :इमारतीस बांधकाम परवानगी भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही तेथे टावर्स लावलेले दिसतात याचा अर्थ ते अनर्धिकृत आहे. |
| मा.महापौर | :मोबाईल टावर्सच्या संदर्भात एक समिती नेमण्यात येईल |
| श्रीमती प्रिती तोतला | :३४८ पैकी २०९ टावर्सलाच टॅक्स आकारणी झाली उर्वरीत टावर्सला का करण्यात आली नाही.३ वर्षापासून टावर्सचे बील थकीत आहे ती रक्कम जवळपास २.०० कोटी पर्यत येते.७५ टावर्सची रक्कम जमा केली आहे. बील भरण्यास एक दिवस उशीर झाल्यास मोबाईल बंद होतो.३ वर्ष पासूनची थकबाकी एखादया टावर्स कंपनीने जमा केली नाही तर परवानगी का दिली जाते. |

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :३१४ टावर्स आजच बंद करावे जे की कंपनीकडे १० कोटीची थकबाकी आहे ते लगेच महापालिकेकडे भरणा करतील. |
| श्री.हुशारसिंग चव्हाण | :वार्ड ४७ मध्ये शाळेच्या इमारतीवर टावर्स लावण्यात आले.परवानगी दिलेली आहे का ? |
| प्रशासकीय अधिकारी | :अनधिकृत टावर्सची मोहिम जेंव्हा हाती घेतली सदरील कंपन्या कोणत्याही प्रकारची दखल घेत नव्हत्या महापालिकेच्या वतीने चांगला संदेश जावा यादृष्टीने फुले दिलेली तीही महापालिकेच्या खर्चाने दिलेली नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :असा फुल देवून सत्कार करण्यासाठी मा.आयुक्तांनी परवानगी घेणे आवश्यक होते.इमारतीच्या स्ट्रक्चर कशा प्रकारे आहे हे तपासणी न करता टावर्स उभारले भविष्यात ते पडले व जीवीतहानी झाली तर त्यास जबाबदार कोण असणार आहे.अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांची मुख्य कार्यालयात कार्यालय असावे जेणे करून सर्वांना सोयीस्कर होईल. |
| प्रशासकीय अधि. | :२१० टावर्सला कर आकारणी केलेली होती १३८ टावर्सला कर लागलेला नव्हता.अतिक्रमण व वार्ड अधिकारी यांचे मार्फत सर्वे करण्यात आला आता ३४८ टावर्सला कर लागलेला आहे.४० टावर्सची कर बाकी आहे.१.२५ कोटी वसूल करण्यात आले उर्वरीत रक्कम एक महिण्याच्या आत महापालिकेत भरणा करणार आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :एक रेटलिस्टचे काम करण्यास निधी अभावी अडचण येते २०० टावर्स अनधिकृत उभारले जाते ते बंद करण्याची किंवा काढून टाकण्याची कार्यवाही करावी तोपर्यंत कंपनी कर भरणा करणार नाही. |
| श्री.महेश माळवतकर | :जोपर्यंत अनधिकृत टावर्सवर कार्यवाही होत नाही तोपर्यंत कर वसूल होणार नाही. |
| श्री.सुशिल खेडकर | :एकाटावर्सला परवानगी देणेसाठी ३लक्ष फिस आकारणी केली जाते.परवानगी न घेता टावर्सला टॅक्स लावलेला आहे का ? |
| प्रशासकीय अधिकारी | : कोणत्याही अनधिकृतपणे काम केलेल्यावर व परवानगी नसेल तरी टॅक्स लावू शकतो |
| श्री.सुशिल खेडकर | :मागिल वसूल करणार आहेका ? |
| प्रशासकीय अधिकारी | :जेंव्हा पासून करारनामा झाला तेंव्हापासून टॅक्स आकारणी केली आहे. |
| श्री.प्रमोद राठोड | : निवासी इमारतीवर जेंव्हा टावर्स साठी परवानगी दिली जाते तेंव्हा टावर्स उभारणी धोकादायक आहे असा बोर्ड लावावा लागतो किती इमारतीवर लावलेले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :५-१० हजार टॅक्स आकारला म्हणून ते लिगल होत नाही.एका टावर्सला परवानगी देतांना ३ ते ३.५० लक्ष रूपये घेतले जातात तो महसूल महापालिकेचा बुडला जातो जे अनधिकृत आहे ते अगोदर काढण्याचे आदेश करावे. |
| मा.महापौर | :अनधिकृत टावर्स धारकावर कार्यवाही केली जाईल व ते टावर्स काढून टाकले जाईल. |
| श्री.विकास जैन | :वार्ड कार्यालया अंतर्गत अतिक्रमणाचे पथक वार्डसाठी इमारत निरीक्षक असतांना अनधिकृत टावर्स उभारले जातात कर्मचारी त्यांची |

सेवा का बजावत नाही.गरीबांने बांधकाम केल्यास अधिकारी तेथे हजर होतात. टॅक्स लावला म्हणजे लिगल होत नाही अनधिकृत टावर्सला टॅक्स लावता येतो का ? प्रशासनाकडून खुलासा अपेक्षीत आहे.

श्री.प्रमोद राठोड :आजच या बाबत ॲक्शन घ्यावी. एखादया इमारतीचे बांधकाम होत असेल तर कर्मचारी तेथे ते बंद करण्यास हजर असतात.मोठमोठे टावर्स होतात याकडे का लक्ष दिले जात नाही.मा.आयुक्तांनी खुलासा करावा काय ॲक्शन घेणार आहे.

श्री.विकास जैन :अनधिकृत टावर्स उदया पर्यत बंद करण्याचे आदेशीत करावे ही अपेक्षा आहे.

याच वेळी स.सदस्य मोठमोठयाने एकत्र बोलतात.

श्री.समीर राजूरकर : एखादी टपरी टाकली तर महापालिकेचे कर्मचारी यांना एका दिवसात माहित होते टावर्सचे दोन महिणे काम चालते त्या बाबतीत का कार्यवाही लगेच होत नाही.

मा.महापौर :सभागृहाच्या भावनेशी मी सहमत आहे अनधिकृत मोबाईल टावर्स बंद केले जातील मालमत्ता विभागाचा चार्ज काढण्यात येईल. अनधिकृत मोबाईल टावर्सवर ताबडतोब उदयाच कार्यवाही होईल मा.आयुक्त कार्यवाही करण्याचे आदेश देतील.मा.आयुक्त होर्डीग मोबाईल टावर्सच्या संदर्भात खुलासा करतील.

मा.आयुक्त :एकूण ३१४ टावर्स अनधिकृत आहे जी चर्चा आताच झाली त्यांचा संदर्भ लक्षात घेता नगररचना विभागाने परवानगी दिलेले टावर्स वगळता उर्वरीत ३१४ टावर्सला २४ तासाच्या आत सील करण्यात येतील.टावर्स बंद करण्याच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात काही केसेस झालेल्या मा.न्यायालयाने ताबडतोब टावर्स बंद करू नये असे आदेश दिले.सील लावावे परवानगी वगैरे नसेल तर ती कार्यवाही व त्यानंतर उर्वरीत कार्यवाही करावी म्हणून ज्या ज्या केसेस मा.न्यायालयात दाखल झाल्या त्यांनी बंद करण्याला वाढ केलेली आहे.म्हणून २४ तासाच्या आत सर्व टावर्स सील केले जातील.पुढील कार्यवाही करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार केला जाईल. सील केले तर तो डी एक्टीवेट होतो.

श्री समीर राजूरकर :ज्यांनी मा.न्यायालयात प्रकरण दाखल केले त्यांचे वगळता इतर सर्व बंद करावे.

श्री.मिलींद दाभाडे :ज्या अधिका-याच्या कार्यकाळात अनधिकृत टावर्स उभारले त्यांचेवर कार्य कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :ज्या अधिका-याकडे ही जबाबदारी होती त्या अधिका-याची विभागीय चौकशी ताबडतोब केली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :अनेक दिवसापासून महापालिकेला कराचा भरणा झाला नाही.संबधीत टावर्स धारकांनी ६ महिण्यापूर्वी कराचा भरणा केला असता तर निधी उपलब्ध असता व्याजासह संबधीत अधिका-याकडून वसूल करण्यात यावा.

श्री.हुशारसींग चव्हाण :शाळेच्या इमारतीवर टावर्स लावण्यात आले ते बंद करणार की सील लावणार खुलासा करावा.

मा.महापौर :होर्डींग संदर्भात काय कार्यवाही करणार मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :होर्डींग संदर्भात सुध्दा मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केले त्यानुसार जे अनधिकृत होर्डीगवर तातडीने कार्यवाही केली जाईल.या संदर्भात माहिती घेणेसाठी संबधीत विभागास आदेशीत करण्यात आले होते. विभागाकडून आलेली माहितीवर माझेही समाधान नाही. प्रशासनानेही हेच ठरविले की ५० कर्मचारी कामाला लावून सर्व तपासणी करून जे जे होर्डींग अनधिकृत आहे ते काढण्याची कार्यवाही करू. हे करण्यासाठी थोडासा कालावधी लागेल हे करीत असतांना ती जागा व बोर्डची साईज निश्चित करणे व त्यानंतर जी जी कार्यवाही करायची ती केली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :टावर्सच्या संदर्भात असलेल्या नियमावलीची अमलबजावणी होते का ? याचीही तपासणी करावी.रहिवासी इमारतीवर मोबाईल टावर्स उभारणे धोकादायक आहे ते कुठेही दिसून येत नाही.ते सर्वासाठीच सक्तीचे करावे.

श्री.शाहनवाज खान : एजन्सीला महापालिकेला पैसे भरणा करायचे नाही म्हणून न्यायालयात धाव घेतात असे अनेक प्रकरणे होतील उत्पन्न मिळणार नाही.आपण आदेशीत करावे महापालिकेनेही या संदर्भात न्यायालयात रिट दाखल करावे.

श्री.प्रमोद राठोड :कार्यवाही करण्यास २४ तासाचा अवधी दिला तो केंव्हापासून गृहीत धरण्यात येईल

मा.महापौर :आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केलेला आहे त्यांची अमलबजावणी तात्काळ करण्यात येईल.

**<u>विषय क्र.३६:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,महानगरपालिकेने शहरातील विविध वॉर्डात सामाजिक उपक्रमासाठी नागरीकांना सुविधा उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून अनेक हॉल बांधलेले आहेत. परंतु महानगरपालिकेच्या अपुऱ्या यंत्रणेमुळे या हॉलची देखभाल होऊ शकली नाही. यापासून महापालिकेस काहीही आर्थिक उत्पन्न मिळू शकलेले नाही. पर्यायाने अनेक हॉलची दयनीय अवस्था झाली तर काही हॉल कोणत्याही उपयोगाचे राहिले नाहीत. अनेक ठिकाणच्या हॉलचे दरवाजे,खिडक्या,विद्युत उपकरणे चोरीस गेले आहेत. काही ठिकाणी मनपाने बांधलेल्या हॉलवर अतिक्रमण झालेले आहे तर काही हॉलचा उपयोग गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून पत्ते खेळणे,दारु पिणे इ.सारख्या अवैध व समाजविघातक कामासाठी होत असल्याचे निदर्शनास येते.

महानगरपालिकेने चांगल्या हेतूने सदरील हॉलची उभारणी केलेली होती. या हॉलचा उपयोग त्या-त्या भागातील नागरीकांना सामाजिक,शैक्षणिक उपक्रमासाठी व्हावा असा उद्देश होता. अशा प्रकारे निरुपयोगी ठरु पाहणारे हॉलची देखभाल व्यवस्थीत व्हावी व महापालिकेस त्यापासून काही प्रमाणात का होईना महसूल मिळावा याकरीता त्या त्या भागातील हौसिंग सोसायटी, नोंदणीकृत संस्था यांचेकडे देखभाल करण्याकरिता हॉल द्यावेत. संबंधीतांकडून मनपाने नाममात्र भाडे वसूल करावे. हॉलची संपूर्ण मालकी महापालिकेचीच राहिल. जेणे करुन ज्या उद्देशाने हॉल बांधण्यात आले तो उद्देश सफल होईल व नागरीकांना देखील या ठिकाणी सामाजिक उपक्रमाद्वारे याचा उपभोग घेता येईल. शहरातील सर्व रिकामे असलेल्या हॉलचा एकत्रित प्रस्ताव तयार करुन हौसिंग सोसायटी नोंदणीकृत संस्था यांना देखभालीकरीता हॉल देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव, श्री.तुपे त्रिंबक गणपतराव, श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत, श्री.बारवाल गजानन रामकिसन, श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ.

अनुमोदक :श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल,श्री. अनिल जुगललाल जैस्वाल, श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत, श्री.नागरे किशोर बाबुराव, श्री.गादगे विरभद्र रामलींग, श्री.बबन पंडितराव नरवडे, श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

श्री.गिरजाराम हळनोर :किमान ५ वर्षासाठी भाडे करार करावा महापालिकेच्या नियमाप्रमाणे सर्वासाठी अटी शर्ती लावून नॉमीनल भाडे त्या संस्थेकडून घेण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य ३ वर्षापूर्वी असाच प्रस्ताव आलेला होता शहरातील सभागृहाची दुरावस्था ,गैरवापर याबाबतीत सविस्तर चर्चा केली व एक समिती नियुक्त झालेली होती ज्या भागात सभागृह असेल त्या भागातील लोकाची व संबधीत वार्डाचे स.सदस्य यांची एनओसी घ्यावी त्यानुसार कार्यवाही करण्याचा ठराव स्थायी समिती सर्वसाधारण सभेत घेण्यात आला माझे वार्डातील काही हॉल संस्थांना दिले मा.आमदार श्री. विलासजी अवचट यांचे आमदार निधीमधून श्रेयनगर येथे बांधलेला हॉल या संदर्भात मी दोन वर्षापासून पाठपूरावा करतो स्थायी समितीने या बाबतीत भाडे निश्चित करून दिले असे असतांना जेष्ठ नागरीकांची जी संस्था आहे त्या संस्थेला हा हॉंल देणे संदर्भात प्रशासन कार्यवाही करीत नाही.संचिका अमुक ठिकाणी आहे आयुक्तांनी त्यावर चर्चा करावी असे सांगितले अशी उत्त्तरे मिळातात स्थायी समितीचा सर्वसाधारण सभेचा ठराव असतांना वेगळी आयुक्तांसोबत संबधीत अधिकारी काय चर्चा करतात याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी या संदर्भात खुलासा करावा.

मा.आयुक्त :हा ही विषय असाच दुर्लक्षीत राहिलेला आहे जे हॉल गाळे दुकाने बांधली त्याचा वापर व्यवस्थीत झालेला नाही.ज्या ज्या ठिकाणी अशी दयनीय अवस्था झाली आहे त्याची माहिती घेवून लिस्ट तयार करीत आहोत..स.सदस्य श्री. रेणुकादास वैद्य यांनी म्हटल्या प्रमाणे तो विषय येथे चर्चा करण्याचा नाही. संचिकेतील चर्चा असेल तर अधिका-यांना त्याची समज असली पाहिजे की आयुक्तांना त्यात काही समगोष्टीची शंका निर्माण झाली असेल तर ती चर्चा केली पाहिजे

श्री.रेणुकादास वैद्य :पूर्वी पत्र दिले १७ महिणे झाले नंतर पत्राला ११ महिणे झाले तिस-यांदा दिं. ३-५-१० पत्र दिले अदयाप कार्यवाही नाही.सभागृहाने घेतलेले निर्णयाची नक्कल दिली असे असतांना प्रशासन संबधीत संस्थेला तो हॉल देण्याचे टाळाटाळ करीत आहे त्यापासून मिळणारा महसूल व त्या सभागृहाचे झालेले नुकसान कुणाकडून वसुल करणार याचाही खुलासा करावा.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | : आपला मुद्याही महत्वाचा आहे परंतू काही ठिकाणी भाडे समितीने २०००रू भाडे ठरविले असतांना २००रू भाडे घ्यावे असे ही ठराव झाले यात महापालिकेचे मोठे नुकसान होते.कदाचित असे ठराव झाले असेल तर ते विखंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जेथे जास्त फरक व प्रॉब्लेम वाटत असेल त्या संबधीत चर्चा करावी असे म्हटले असे तर आताच त्या संचिके विषयी माहिती देता येणार नाही. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :अनेक हॉल इमारती रिकाम्या आहे म्हणून भाडे तत्वावर देण्याचा ठराव ठेवला यापेक्षा भयंकर परीस्थिती या इमारतीची होवू नये. प्रत्येक वार्डात किती हॉल इमारती आहे त्या कुणाला भाडेने दिल्या त्याचा वापर कशासाठी त्या कोठे व त्याचे बाजूला खेळाचे मैदान, बगीचा असेल तर व तेथील हॉल भाडेने दिला असेल तर हॉलचाच वापर होणे आवश्यक आहे.अहवाल मागवावा नियमावली तयार करावे जाहिर प्रगटन करावे सभागृहा समोर मान्यतेसाठी आणावे त्यानंतर कार्यवाही करावी |
| श्री.त्र्यंबक तुपे | :माझे माहिती प्रमाणे १९ व्यायामशाळा आहे ९ भाडेतत्त्वावर दिल्या १० हॉल मागणी नसल्याने दिल्या नाही.असे अधिकारी सांगतात अनेक लोक घेण्यास तयार आहे १६ समाज मंदीर व ६६ बहुउदेदेशीय हॉल आहे.अटी शर्ती जाचक असल्याने कुणी घेत नाही अधिकारीही सहकार्य करीत नाही अशी माहिती मिळते.सदर हॉल समाज मंदीर भाडे तत्वावर तात्काळ कसे देता येईल तसे प्रशासनाला आदेशीत करावे. |
| मा.महापौर | :त्या त्या भागातील गृह निर्माण संस्था,नोंदणीकृत संस्था यांचेकडे किमान ५ वर्षासाठी देखभाल दुरूस्ती करता नाममात्र दराने भाडेने देण्यात यावे हॉलची संपूर्ण देखभाल दुरूस्ती ,तेथील स्वच्छता, विदयुत बील त्या संस्थेने दयावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :नियमावली तयार करावी अहवाल यावा त्यानंतर योग्य ती कार्यवाही करू शकतो. |
| श्री.संजय जोशी | :ती संस्था ॲक्टीव्हिटीज काय करणार याचे बंधन असावे. |
| श्री.प्रमोद राठोड | :याची नियमावली तयार करण्यात यावी त्यानंतर मंजूर करावे. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :हा प्रस्ताव मंजूर करावा जे काही नाममात्र भाडे आकारले जाते त्या संदर्भात सविस्तर प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात यावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :एखादया संस्थेला नाममात्र भाडेने दिले त्या संस्थेने टेकओव्हर केल्यास जनतेला किंती रक्कमेत तो हॉल उपलब्ध होईल कालावधी निश्चित करावा तेथील नागरीकाची एनओसी असावी तसेच संबधीत वार्डाचे नगरसेवक यांना विश्वासात घ्यावे या बाबतीत नियमावली तयार करावी सभागृहासमोर आणावे त्यानंतर योग्य ती कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :हे मंजूर ठिक आहे नियमावली तयार केली जाईल. |
| श्री.प्रमोद राठोड | :मंजूर करू नये अगोदर नियमावली तयार करावी. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :हा विषय मंजूर करावा |
| मा.महापौर | :महापालिकेची नियमावली तयार करू हा विषय मंजूर करू |
| श्री.प्रमोद राठोड | :नियमावलीसाठी एक कमेटी नियुक्त करावी. |
| श्री.संजय जोशी | :प्रशासनाचे मत घ्यावे. |

श्री.प्रमोद राठोड :या बाबत नियमावली तयार करावी नसता कुणी कसाही वापर करेल कुणाचा कुणावर अंकूश राहणार नाही.माझे वार्डात मा. दर्डा साहेब यांचे निधीतून स्केटींग ग्राऊंड तयार केले बंद असल्याचे सांगतात परंतु ज्यांना दिले तो व्यक्ती त्या ग्राऊंडचा वापर करतो ७०००रू भाडे अधिका-यांना देतो असे सांगतो याची चौकशी व्हावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :माझे वार्डात दोन हॉल भाडेने दिले ते भाडे कुणाकडे जमा करतात माहिती दयावी.तो हॉल राजकीय कामासाठी वापरत असे. त्यासाठी जी सामाजीक संस्था घेणार ते कशा प्रकारे वापर करणार लेखी घेतल्याशिवाय देवू नये.

श्री.माळवतकर महेश :हॉल प्रमाणे सिडकोने कम्युनिटी सेंन्टर जेथे गोरगरीबाची लग्न सोहळा होत होता ते महापालिकेकडे दिले त्याची अवस्था वाईट आहे. तेथे देखभाल झाली पाहिजे. चांगल्या संस्थेला देवून तेथील वापर व्यवस्थीत होणे आवश्यक आहे.सर्वसामान्य नागरीकांना त्याचा लाभ व्हावा.

श्री.प्रमोद राठोड :नियमावली तयार करावी सभागृहासमोर आणावे तोपर्यत कोणतेही हॉल भाडेने देवू नये.ही मालमत्ता महापालिकेने लोकांच्या सेवेसाठी केलेली आहे सर्व नियमांची अमल झाला पाहिजे इतर कुणाला हे देता येत नाही.

मा.महापौर :या संबधी योग्य ती नियमावली मंजूर करून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

श्री.प्रमोद राठोड :अगोदर नियमावली तयार करावी त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.गिरजाराम हळनोर :हा प्रस्ताव मंजूर केल्याशिवाय प्रशासनाकडे काही जाणार नाही मंजूर करून प्रशासनाकडे पाठवावा.नियमावली त्याचे नाममात्र भाडे प्रशासनाने त्या बाबतीत अभ्यास करून तपासणी करून नियमावली कशी करायची हे सर्व ठरवून पुन्हा सर्वसाधारण सभेपूढे आणावे

श्री.अक्रम खान :सर्वच खाजगीकरण केले तर महापालिकेकडे काय काम राहिल.

मा.महापौर :हा प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेचे शहरात विविध ठिकाणी बांधण्यात आलेली हॉल यांचे व्यवस्थापन योग्य प्रकारे व्हावे त्यापासुन महानगरपालिकेस उत्पन्न मिळावे,सदर हॉल नोंदणीकृत संस्था, गृहनिर्माण संस्थेला देखभालीसाठी देण्यांत यावे म्हणून त्याचे योग्य भाडे आकारणी करणे,त्यांचा वापर व व्यवस्थापन संबंधीचे नियम व अटी व शर्ती यासंदर्भात प्रशासनाने नियमावली तयार करुन सर्व हॉलचे सविस्तर प्रस्ताव पुढील सभेस ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम २९-अ(७) अन्वये प्रभाग समित्यांची कामे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण देखरेखी व नियंत्रणाखाली असून कलम २९-अ (८) प्रमाणे महानगरपालिकेला ठराव करुन त्याद्वारे योग्य व इष्ट वाटतील अशी इतर कामे प्रभाग समितीकडे सोपविता येतील.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ(७) आणि सन २००९ मध्ये कलम २९ (अ) ७ (ड) हे कलम नव्याने समाविष्ट झाल्याने आता प्रभाग समितीचे अधिनियमाच्या तरतुदीनुसार खालील प्रमाणे कामाचे स्वरुप निश्चित करण्यात आलेले आहे.

प्रामुख्याने पाणी पुरवठा,जलनिःसारण,स्वच्छता आणि पावसाच्या तुंबलेल्या पाण्याचे विल्हेवाट, प्रभागाशी संबंधीत अंदाजपत्रकासाठी आयुक्तांना शिफारस करणे, प्रभाग समिती क्षेत्रात रक्कम रु. ५ लाखापर्यंतच्या खर्चाच्या कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे या पुर्वीच्याच तरतुदी असून नव्याने समाविष्ठ तरतुदी मध्ये घनकचरा व्यवस्थापन,मलप्रवाह विल्लेवाट, मलनिःसारण,वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन,स्वच्छता विषयक बांधकामे आणि विकास योजना यांच्या संबंधात शिफारसी करणे त्यांचा आढावा घेणे विकास विषयक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी ऐच्छिक कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग मिळविणे,प्रभागातील उपवनांच्या देखभालीची सुनिश्चिती करणे इत्यादी कामे निश्चित केलेली आहेत त्याशिवाय महानगरपालिकेस योगय व इष्ट वाटतील अशी कामे प्रभाग समितीकडे,सोपविता येतील.

वार्ड अभियंता यांना फक्त रु. १०,०००/- च्या मर्यादेपर्यंत तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. व रु. २.५० लाखा पर्यंतचे कामे मंजुरीचा अधिकार कार्यकारी अभियंता या स्तरावर देण्यात आलेले आहेत. वास्तविक पाहता रु. ५ लाखा पर्यंतचे अधिकार प्रभाग समितीला असतांना किमान ५ लाखाच्या हद्दीपर्यंत का होत नाहीत. त्यांना वर उल्लेखीत केल्याप्रमाणे कामासाठी तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीचे अधिकार तसेच सदर कामांच्या निविदा काढणे,प्रभाग कार्यालय स्तरावर देयकांची अदाईगी करणे शिवाय प्रशासनाला आणखी योग्य वाटतील अशी कामे सोपविण्यासाठी अधिनियमाचे कलम २९ अ(८) प्रमाणे महानगरपालिकेच्या ठराव करुन प्रभाग समितीकडे कामे सोपविता येतील.

प्रभाग कार्यालयाचे अ,ब,क,ड,इ आणि फ सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने अधिनियमाच्या तरतुदीनुसार व महानगरपालिकेच्या असलेल्या अधिकारानुसार लोकाभिमुख प्रशासन प्रत्यक्ष कृतीत येण्यासाठी येत्या सर्वसाधारण सभेपुढे अधिनियमाचे कलम २९-अ(८) अन्वये प्रभाग समितीकडे वर नमुद कामे या शिवाय इतरही आवश्यक ती कामे सोपविण्यासाठी प्रशासकीय प्रस्ताव ठेवण्यात यावा.

सुचक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव, श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत,
श्री.बारवाल गजानन रामकिसन, श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ.

अनुमोदक: श्री.अनिल जुगललाल जैस्वाल,श्री.बबन पंडितराव नरवडे,श्रीमती कला रविनंदन ओझा,
श्री.खेडकर सुशिल तुकाराम,

श्री.सुशील खेडकर :कल्पना दयायला २४-२४ तास लागतात लोकांना स्थलांतरीत करण्यास

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ(७) आणि सन २००९ मध्ये कलम २९ (अ) ७ (ड) हे कलम नव्याने समाविष्ट झाल्याने आता प्रभाग समितीचे अधिनियमाच्या तरतुदीनुसार खालील प्रमाणे कामाचे स्वरुप निश्चित करणे तसेच प्रामुख्याने पाणी पुरवठा,जलनिःसारण,स्वच्छता आणि पावसाच्या तुंबलेल्या पाण्याचे विल्हेवाट, प्रभागाशी संबंधीत अंदाजपत्रकासाठी आयुक्तांना शिफारस करणे, प्रभाग समिती क्षेत्रात रक्कम रु. ५ लाखापर्यंतच्या खर्चाच्या कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे या पुर्वीच्याच तरतुदी असून नव्याने समाविष्ठ तरतुदी मध्ये घनकचरा व्यवस्थापन,मलप्रवाह विल्लेवाट, मलनिःसारण,वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन,स्वच्छता विषयक बांधकामे आणि विकास योजना यांच्या संबंधात शिफारसी करणे त्यांचा आढावा घेणे विकास विषयक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी ऐच्छिक

कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग मिळविणे,प्रभागातील उपवनांच्या देखभालीची सुनिश्चिती करणे इत्यादी कामे निश्चित केलेली आहेत त्याशिवाय महानगरपालिकेस योगय व इष्ट वाटतील अशी कामे प्रभाग समितीकडे,सोपविता येतील.

वार्ड अभियंता यांना फक्त रु. १०,०००/- च्या मर्यादेपर्यंत तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. व रु. २.५० लाखा पर्यंतचे कामे मंजुरीचा अधिकार कार्यकारी अभियंता या स्तरावर देण्यात आलेले आहेत. वास्तविक पाहता रु. ५ लाखा पर्यंतचे अधिकार प्रभाग समितीला असतांना किमान ५ लाखाच्या हद्दीपर्यंत का होत नाहीत. त्यांना वर उल्लेखीत केल्याप्रमाणे कामासाठी तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीचे अधिकार तसेच सदर कामांच्या निविदा काढणे,प्रभाग कार्यालय स्तरावर देयकांची अदाईगी करणे शिवाय प्रशासनाला आणखी योग्य वाटतील अशी कामे सोपविण्यासाठी अधिनियमाचे कलम २९ अ(८) प्रमाणे महानगरपालिकेच्या ठराव करुन प्रभाग समितीकडे कामे सोपविता येतील.

प्रभाग कार्यालयाचे अ,ब,क,ड,इ आणि फ सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने अधिनियमाच्या तरतुदीनुसार व महानगरपालिकेच्या असलेल्या अधिकारानुसार लोकाभिमुख प्रशासन प्रत्यक्ष कृतीत येण्यासाठी अधिनियमाचे कलम २९-अ(८) अन्वये प्रभाग समितीकडे वर नमुद कामे या शिवाय इतरही आवश्यक ती कामे सोपविण्यासाठी प्रशासकीय प्रस्ताव ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष तसेच केंद्रीय कृषी मंत्री, महाराष्ट्राचे सुपुत्र मा.ना.श्री.शरद पवार यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेली आहे. श्री.शरद पवार यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी निवड होणे तमाम भारतीयांसाठी गौरवास्पद असून, त्यांच्या सारख्या अनुभवी व्यक्तीमुळे या पदाची शान तर वाढेलच त्याचबरोबर जगात क्रिकेटचा प्रसारही मोठया प्रमाणावर होईल, असा विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या वाटयाला हा मान पहिल्यांदाच येत असल्याने अभिमानास्पद बाब आहे. करीता त्यांचे अभिनंदन करण्यांत यावे व तसे प्रशासनातर्फे त्यांना कळविण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ. अनुमोदक :शेख खाजा शरफोद्दीन,

| | |
|---|---|
| श्री.गिरजाराम हळनोर | :मंजूर करण्यास विरोध नाही परंतु त्यांचे अभिनंदन करीत असताना विनंती की त्याचे सोबत पाठवावे की या महाराष्ट्रातील शेतक-याकडे क्रिकेट इतकेच प्रमाणे बघावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :मा.ना.श्री.शरद पवार यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली महाराष्ट्राला हा पहिल्यादांच मान मिळाला.त्यांनी समांतर जलवाहिनी, जवाहरलाल नेहरू योजनेत त्यांनी मोठा हातभार लावला म्हणून ती योजना पूढे आली या शहराला त्याचा मोठा फायदा होईल.हा ठराव मंजूर करून सभागृहाच्या भावना त्यांना कळवाव्यात. |
| मा.महापौर | :मंजूरी देण्यात येते. |

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्रीय कृषी मंत्री, महाराष्ट्राचे सुपुत्र मा.ना.श्री.शरद पवार यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेली असल्याने अभिनंदन करण्याच्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, खाम नदीच्या पात्रात तसेच शहरातील विविध नाल्यांच्या लगत असलेल्या वसाहती पावसाच्या येणाऱ्या पुरामुळे वारंवार बाधित होत असतात. अशा वसाहतींचा सर्वे करुन त्या अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यांत याव्यात करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ. अनुमोदक :शेख खाजा शरफोद्दीन,

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खाम नदीच्या पात्रात तसेच शहरातील विविध नाल्यांच्या लगत असलेल्या वसाहती पावसाच्या येणाऱ्या पुरामुळे वारंवार बाधित होत असतात. अशा वसाहतींचा सर्वे करुन त्या अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२५ आयोध्यानगर येथील अल्पोत्पन्न गटातील लोकसंख्या व सभोवतील असलेल्या कामगार व स्लम भाग विचारात घेता या परिसरासाठी महानगरपालिकेचे अद्यायावत आरोग्य केंद्र आवश्यक झाले आहे. एन-७ भागातील जुने पाणी पुरवठा कार्यालयात जागा उपलब्ध असल्याने सदरील ठिकाणी मनपातर्फे सर्व सोयीयुक्त आरोग्य केंद्र सुरु करणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ. अनुमोदक :श्री.शेख खाजा शरफोद्दीन,

श्री.अनिल जैस्वाल :हा प्रस्ताव योग्य आहे त्यास मंजूरी दयावी तसेच त्या ठिकाणी दोन जागा आहे एका ठिकाणी आरोग्य केंद्र व एका जागेवर वार्ड कार्यालय-ब करण्यात यावे सध्याचे वार्ड कार्यालय -ब हे नागरीकांना दुर पडते. तसेच तो मोठा रस्ता असल्याने समोरच्या बाजूने शॉपींग सेन्टर काढावे त्यामूळे महापालिकेचया उत्पन्नात भर पडेल.

मा.महापौर :हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२५ आयोध्यानगर येथील अल्पोत्पन्न गटातील लोकसंख्या व सभोवतील असलेल्या कामगार व स्लम भाग या परिसरासाठी महानगरपालिकेचे अद्यायावत आरोग्य केंद्र एन-७ भागातील जुने पाणी पुरवठा कार्यालयात जागा उपलब्ध असल्याने सदरील ठिकाणी मनपातर्फे सर्व सोयीयुक्त आरोग्य केंद्र सुरु करणेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नुकत्याच झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी घरे पडल्यामुळे नागरीकांचे मोठयाप्रमाणात नुकसान झालेले आहे. या संदर्भातील सर्वेक्षण मनपा प्रशासनातर्फेही करण्यांत आलेला आहे. या नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या नागरीकांचे नुकसान झालेले आहे. त्यांना तात्काळ मदत म्हणून रु. २५ हजार व ज्यांना प्राण गमवावे लागले त्यांना रु.१.०० लाखाचे आर्थिक सहाय्य करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ. अनुमोदक : श्री.शेख खाजा शरफोद्दीन,

श्री.काशिनाथ कोकाटे : हा विषय आपण मंजूर केला परंतु यावर प्रशासनाचा खुलासा घेण्याची आवश्यकता आहे गेल्या बैठकीत हा विषय मंजूर केलेला होता.ज्या वेळेस अशी आपत्ती घडली त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने संबधीताच्या नातेवाईकांना फक्त ५०,००० रू. आर्थीक मदत म्हणून धनादेश देण्यात आलेला आहे ५० हजार देण्यात आलेले नाही.१ लक्ष देण्यास मंजूरी देण्याची शिफारस करीत आहे. मागिल वेळेस २ लक्ष देण्याचे मान्य केले प्रशासनाने १ लक्ष रू देण्याची तयारी दर्शवली त्यापैकी ५० हजारच देण्यात आले.

मा.महापौर : राज्य शासनाकडे अशा आपत्तीच्या नुकसान भरपाईसाठी मदत मागविलेली आहे.दोन मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५० हजार रूपयाची मदत पण केलेली आहे. हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.खाजा शरफोद्दीन :ज्या लोकांचे संसार उध्दस्त झाले त्यांचेसाठी काय आर्थीक मदत करणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :शहरातील लोक हे आपले नागरीक व मतदार आहेत.प्रशासनाच्या वतीने ठिकठिकाणी सर्वेचे काम झालेले आहे ज्यांचे नुकसान झाले त्यांना ५-१० हजार पर्यत आर्थीक मदत करावी.त्यांना दिलासा दयावा.

मा.महापौर :सर्वेचे काम सुरू आहे निश्चित अशा बाबतीत मदत करण्याचा निर्णय घेवू

श्री.गिरजाराम हाळनोर :जी आर्थीक मदत शासनाकडे मागविलेली आहे ती प्राप्त होताच अशा नागरीकांना मदत देण्यात यावी.

श्री.शेख खाजा शरफोद्दीन:एक व्यक्ती पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. १०-१२ घरे पुर्ण पणे वाहून गेले जवळपास ७५ नागरीक जवळच असलेल्या आयशा फन्शन हॉलमध्ये वास्तव्य करून होते. या काळात प्रशासनाकडे ३०-३५ वेळा दुरध्वनी वरील संपर्क केला काहींनी मा. आयुक्ताना असे सांगितले की पुर्नवस एकाही ठिकाणी झालेले नाही. मा.आयुक्तांनी स्वत: येवून बघीतले अधिकारी एकही तेथे तोपर्यत येवून गेलेले नव्हते. अशा अधिका-यावर काय कार्यवाही करणार आहे.जे बेघर झाले त्यांना काय मदत करणार आहे.

मा.महापौर :सविस्तर माहिती द्यावी मदत करु माहिती देण्यात यावी जसे फोटो,कोणत्या भागातील रहिवाशी ई. माहिती द्यावी.

श्री.अब्दुल रऊफ खान : काहीच राहिलेले नाही पुर्णपणे घर वाहून गेले.

मा.महापौर :पुर्णपणे त्या व्यक्तीची माहिती दयावी त्यांचा फोटो , कोणत्या भागात राहत होते. त्या ठिक्राण सर्वे करून जी काय मदत करता येईल ती देण्यात येईल.

श्री.शेख खाजा शरफोद्दीन:महापालिकेतर्फे तेथे सर्वेचे काम झालेले आहे प्रशासनाला माहित आहे संबधीत अधिकारी यांना विचारणा करावी.

मा.महापौर :एखादा व्यक्ती मृत्यू पावलेली असेल तर त्यांचे नातेवाईकांना ५०-५० हजारापर्यत महानगरपालिकेने मदत केलेली आहे.तसे मनपाचे धोरण आहे.

श्री. अब्दुल रऊफ खान :ज्याची घरे उध्दस्त झाली त्यांना काय मदत करणार आहे.मा.आयुक्तांनी म्हटले होते काहीना काही मदत केली जाईल.

मा.महापौर :काहीना काही मदत केली जाईल जे व्यक्ती मृत्यू पावले त्यांचे नाव फोटो व कोणत्या भागात राहतात सर्व डिटेल माहिती माझेकडे घेवून यावे. त्यांना ५० हजाराची आर्थीक मदत केली जाईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या नागरीकांचे नुकसान झालेले आहे. ज्यांना प्राण गमवावे लागले त्यांना रु.५०/- हजार आर्थिक सहाय्य करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कनार्टक राज्यातील बेळगांवमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीच्या मोर्चावर पाशवी अत्याचार व लाठीहल्ला करणाऱ्या कर्नाटक सरकारचा निषेध करण्यांत यावा. तसेच सीमा भागातील मराठी बांधवांना आपण त्यांच्या सोबत असल्याच्या भावना कळविण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ. अनुमोदक :श्री.शेख खाजा शरफोद्दीन,

श्री.गिरजाराम हळनोर :या प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक यांची जी भावना आहे तीच आमच्या सर्वांची आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :कर्नाटक आणि बेळगाव या सीमालगत जे मोठे शहरे आहे जेंव्हा स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेस या शहरास स्वातंत्र्य मिळायला पाहिजे होते.त्यातील ४६५ गावे हे कर्नाटकाच्या हट्टापायी महाराष्ट्रात आले नाही.तेंव्हापासून तो प्रांत कर्नाटकामध्येच राहिला तेथील सरकारने व शासनाने तेथे मराठी भाषे ऐवजी कन्नडी भाषेची सक्ती केली शाळेतील मुलांना कन्नडी भाषेतून शिक्षण दिले जाते.यामूळे राज्य घटनेच्या १४,१५ कलमाचे उल्लघंन होते.मराठी भाष जोपासली जावी त्यात वाढ व्हावी म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील काही पथके जात होती त्यांना या सरकारने बंदी घातली आहे.मराठी भाषेचे विदयापीठ बंद करण्यात आले ही निषेधार्थ बाब आहे. मागचा इतिहास बघीतला तर मा.महापौर मा.आमदारावर लाठीहल्ला झाला या सरकारचा निषेध करण्याच्या या ठरावास मान्यता दयावी सभागृहाच्या भावना भारत देशाचे मा. पंतप्रधान श्री.मनमोहनसिंग यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना कळवाव्यात.

श्री.त्र्यंबक तुपे :जो प्रस्ताव ठेवला त्याचे मी समर्थन करतो मा. शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी गेल्या अनेक वर्षापासुन सीमा भागातील मराठी बांधवासाठी खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहून चळवळीला पाठींबा दिला सीमा भागातील मराठी बांधवासाठी मा. सेनाप्रमुखांनी तीन महिने तुरूंगवासही भोगला आहे या मराठी बांधवाच्या हक्कासाठी ६६ शिवसैनिकांनी आपले बलीदान दिले आहे.आजसुध्दा कर्नाटकीय सरकार मराठी बांधवावर अन्याय व अत्याचार करीत आहे म्हणुन मी या ठरावाचे समर्थन करून कर्नाटक सरकारचा निषेध करतो प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर :या सभागृहाच्या वतीने कर्नाटक सरकारचा निषेध करण्यात येतो.यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बेळगांव मध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीच्या मोर्चावर पाशवी अत्याचार व लाठीहल्ला करण्यात आलेला असल्याने या कारणास्तव कर्नाटक सरकारचा निषेध करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पुंडलीकनगर वार्ड क्र.८३ व ८४ हे प्रभाग लोकसंख्यने खुप मोठे आहेत. या भागात औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणारे कामगार, विविध क्षेत्रात काम करणारे कारागिर,हातावर पोट असणारे मजुर मोठया प्रमाणावर राहतात. परंतु त्यांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी म.न.पा.ची चांगली शाळा नाही. न्यु हनुमाननगर येथे म.न.पा.ची प्राथमिक शाळा आहे. परंतु या शाळेला योग्य इमारत नसल्यामुळे १०X१० च्या ३ रुम असलेले घर शाळेसाठी म.न.पा.ने भाडयाने घेतलेले आहेत. या शाळेत अपुरी जागा असल्यामुळे एका रुममध्ये फक्त २० विद्यार्थी बसू शकतात त्यामुळे शिक्षकांना मुलांना शिकविणे अवघड झालेले आहे. तर पहिले ते चौथी पर्यंतचे विद्यार्थ्याना एकत्र बसावे लागते. एकंदरीत शाळेची परिस्थिती दैयनिय असल्यामुळे पालकांना आपल्या मुलांना शाळेत पाठवावे वाटत नाही. तर दुसरीकडे खाजगी शाळांना प्रचंड फिस असल्यामुळे तेथे पाठविणे शक्य नाही. त्यामुळे आम्ही विनंती करत आहो की, न्यु हनुमाननगर येथील जल कुंभाच्या शेजारी असलेल्या म.न.पाच्या नियोजीत जागेवर शाळा बांधून तमाम गोरगरीबांच्या मुलांना त्यांच्या हक्काचे शिक्षण मिळावे करीता शाळेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी म्हणून प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक :श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव अनुमोदक : श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंढलीक नगर वार्ड क्र. ८३ व ८४ येथील न्यु हनुमाननगर येथील जल कुंभाच्या शेजारी असलेल्या म.न.पाच्या नियोजीत जागेवर गोरगरीबांच्या मुलांना त्यांच्या हक्काचे शिक्षण मिळणे करीता शाळेची सुविधा उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पुंडलीकनगरच्या मध्यभागातुन मोठा नाला वाहतो, न्यु हनुमान नगर,मातोश्री नगर व पुंडलीकनगर या भागातील पावसाचे पाणी या नाल्यातुन वाहते. छोटा मोठा पाऊस पडला की, या नाल्याला पुर येतो. या नाल्यावर खुप दिवसांपुर्वी काही ठिकाण डब्बर काम केले होते व रस्त्याच्या ठिकाण पाईप टाकण्यात आले होते हे डब्बर काम खिळखिळे झाले असून बऱ्याच ठिकाणी वाहून गेले आहे. नाल्यामध्ये मोठयाप्रमाणावर गाळ जमा झाल्यामुळे नाला पुर्ण बुजला आहे. गजानन नगर कडे जातांना नागरीकांना हा नाला ओलांडून जावे लागते. थोडा पाऊस पडला की या ठिकाणी नाल्याला पुर येतो व रस्त्यावरील छोटया पुलांवरुन पाहणी वाहते त्यामुळे नाला ओलांडने अवघड होते. तसेच नाला बुजल्यामुळे नाल्यातील पाणी आजुबाजुच्या घरामध्ये शिरते व त्यामुळे नागरीकांचे बरेच नुकसान होते. घाणपाणी घरामध्ये घुसल्यामुळे अनेक साथीचे रोग उदाः कॉलरा,डेंग्यु,मलेरिया,काविळ,गॅस्ट्रो इत्यादि येण्याची

शक्यता आहे. काही दिवसापुर्वीच झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागात हाहाकार उडाला होता. अनेक घरामध्ये पुराचे पाणी घुसल्यामुळे नागरीकांची मोठया प्रमाणावर नुकसान  झाले. तर केवळ काही नागरीकांच्या दक्षतेमुळे एक बारा वर्षाची मुलगी वाहून जातांना वाचली सदर परिस्थितीची लगेच मा.महापैार तसेच शिवसेनेचे खा.मा.चंद्रकांतजी खैरे साहेब,नंदकुमारजी घोडिले सभागृह नेता मा.गिरजाराम हाळनोर यांनी पाहणी केली होती. तेव्हा या संकटातुन नागरीकांना मुक्त करण्यासाठी या नाल्याच्या दोन्ही बाजुने चॅनलिंग करुन नाला दुरुस्त करण्यात यावा गाळ त्वरीत काढण्यात यावा तसेच प्रत्येक गल्लीमध्ये रस्त्यावर पुल बांधण्यात यावे जेणे करुन नागरीकांना शाळेतील मुलांना पावसाळयात सहज नाला ओलांडता येईल करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव अनुमोदक : श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे पुंडलीकनगरच्या मध्यभागातुन मोठा नाला वाहतो या नाल्याच्या दोन्ही बाजुने चॅनलिंग ,नाला दुरुस्त करणे ,त्यातील गाळ काढणे या भागातील प्रत्येक गल्लीमध्ये रस्त्यावर पुल बांधणे ई. कामे करण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.४५:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, न्यु हनुमाननगर हा वार्ड क्र. ८३ व ८४ या प्रभागात समाविष्ट आहे. २००७ साली न्यु हनुमान नगर,पुंडलीकनगर येथील जलकुंभातुन या भागाला पाणी पुरवठा करण्यात आला. परंतु यासाठी अंतर्गत टाकण्यात आलेली जलवाहीनी ही जलकुंभा पासून २०० मी.पर्यंत १५० मी.मी. तर त्यापुढे १०० एम.एम. व्यासाची पाईप लाईन टाकण्यात आलेली त्यामुळे पुढील भागामध्ये आवश्यक एवढा पाणी पुरवठा होत नाही. तसेच गेल्या तिन वर्षामध्ये या भागातील नळ धारकांची संख्या ही मोठया प्रमाणावर वाढली आहे त्यामुळे येथील रहिवाश्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अल्पप्रमाणात होतो तर काहीना पाणीच मिळत नाही.

त्यासाठी गेल्या वर्षभरापासून नागरीकांनी अनेक वेळा अंदोलने केली एकदा तर पाणी प्रश्न सुटावासाठी या भागातील नागरीक जलकुंभावर चढून ठिय्या आंदोलन केले होते. करीता न्यु हनुमान नगर येथील गल्ली नं. २,३,४ व ५ या भागातील दक्षिणेकडील भागांना योग्य पाणी पुरवठा होण्यासाठी या भागात नविन मोठया व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्यात याव्या व हा प्रश्न सोडून (जलकुंभ ऊशाशी तर पाण्या विना उपाशी) अशा परिस्थितीत सापडलेल्या नागरीकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येतुन मुक्त करावे करीता प्रस्ताव मंजुरीसाठी सादर .

सुचक :श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव अनुमोदक : श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे  न्यु हनुमान नगर पुडंलिकनगर भागात  गल्ली नं. २,३,४ व ५ या भागातील दक्षिणेकडील भागांना योग्य पाणी पुरवठा होण्यासाठी या भागात नविन मोठया व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्यास व या भागातील नागरीकांची पिण्याच्या पाण्याची समस्या दुर करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.४६:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,  बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार सन २०१० च्या कायदयाची चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये विद्यार्थीसंख्या अत्याअल्प आहे. ज्या फायदा खाजगी शाळांना मोठया

प्रमाणावर होतो. आपल्या मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेची विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी शाळेचा शैक्षणिक दर्जा भौतिक सुविधा व गुणवत्ता सुधारणे अत्याआवश्यक आहे. तसेच मनपाच्या अधिनियमानुसार शहरातील गरजु व गरीब विद्यार्थ्यांना उच्च व चांगल्या दर्ज्याचे शिक्षण मिळवण्यासाठी मनपा लाखो रुपये खर्च करत आहे. तरी विद्यार्थी संख्या वाढत नाही.

त्यासाठी मनपाच्या ज्या शाळेमध्ये कमी विद्यार्थी संख्या आहे किंवा बंद असलेली शाळा प्रायोगिक तत्वावर सेवाभावी संस्था/शिक्षण संस्थांना काही अटी शर्ती नुसार चालविण्यासाठी देण्यात यावे जेणे करुन मनपा शाळेमधील विद्यार्थी संख्या व शैक्षणिक दर्जा तसेच मनपा शाळे कडे बघण्याचा दृष्टीकोन पालकांचा बदलेले. व आपल्या पाल्याचे मनपा शाळेत प्रवेश घेण्यासाठी उत्सुक होतील.

सुचक : श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण　　　अनुमोदक :श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल,
श्री.गादगे विरभद्र रामलींग

श्री.संजय चौधरी　　:काही शाळा खाजगी संस्थेला प्रायोगिक तत्वावर दत्तक देण्यासाठीचा ठराव आहे महापालिका शाळेच्या इमारती प्रशस्त व सर्व सुविधा देत असताना ही वेळ का येते.विषय महत्वाचा असून गार्भीयाने घ्यावा.दै.सकाळ दै.तरूण भारत एमसीएन चॅनल यांनी यास प्राधान्य देवून जनतेसमोर आणले त्यांचे अभिनंदन करतो.शिक्षण समितीचा सभापती या नात्याने शाळांना भेटी दिल्या असता काही शाळेत विदयार्थी २०० तर शिक्षक ३ काही शाळेत एक शिक्षक तर चौकीदार ३ अशी परीस्थिती दिसून आली ही तूट प्रशासनाने भरून काढली पाहिजे.अनेक विदयार्थ्यांना त्यांचे नाव लिहिता येत नाही तर ५० टक्के विदयार्थ्यांना मराठी वाचन करता येत नाही ही लज्जास्पद बाब आहे.शाळेचा दर्जा व मुलांना चांगले शिक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी स्टेशनरी पुरविणे आवश्यक आहे माहे मे-२०१० पासून संचिकेला मंजूरी मिळाली नाही.शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे.त्या त्या वार्डाचे स.सदस्य यांनी वेळोवेळी शाळेला भेटी देवून तेथील पोषक आहार व शौचालय व इतर गोष्टी व्यवस्थीत आहे किंवा नाही याची माहिती घेवून प्रशासनाला कळविले पाहिजे. जेथे माध्यमिक वर्ग सुरू झाले शिक्षक प्रतिनियुक्तीवर दिले अदयाप रूजू झाले नाही.त्यांचेवर काय कार्यवाही केली.

मा.महापौर　　:प्रतिनियुक्तीवर आलेले शिक्षणाधिकारी यांना परत पाठविलेले आहे.

श्री.संजय चौधरी　　:शिक्षणाधिकारी पुरता हा विषय मर्यादीत नाही.स्टेशनरी आतापर्यत का दिली नाही.शिक्षणाचा दर्जा उंचावयाचा असेल तर सर्व सुविधा साहित्य वेळेच्या आत त्या त्या ठिकाणी पुरविण्यात आले पाहिजे.गुणवत्ता वाढविण्यासाठी वरीष्ठ अधिका-याकडे १०-१० शाळांना भेटी देवून तेथील सर्व तपासणी करून माहिती घेवून ती सादर करण्याचे काम देण्यात यावे ट्रस्टी संस्थेला नेमून महापालिकेच्या शाळेचा दर्जा तपासला जावा.यामूळे शाळेची गुणवत्ता व दर्जा उंचावण्यास मदत होईल प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घ्यावा जो ठराव माडंला त्यास माझा पांठिबा आहे

श्री.रेणुकादास वैद्य : दिं.१६ जूलैच्या दै. सामनामध्ये शाळेतील शिक्षकांचा बट्टयाबोळ असे आले या बातमीचे अवलोकन केले तर सर्व विषयाचा उहापोह होईल.शाळेच्या संदर्भात अनेकदा चर्चा होवून सुध्दा दर्जा सुधारत नाही.माझ्या ही वार्डात महापालिकेची शाळा व त्या शाळेसाठी मोठे प्रांगण आहे असे असतांना तेथे विदयार्थी संख्या कमी आहे शहरात अनेक संस्था असून त्या शाळा घेवून पालकत्व स्विकारू शकतात अशा पध्दतीने देण्यास हरकत नसावी यापूर्वीही अनेकदा ठराव झाले परंतु त्यांची अमलबजावणी केली नाही.प्रायोगिक तत्वावर करायचे झाल्यास माझे वार्डापासून सुरूवात करावी जी संस्था नियमात बसेल अशा संस्थेला देण्यास हरकत नसावी या ठरावास माझा पांठीबा आहे.

श्री.मिलींद दाभाडे इतर विभागाची कामे निष्कृष्ठ दर्जाची झाली तर दुरूस्त करता येते परंतु शिक्षण निष्कृष्ठ दर्जाचे दिले गेले तर त्यात सुधारणा करणे कठीण होते.महापालिकेतील शिक्षण म्हणजे गरीब लोकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न येतो.शिक्षण विभागाकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.शिक्षणाधिकारी यांना परत पाठविणेचा निर्णय घेतला त्याबध्दल आपले अभिनंदन गेल्या दीड दोन वर्षात शिक्षणाचा दर्जा सुधारलेला नाही.महापालिकेतील अधिकारी हे जबाबदारीने कामे करतात किंवा नाही याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.खाजगी शाळेप्रमाणे महापालिकेच्या शाळेचा दर्जा सुधारला जावा.पटसंख्येनुसार शाळेला शिक्षक दयावे भावसिंगपूरा शाळेत शिक्षक कमी आहे.या प्रस्तावास विरोध नाही परंतु महापालिकेच्या शाळा खाजगी संस्थेला देण्यात येवू नये.

सौ.साधना सुरडकर :अनेक ठिकाणी महापालिकेच्या इमारती चांगल्या असून जेथे विदयार्थी संख्या आहे तेथे शिक्षकाचे नियोजन केले नाही.राजगूरूनगर भागात सर्व शिक्षा अभियांन अंतर्गत ३ हॉल बांधण्यात आले ठेकेदाराने ते महापालिकेला हस्तांतर केले नाही.सदर हॉल उपलब्ध करून देणे संदर्भात मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे पत्र दिले अदयाप कार्यवाही झाली नाही सद्यस्थितीत शाळेतील मूले् रेतीवर बसतात तसेच शाळेत स्वच्छतागृह असावे याकडे लक्ष देण्याची गरज आहे. शाळा प्रायोगिक तत्वावर न देता या शाळेचा दर्जा महापालिकेने सुधारावा. जेणे करून खाजगी शाळेप्रमाणे दर्जा उंचावला पाहिजे.

श्री.सुरेद्र कुलकर्णी :शाळेच्या इमारती व तेथे प्रांगण चांगले आहे. परंतु देण्यात येणारे शिक्षण व्यवस्थीत नाही शिक्षक संख्या कमी असल्याने दर्जा सुधारत नाही. या संदर्भात अनेकदा चर्चा झाली.शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. तेथे सर्व सोयी सुविधा पुरवाव्यात. या प्रस्तावास मान्यता दयावी.

श्री.प्रमोद राठोड :वेगळया पध्दतीने खाजगीकरणाचा आणखी एक प्रयोग करतो महापालिकेची इमारत आहे शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाकडील येणारे ग्रॅण्ड कसे खर्च करावे याचा विचार न करता त्या इमारती खाजगी संस्थेला देण्याचा ठराव ठेवला यामूळे एखादया खाजगी संस्थेच्या बाजूला महापालिकेची शाळा असेल तर ती संस्था इकडील विदयार्थी संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करेल व कालांतराने ती

इमारतीची मागणी करू शकते.याचा विचार करावा जनतेच्या हिताच्या दृष्टीने विचार करून हा विषय मंजूर करू नये.

श्री.संजय चौधरी :शाळा प्रायोगिक तत्त्वावर देत आहोत सर्व शाळा नाही.एका शाळेला भेट दिली असता ६ वीच्या वर्गात १ विदयार्थी दिसून आले बाजूला खाजगी शाळा चांगली असेल तर या शाळा देण्यास हरकत नसावी.खाजगीकरण करीत नाही. नियमावली नुसार कार्यवाही होईल.

श्री.प्रमोद राठोड :महापालिकेनेच प्रायोगिक तत्त्वावर काही शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करावे. खाजगी संस्थेला शाळेच्या इमारती दयायच्या प्रायोगिक तत्वावर करणार आपण आपल्या शरीरात विष पेरल्या सारखे होईल.

श्री.मिलींद दाभाडे :ज्या शाळेत विदयार्थी संख्या आहे त्या शाळा देवू नये.

श्री.विकास जैन :या संदर्भात नियमावली तयार करावी मान्यतेसाठी आणावी त्यानंतर ठरवावे कोणती शाळा देणार स.सदस्याची एनओसी घ्यावी.

श्री.प्रमोद राठोड :महापालिकेची मालमत्ता आहे खाजगी संस्थेला का देण्यात येते दुसरे उपक्रम तेथे राबवावे.नियमावली तयार करून ती सादर करावी त्यास मान्यता मिळाली तरच हा प्रस्ताव घेण्यात यावा.हया इमारती विकण्याचा किंवा देण्याचा आपल्याला अधिकार नाही जनतेचा पैसा यासाठी खर्च झालेला आहे.

श्री.संजय चौधरी :गैरसमज होत आहे या शाळा खाजगी संस्थेला विकत नाही दत्तक म्हणून चालविण्यासाठी देत आहोत.

श्री.सुरेद्र कुलकर्णी :एक शाळा प्रायोगिक तत्त्वावार देण्यात यावी त्याचा विकास बघून नंतर नियोजन करून कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :शिक्षण विभाग व इतर सर्वच विभाग काम करण्यास निष्क्रिय आहेत काय ?

श्री.गिरजाराम हळनोर :एखादया गोष्टीची सुधारणा करणे,अधुनिकता आणणे बदल करणे याचा अर्थ महापालिकेचे विभाग निष्क्रीय आहे असा होत नाही.

श्रीमती रेखा जैस्वाल :शाळा खाजगी संस्थेला देण्यात येवू नये महापालिकेने दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करावा.

श्री.प्रमोद राठोड :याची नियमावली तयार करावी प्रस्ताव मंजूर करण्यास आमचा विरोध आहे शासकीय इमारत कुणालाही देवू नये.

श्री.गिरजाराम हळनोर :ज्या शाळा अटी शर्ती पुर्ण करतील शैक्षणिक वर्ष पूर्ण करतील त्यांना काही शाळा प्रायोगिक तत्वावर चालविण्यास देण्यात याव्या हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.अमीत भुईगळ :या शाळेत दलित , मुस्लीम व व इतर समाजातील गोरगरीबांची मूले शिक्षण घेतात खाजगी संस्थेला देवू नये महापालिकेने दर्जा सुधारावा.प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री.गिरजाराम हळनोर :खाजगीकरण वगैरे होत नाही.

मा.महापौर :प्रशासनाने या संदर्भात एक निमयावली तयार करून सादर करावी.त्या भागातील नागरीक व नगरसेवकाची देण्यास मागणी असेल तर प्रशासनाने परवानगी देण्यास हरकत नाही.अन्यथा ज्या प्रमाणे चालू आहे त्याप्रमाणे सुधारणा कराव्यात शाळा भाडेने देणेचे प्रायोगिक

तत्त्वावर देणेसाठी नियमावली सादर करणे.जेथे आवश्यक आहे तेथे देण्यास हरकत नसावी.

याच वेळी अनेक स.सदस्य मा.महापौर डायस समोर मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :असा गोधळ करू नये. सर्व विषय मंजूर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार सन २०१० च्या कायदयाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने व मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये विद्यार्थीसंख्या अत्याअल्प असल्याने तसेच शाळेचा शैक्षणिक दर्जा भौतिक सुविधा व गुणवत्ता सुधारणे गरजु व गरीब विद्यार्थ्याना उच्च व चांगल्या दर्ज्याचे शिक्षण मिळवण्यासाठी मनपाच्या ज्या शाळेमध्ये कमी विद्यार्थी संख्या आहे किंवा बंद असलेली शाळा प्रायोगिक तत्वावर सेवाभावी संस्था/शिक्षण संस्थांना काही अटी शर्ती नुसार चालविण्यासाठी देणेस आवश्यक ती नियमावली सादर करण्यास व जेथे आवश्यक आहे तेथे देण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, हर्सूल येथील जकात नाक्या पासून ते शहरात येईपर्यंत खाम नदीचे पात्र नागरीकांकडून केलेल्या अतिक्रमणामुळे अरुंद झाले आहे. त्यामध्ये ड्रेनेज ची मुख्य वाहिणी टाकण्यात आलेली आहे व सध्यास्थिती अनेक भागातील ड्रेनेज लाईन फुटलेली असून सदरील नाल्यात मल व सांड पाणी व पावसाचे सांड पाणी याच पात्रातुन नागरीकांनी बांधलेल्या घरात शिरते ज्यामुळे नागरीकांचे आर्थिक नुकसान किंवा पडझडीमुळे जिवीत होण्याची शक्यता नाकरता येत नाही. दरवर्षी पावसाळा सुरु झाल्यावर परिस्थिती चिंताजनक होत असते व आपल्या मनपा कार्यालयामार्फत त्यावेळेस कार्यवाही केली जाते. सदरील परिस्थिती उदभवण्यापुर्वी खामनदी (नाला) रुंद करुन पुणे पॅर्टन प्रमाणे खाम नदी (नाल्यास) संरक्षित भिंत बांधणी करावी,जेणे करुन पावाळयामध्ये येणाऱ्या सांड पाणी,कचरा अधिक चांगल्या पध्दतीने निचरा होईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण अनुमोदक :श्री.तुपे त्रिंबक गणपतराव,<br>श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल,<br>श्री.गादगे विरभद्र रामलींग

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे हर्सूल येथील जकात नाक्या पासून ते शहरात येईपर्यंत खाम नदीचे पात्र अतिक्रमणामुळे अरुंद झालाने नाल्यातील ड्रेनेजच्या पाण्या सह पावसाचे पाणी लोकाच्या घरात शिरते खामनदी (नाला) रुंद करुन पुणे पॅर्टन प्रमाणे खाम नदी (नाल्यास) संरक्षित भिंत बांधणी करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी..

**विषय क्र.४८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, क्रांतीनगर,कोकणवाडी,केसरसिंगपुरा ते सुयोग कॉलनी पर्यंत मोठया नाला वाहत आहे. सदरील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्यात आल्या होत्या,परंतु दिनांक ०२.०७.२०१० रोजी अतिवृष्टि पावसामुळे सदरील संरक्षित भिंती नाल्यामध्ये पडून नाल्यातील सांड पाण्याचा निचरा सुरळीत होत नसून उक्त भागातील नाकरीकांच्या घरात सांड पाणी शिरले ज्यामुळे नागरीकांचे फार मोठे आर्थिक नुकसान झालेली आहे. सदरील परिसरात मा.आमदार श्री.संजय शिरसाठ,मा.महापौर सौ अनिता घोडेले व मनपाचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष

स्थळ पाहणी केली. उक्त भागातील नाल्यात पडलेल्या संरक्षित भिंतीचा गाळ काढून पुन्हा नव्याने संरक्षित भिंती बांधण्याचे संबंधीत अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहे.

करीता नाल्यातील गाळ काढून संरक्षित भिंत बांधण्यासाठी रक्कम रु. १० लक्ष अर्थसंकल्पात तरतुद ठेवुन काम लवकरात लवकर हाती घेण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण अनुमोदक : श्री.तुपे त्रिंबक गणपतराव,
श्री.गादगे विरभद्र रामलींग

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे क्रांतीनगर,कोकणवाडी,केसरसिंगपुरा ते सुयोग कॉलनी पर्यंत वाहणा-या नाल्यातील गाळ काढून संरक्षित भिंत बांधण्यासाठी रक्कम रु. १० लक्ष अर्थसंकल्पात तरतुद ठेवुन काम लवकरात लवकर हाती घेण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.९६ हमालवाडा येथील नागरीकांसाठी पादचारी पुल मा.सर्वसाधारण सभेत यास मंजुरी देण्यांत आलेली आहे. तथापि या पुलाच्या कामासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध नसल्याने, सदरील पुल झाला नाही. करीता या पुलाच्या कामासाठी आर्थिक तरतुद उपलब्धतेसह पुलाचे काम त्वरीत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.शेख खाजा शरफोद्दीन, अनुमोदक : श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे हमालवाडा येथील नागरीकांसाठी पादचारी पुल करण्याच्या कामासाठी आर्थिक तरतुद उपलब्धतेसह पुलाचे काम त्वरीत करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अविष्कार कॉलनी वार्ड क्र.४८ येथील हनुमानमंदिर जी सेक्टर मध्ये खुप दिवसापुर्वीची पाणपोई असून ती गेल्या ५ वर्षापासून नादुरुस्त आहे १५ वर्षापुर्वी आजुबाजुला पाण्याची व्यवस्था नव्हती त्यामुळे त्या भागातील कामगार वर्गाला पिण्याच्या पाण्यासाठी त्या पाणपोईची व्यवस्था केली होती. परंतु पुढील काळात या भागात घरे झाली व पाण्याची ही व्यवस्था झाली त्यामुळे त्या पाणपोईची गरज राहीली नाही. त्यामुळे तीची देखभाल ही केली नाही. सध्या तिची पडझड झाली असून त्या पाणपोईची आवश्यकता नाही व ती सध्या रस्त्यावर रहदारीस अडचण निर्माण होत आहे व पाणपोईची अवस्था कचराकुंडी मध्ये झालेली आहे, ज्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तरी खराब झालेली पाणपोई पाडून टाकण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गादगे विरभद्र रामलींग

अनुमोदक : श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल, श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव,
श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे अविष्कार कॉलनी वार्ड क्र.४८ येथील हनुमानमंदिर जी सेक्टर मध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्याने तेथील नादुरूस्त असलेली रस्त्यातील पाणपोई आता गरज नसल्याने पाडून टाकण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.५१:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.०४ एकतानगर,जहांगीरकॉलनी हया नागरी वसाहतीलगत असलेली खाम नदी (मेन-सिव्हर ड्रेनेज लाईन) ची रुंदी वाढवून त्याभोवती संरक्षित भिंत बांधण्यात यावी.पावसाळयामध्ये पावसाचे पाणी आणि मलनि:सारण चे घाण पाणी नागरी वसाहतमध्ये घरा-घरात घुसते सर्व परिसरात दुर्गंधीचे वातावरण पसरलेले आहे. साथीचे रोग आणि डासांमुळे होणारे रोगांची लागवणमुळे येथील वसाहतीचे नागरीक त्रस्त आहे. सदर काम करणे अत्यंत आवश्यक असून मा. महापौर यांना विनंती की सदर काम सर्वसाधारण सभे मध्ये मंजुरी देऊन काम तात्काळ सुरु करावेत.

सुचक : श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद अनुमोदक :श्री.समीर सुभाष राजुरकर

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०४ एकतानगर,जहांगीरकॉलनी हया नागरी वसाहतीलगत असलेली खाम नदी (मेन-सिव्हर ड्रेनेज लाईन) ची रुंदी वाढवून त्याभोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वार्डातील मनपा नेहरु भवन ही इमारत पोलीस खात्यास देण्यास माझा विरोध आहे. सदरील इमारती मधील फनिर्चर खराब झालेला असून त्या इमारतीतील मनपा सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यांत यावे जेणे करुन परिसरातील ७ ते ८ शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना फायदा होईल.

तसेच नेहरु भवनच्या परिसरात फार मोठी मोकळी जागा असून त्या ठिकाणी शॉपिंग कॉम्पलेक्स बांधण्यात यावा जेणे करुन वार्डातील गरीब सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल व मनपास आर्थिक फायदा ही होईल. करीता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग अनुमोदक : श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरु भवन ही इमारत पोलीस खात्यास न देता नेहरू भवन येथे सार्वजनिक वाचनालय सुरु करणे तसेच नेहरु भवनच्या परिसरात असलेल्या मोकळया जागेवर शॉपिंग कॉम्पलेक्स बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.५३:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.०३ जी सेक्टर एन-११ येथील भाजी मार्केट,शॉपींग कॉम्पलेक्स असून या परिसरात महिलांची,मुलींची जास्त वर्दळ असते. या ठिकाणी गुंड प्रवृत्ती मुले दारु पिवुन येतात व महिलांची व मुलींची छेडछाड करत असतात त्यामुळे अनेक वेळा मारहाण झालेली आहे. तसचे या परिसरात मंगळसुत्र चोरीचे प्रमाण वाढले असून या ठिकाणी पोलीस चौकी असने अत्यंत आवश्यक झाले आहे. तरी जी सेक्टर एन-११ येथील

मनपाच्या खुली जागा असून ०२ खोल्याची जागा पोलीस चौकी साठी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.राजगौरव वानखेडे, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव,
अनुमोदक :सौ.ज्योती रुपचंद वाघमारे, अनिल जुगललाल जैस्वाल

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०३ जी सेक्टर एन-११ येथे नागरीकांच्या सुरक्षतेसाठी मनपाच्या जागेवर ०२ खोल्याची जागा पोलीस चौकी साठी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.१३ येथील सादत मस्जीद नॅशनल कॉलनी कब्रस्थान तसेच वार्ड क्र.४ येथील रोजेबाग मधील कब्रस्थानात पाण्याची,विद्युत,संरक्षण भिंत इत्यादि सुविधा नसल्यामुळे नागरीकांची मोठी गैरसोय होत आहे. तसचे उक्त कब्रस्थान गाजर गवत वाढण्यामुळे साप,विंचु,किंडयाचे प्रमाण वाढले आहे. ज्यामुळे रात्रीच्या वेळेत मयताच्या अतंविधी करण्यासाठी येणाऱ्या नागरीकांना अंधारामुळे जिव मुठीत घेवुन अंतविधी करावी लागत असल्यामुळे भविष्यात काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता उक्त दोन्ही कब्रस्थानास संरक्षण भिंत,विद्युत व्यवस्था,पाणी इत्यादि सुविधा उपलब्ध करण्यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रु. ३० लक्ष तरतुद ठेवण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भुईगळ अमित सुधाकर
अनुमोदक : श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ येथील सादत मस्जीद नॅशनल कॉलनी कब्रस्थान तसेच वार्ड क्र.४ येथील रोजेबाग मधील कब्रस्थानात या दोन्ही ठिकाणी संरक्षण भिंत,विद्युत व्यवस्था,पाणी इत्यादि सुविधा उपलब्ध करण्यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रु.३० लक्ष तरतुद ठेवण्याचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कोहिनूर कॉलनी येथील सर्व नागरीकांच्या इच्छेनुसार कोहिनुर कॉलनी येथील उद्यानाला मागील आयुक्त आसिमकुमार गुप्ता यांचे नांव देण्यात आले होते. परंतु सदरील नागरीकांचा या नावाला विरोध असून कोहिनूर कॉलनी स्थित उद्यानास कोणत्याही व्यक्तीचे नांव देण्यात येऊ नये हया उद्यानास "कोहिनूर कॉलनी उद्यान" असे नांव देण्यात यावे अशी मागणी नागरीकांच्या वतीने करण्यात आली असून ती मान्य करण्यांत यावी हि विनंती.

सुचक : श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
अनुमोदक : श्री.भुईगळ अमित सुधाकर, श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे, सौ.ज्योती रुपचंद वाघमारे, श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोहिनूर कॉलनी येथील उद्यानास पुर्वी दिलेले नांव बदलून आता "कोहिनूर कॉलनी उद्यान" असे नांव देण्यास मंजूरी देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वरिष्ठ पोलीस निरिक्षक पोलीस ठाणे गुरुगोविंदसिंगपुरा यांनी विनंती केली आहे की,प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथे चंद्रलोक अपार्टमेंट समोर मनपाची खुली जागा इंडोअर गेम साठी उपलब्ध करुन देण्यात यावी.तरी सदरील मोकळया जागे मध्ये इंडोअर गेम हॉल बांधण्याकरीता त्यांच्या विनंती नुसार नियमाप्रमाणे त्यांना इंडोअर गेम हॉल बांधण्यासाठी जागा देण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव, श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल

अनुमोदक : श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण, श्री.गादगे विरभद्र रामलींग

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पोलीस ठाणे गुरुगोविंदसिंगपुरा प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथे चंद्रलोक अपार्टमेंट समोर मनपाची खुली जागा इंडोअर गेम साठी नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याच्या तसेच नियमानुसार इंडोअर गेम हॉल बांधण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शिक्षण सहासंचालक (प्रशासन अंदाज व नियोजन) माध्यमिक व उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी श्रीमती नर्गीस शेख यांची महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी पदावर ११.०८.२००९ रोजी प्रतिनियुक्ती केली आहे. श्रीमती नर्गीस शेख जिल्हा परिषद शाळा लासुरगांव या ठिकाणी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होत्या. श्रीमती नर्गीस शेख यांचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव तत्कालीन महापौरांनी नामंजुर केलेला आहे. तसेच त्याच्या कामा बाबत बऱ्याच तक्रारी असल्यामुळे त्यांना परत त्याच्या मुळ विभागाकडे पाठविण्यात यावे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

अनुमोदक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव, श्री.तुपे त्रिंबक गणपतराव.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय क्रमांक ३३ प्रमाणे शिक्षण अधिकारी त्यांच्या विभागास परत पाठविण्यास मंजुरी दिल्याप्रमाणेच या प्रस्तावासही मंजुरी देण्यात येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे प्रस्ताव**

**विषय क्र ५८:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि. ०७/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावरील वर्ग-४ सवंर्गातील कर्मचा-यांना कार्यालयीन आदेश जा.क्र/मनपा/आस्था-२/१४९३/०९ दि.३०/११/२००९ रोजीच्या आदेशान्वये दि.३० /०४/२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-४ संर्वगातील खालील कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती.मंदाबाई तुकाराम दांडगे | **दै.वे.सेविका** | प्रकल्प विभाग | रु.218/- |
| 2 | दिपक शेषराव दाभाडे | **दै.वे.सेवक** | मा.उपआयुक्त (म) दालन | रु.218/- |
| 3 | रविंद्र प्रभाकर देवकर | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.218/- |
| 4 | स.शहाबुद्यीन स.जकरुद्यीन | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.218/- |
| 5 | रमेश सखाराम जाधव | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.218/- |
| 6 | सुनिल धर्माजी भुंजगे | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.218/- |
| 7 | रविंद्र विठ्ठल कांबळे | **दै.वे.सेवक** | रमानगर वाचनालय | रु.218/- |
| 8 | नारायण शिवाजी सपाटे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 9 | रमेश दत्तु येवले | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 10 | विनोद पांडूरंग तुपे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 11 | सुधाकर आसाराम त्रिभुवन | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 12 | गोविंद किसन साळवे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 13 | संजय विठठल इंगळे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 14 | समिंदर रमेश | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 15 | प्रल्हाद गुंजाळे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 16 | कडूबा औताडे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 17 | मिलिंद दत्तोपंत आम्ले | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 18 | सिध्दार्थ पांडूरंग दांडगे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 19 | सतिश सोनाजी गडवे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20 | सर्जेराव शिंदे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 21 | सुभाष निलकंठ | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 22 | रामेश्वर फुलारे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 23 | कमलबाई शिवन्ना गुडम | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 24 | कमलबाई भिमराव साळवे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 25 | रंजना तुळशीराम मोरे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 26 | लताबाई कारभारी | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 27 | शहनाज बेगम रशिद खाँ | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 28 | इंदुबाई पांडूरंग दांडगे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 29 | इंदुबाई राजुरे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 30 | मंगलाबाई मिश्राम | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 31 | चंद्रकला शंकर आम्ले | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 32 | उषा सुनिल घोगरे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 33 | संध्या श्याम साळवे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 34 | सुनिता किसन साळवे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 35 | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 36 | जकीया बेगम अ.हमीद | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 37 | यशोधरा नामदेव सोनवणे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 38 | विद्या मनोहर सोनवणे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 39 | शारदाबाई सदाशिव जगधने | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 40 | छायाबाई अशोक म्हस्के | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 41 | शारदाबाई दलबहादुर | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 42 | संजय बालाजी कुलकर्णी | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 43 | राजेश प्रभाकर पवार | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 44 | चंद्रमणी समाधान गवई | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 45 | रावसाहेब जाधव | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 46 | कुदन काशिनाथ गणोरे | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 47 | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 48 | रविंद्र खापे | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 49 | संदिप सुभाष घाग | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 50 | प्रल्हाद विठ्ठल करडे | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 51 | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 52 | शे.करीम शे.हुसेन | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 53 | विजय पंडीतराव गायकवाड | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 54 | अय्युब खाँ सांडू खाँ | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 55 | रमेश चंद्रय्या परके | **दै.वे.विद्युत लाईनमन** | विद्युत विभाग | रु.269/- |
| 56 | अण्णासाहेब दाणे | **दै.वे.विद्युत लाईनमन** | विद्युत विभाग | रु.269/ |
| 57 | कैलास श्रीपत बनकर | **दै.वे.विद्युत लाईनमन** | विद्युत विभाग | रु.269/ |
| 58 | असलम खान मुकीद खान | **दै.वे.मजूर** | निवडणूक विभाग | रु.218/- |
| 59 | इलियास अ.बसरावी | **दै.वे.मदतनीस** | यांत्रिकी विभाग | रु.218/- |
| 60 | मो.युसुफ़ मो.उस्मान | **दै.वे.मदतनीस** | यांत्रिकी विभाग | रु.218/- |
| 61 | मो.आसेफ़ मो.खालेद | **दै.वे.मदतनीस** | यांत्रिकी विभाग | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 62 | शेख इम्रान शेख फ़जलोद्दीन | **कक्ष सेवक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 63 | गयासोद्दीने | **कक्ष सेवक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 64 | विमलबाई भुईगड | **सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 65 | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | **सहाय्यक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 66 | सौ.जयश्री वसंत | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/- |
| 67 | विलास दत्तू नाईक | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 68 | सुरेश दामोधर नलावडे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/- |
| 69 | श्रीमती.जिजाबाई नवगिरे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 70 | श्रीमती.पार्वता दाडेकर | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 71 | भरत पचलोरे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 72 | सुभाष दत्तात्रय सुरासे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 73 | मुंढे भानुदास नरसू | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 74 | कमल कचरु मोरे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 75 | भोसले पंढरीनाथ | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 76 | नारायण शेषराव जंगले | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 77 | वाचा सुंदर संतोष | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 78 | निकम शांताराम नारायण | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 79 | तनवीर खान नियाजी | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 80 | शेख हबीब लाल | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 81 | मनिषा किसनराव पाटील | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.269/ |
| 82 | फ़िरोज खान गणी खान | **दै.वे.वॉर्डबाय** | आरोग्य विभाग | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 83 | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | **दै.वे.वॉर्डबाय** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 84 | प्रवेश आजी मिसाळ | **दै.वे.वॉचमन** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 85 | युवराज लांडगे | **दै.वे. सेवक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 86 | निरु कृष्णा गवळे | **दै.वे. सेवक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 87 | पुष्पलता सावंत | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 88 | जाधव सखुबाई शंकर | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 89 | गायकवाड मिना गणपत | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 90 | वाघ सखुबाई आसाराम | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 91 | काळे मिनाबाई काशिनाथ | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 92 | फुले धुरपताबाई सांडू | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 93 | फ़िरंगी लिला नरसिंग | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 94 | कांबळे शोभा साहेबराव | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 95 | के.डब्ल्यु.पोपलवार | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 96 | विजय गोविंद साबळे | **प्रयोग सहाय्यक** | आरोग्य विभाग | रु.218/- |
| 97 | दिलीप श्रीधर ठोंबरे | **दै.वे.मजूर** | अग्निशमन विभाग | रु.218/- |
| 98 | बाबासाहेब रंजाजी कांबळे | **दै.वे.हमाल** | वॉर्ड-ब कार्यालय | रु.218/- |
| 99 | राजेश दिपचंद लाहोट | **दै.वे.स्वीपर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |
| 100 | किशोर विनायक | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |
| 101 | नदिम अख्तर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |
| 102 | विष्णू नारायण काळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |
| 103 | मिर्झा अन्वर बेग | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 104 | बाबासाहेब निवृत्ती बनसोडे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |
| 105 | फेरोज अहमद मुस्ताफ अ.खान | **दै.वे.वॉचमन** | वॉर्ड-क कार्यालय | रु.218/- |
| 106 | गणेश साहेबराव अजगरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.218/- |
| 107 | अनिल येडूबा साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.218/- |
| 108 | लताबाई अशोक साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.218/- |
| 109 | माणिक बाबुराव क्षिरसागर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.218/- |
| 110 | संजय शामराव ठोबरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.218/- |
| 111 | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 112 | शेख जावेद शे.जाफर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 113 | श्रीमती.रमादेवी भगवान म्हस्के | **दै.वे.सेविका** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 114 | राजु रामचंद्र बडे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 115 | द्वारकाबाई नाना अडागळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 116 | चतुराबाई भिमराव हतागळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 117 | चंपाबाई गणपत निर्मळ | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.218/- |
| 118 | दौलत किसन सलामबाद | **मजूर** | वॉर्ड-फ कार्यालय | रु.218/- |
| 119 | रविंद्र शामसुंदर कांबळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 120 | संजय रतन खरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 121 | किशोर खुशाल रामटेके | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 122 | अतुल हरीचंद्र फुलके | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 123 | शोभाबाई दिलीप साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 124 | जाईबाई साहेबराव साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 125 | हौसाबाई रामभाऊ वडमोर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 126 | मिनाबाई दामोधर सोनवणे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 127 | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 128 | सावित्रीबाई भगवान मगरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 129 | कांताबाई अंबादास पटेकर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.218/- |
| 130 | विजय लक्ष्मणराव देशपांडे | **वॉचमन** | भारत माता मंदिर | रु.218/- |
| 131 | सुनिल किसनराव दाभाडे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 132 | सतिश केशव बनकर | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 133 | राजेंद्र भागाजी नवगिरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 134 | मिलींद धनाजी गायकवाड | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 135 | बालसिंग भोपाल कणसे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 136 | रामदास हरिचंद्र बमणे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 137 | किशोर मोतीराम उगळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 138 | राजेश नाथाजी गवळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 139 | रावसाहेब हरीभाऊ मगरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 140 | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 141 | सुरेश नामदेव खरात | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 142 | कैलास पांडुरंग वाणी | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 143 | संतोष गोविंद जगे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 144 | वैजिनाथ देवराव साबळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 145 | सुनिल दौलत अंभोरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 146 | घनशाम पांडुरंग जाधव | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 147 | शंकर पांडुरंग भातपुडे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 148 | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 149 | छगन तुळजाराम सलापूरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 150 | सुभाष बाबुलाल हरणे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 151 | बबन गोविंद जाधव | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 152 | राधाकिसन फकीरचंद बकले | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.218/- |
| 153 | वाजीद खान मन्सूर खान | **गणेश कॉलनी** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 154 | इम्रान उल्ल खान फ़ैल उल्ला | **कैसर कॉलनी** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 155 | फ़ारुख अली सराब अली | **कैसर कॉलनी** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 156 | एहतेशाम अली हाश्मी | **लोटा कारंजा** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 157 | मिर्झा रुफ़द बेग | **(सेवक) शहा बाजार** | शिक्षण विभाग | रु.218/- |
| 158 | सुरेश धाबर्डे | **दै.वे.चौकीदार** | नगर सचिव विभाग (मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालन) | रु.218/- |

तथापी मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व (३) नुसार उक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०३/०५/२०१० ते दि. ३१/१०/२०१० पर्यंत मुदतवाढ देण्याबाब प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-४, संवर्गातील प्रस्तावात नमुद विविध विभागात कार्यरत असलेले व प्रस्तावात नमूद दैनिक वेतनावर असलेले अनुक्रमांक १ ते १५८ कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व (३) नुसार दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०३.०५.२०१० ते ३१/१०/२०१० पर्यंत पुढील सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला सिल्लेखाना येथील अवैध कत्तल बंद करण्यासाठी व पाळलेल्या जनावरात कत्तलीची जनावरे मिसळून रात्रीच्या वेळी बंद दाराआड होणारी कत्तल रोखण्यासाठी मो.सिल्लेखाना हे क्षेत्र गुरे पाळणे, बांधणे व बाळगणे,गुरांची वाहतूक करणे यासाठी मनपा मार्फत प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत होणे आवश्यक आहे.

त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे प्रकरण-१९ मधील प्रावधांनानुसार कलम ३२९,३३३,३३४ व ३३५ आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-२२ मधील प्रावधानानुसार कलम ३७६ व ३७६ (अ) अन्वये मोहल्ला सिल्लेखाना हे क्षेत्र विनापरवाना गुरे बाळगणे व जागेचा धोकादायक व उपद्रव कारक पध्दतीने वापर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी व अवैध कत्तल रोखण्यासाठी मो.सिल्लेखाना हे क्षेत्र गुरे पाळणे,गुरे बांधणे,गुरे बाळगणे व गुराची वाहतूक करण्यासाठी प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेस मान्यतेस्त सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व प्रशासनाने प्रास्तावित केल्यानुसार मोहल्ला सिल्लेखाना येथील अवैध कत्तल बंद करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे प्रकरण-१९ मधील प्रावधांनानुसार कलम ३२९,३३३,३३४ व ३३५ आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-२२ मधील प्रावधानानुसार कलम ३७६ व ३७६ (अ) अन्वये मोहल्ला सिल्लेखाना हे क्षेत्र विनापरवाना गुरे बाळगणे व जागेचा धोकादायक व उपद्रव कारक पध्दतीने वापर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी व अवैध कत्तल रोखण्यासाठी मो.सिल्लेखाना हे क्षेत्र गुरे पाळणे,गुरे बांधणे,गुरे बाळगणे व गुराची वाहतूक करण्यासाठी प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०:**

अग्निशमन विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण कायदा-२००६ ची अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व अवलोकनार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभाग महानगरपालिका औरंगाबाद महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण कायदा-२००६ ची अंमलबजावणी करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १२.०२.२००९ ठराव क्र.४२० अन्वये,सिडको एन-५ येथे बांधण्यात आलेल्या नाटयगृहास जगदगुरु संत तुकाराम महाराज असे नामकरण करण्यात यावे. या करीता प्रस्ताव ठेवण्यात आला होता. तथापि या नाटयगृहाचे महापालिकेकडे जेव्हा हस्तांतरण होईल तेव्हा हा विषय मंजुर करावा असे ठरले.

करीता सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेले असल्याने,सिडको एन-५ येथे बांधण्यात आलेल्या नाटयगृहास जगदगुरु संत तुकाराम महाराज असे नामकरण करण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव अनुमोदक :श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव,
श्री.खेडकर सुशिल तुकाराम

**<u>ठराव</u>:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सिडको एन-५ येथे बांधण्यात आलेल्या नाटयगृहास जगदगुरु संत तुकाराम महाराज असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.६१/१:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतर्फे प्रत्येक प्रभागात वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेण्यात आले असून प्रभागात विविध ठिकाणी झाडे लावण्यात आलेली आहेत. परंतु या झाडास संरक्षण नसल्यामुळे जनावरे झाडे खात आहेत.करीत या झाडांचे सरंक्षण व्हावे व लावण्यात आलेली झाडांची योग्य प्रकारे जोपासणा व्हावी या दृष्टीकोणातुन महापालिका अंतर्गत प्रत्येक प्रभागात लावण्यात आलेल्या वृक्षासाठी प्रती वार्ड ५० नग या प्रमाणे साधारणत: एकूण ५००० नग लोखंडी ट्री गार्ड महापालिकेच्या मान्य निविदा दरा नुसार खरेदी करण्यात यावेत करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव अनुमोदक :श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग

**<u>ठराव</u>:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महापालिका अंतर्गत प्रत्येक प्रभागात लावण्यात आलेल्या वृक्षासाठी प्रती वार्ड ५० नग या प्रमाणे साधारणत: एकूण ५००० नग लोखंडी ट्री गार्ड महापालिकेच्या मान्य निविदा दरा नुसार खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र ६१/२</u>:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.अजीज खान बशिरखान रा.बेगमपुरा यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) या ठिकाणी ॲन्जियोप्लास्टी शस्त्रक्रीया करण्यासाठी रक्कम रुपये १२५०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यांना जीवनदायी योजने अंतर्गत रु. ७००००/- मंजुर करण्यात आले आहेत.तथापि त्यांची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामुळे ते उर्वरीत रक्कम रु. ५५०००/- खर्च करु शकत नाही तरी त्यांच्या परिस्थितीचा विचार करता महापालिकेतर्फे त्यांना रक्कम रु.५००००/- आर्थिक मदत देण्यात यावी,करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

सुचक :श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग अनुमोदक :श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

**<u>ठराव</u>:**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे श्री.अजीज खान बशिरखान रा.बेगमपुरा यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) या ठिकाणी ॲन्जियोप्लास्टी शस्त्रक्रीया करण्यासाठी महापालिकेतर्फे त्यांना रक्कम रु.५००००/- आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद